NUTA BULLETIN
OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION
Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. AMT/RNP/78/2024-2026
YEAR : 49) 1st February 2024 ( No. of Pages 28 ) ( No : 03

# MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

## *मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांची अनेक प्रकरणात सतत अवहेलना करण्याच्या उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांकडून घडत असलेल्या अभद्र प्रकाराविरोधात विभागाचा सार्वजनिक निषेध करण्याचा निर्णय*

### *संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करण्याची मागणी*

*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या दिनांक २१ जानेवारी २०२४ रोजी नाशिक येथे झालेल्या बैठकीत संमत झालेला ठराव*

**१.** मा.उच्च न्यायालयाच्या - मा.सर्वोच्च न्यायालयाने कायम केलेल्या - अनेक निर्णयांची अवहेलना करण्याचा प्रकार उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सुरू केलेला आहे. सहसंचालक, संचालक व मंत्रालयातील काही अधिकारी हे लागोपाठ अशा कारवाया करण्यामध्ये सातत्याने गुंतलेले आहेत.

**(A)** मा.सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेले विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनचे श्रेष्ठत्व महाराष्ट्राच्या मा.राज्यपालांनी व मंत्रीमंडळाने मान्य केले असतांना *(परिच्छेद ७)* तसे करण्यास आढ्यताखोरपणे उच्च शिक्षण विभागातील अधिकारी नकार देतात हा शिरजोरपणाचा प्रकार आहे. "९० टक्के जागा भरल्याच पाहिजेत" तसेच "निवड समित्या ह्या रेग्युलेशनप्रमाणेच असल्या पाहिजेत" या मा.सर्वोच्च न्यायालयाने निश्चित करून दिलेल्या कायद्याच्या अंतिम अर्थाचे पालन न करणे हे न्यायालयाचा अवमान करणारे कृत्य होय. असत्य माहिती दाखल करून १३२० कोटी रुपये केंद्राकडून मिळवून भारताच्या मा.राष्ट्रपतींची, केंद्रीय मंत्रीमंडळाची व राज्य मंत्रीमंडळाची या अधिकाऱ्यांनी उघडउघड फसवणूक करणे हे अत्यंत लज्जास्पद कृत्य होय. *(परिच्छेद १४)*

**(B)** "**जुलै २००९ पूर्वी ज्यांनी एम.फील. पदवी धारण केली आहे, अशा शिक्षकाला नेमणुकीच्या पहिल्या दिवसापासून सेवा धरून आश्वासित प्रगती योजनेसह इतर सर्व लाभ द्यावे लागतील**" सन २०१० मधील पहिल्या व दुसऱ्या न्यायालयीन निर्णयांनी हा कायद्याचा अंतिम अर्थ निश्चित करून दिला. *(परिच्छेद ५१)* त्यावर मा.सर्वोच्च न्यायालयाचे शिक्कामोर्तब झाले. त्याला धरून दिनांक २४ फेब्रुवारी २०१७ रोजी मा.नागपूर खंडपीठाने तत्सम निर्णय दिला. त्यापूर्वी अनेक खंडपीठांनी तसेच निर्णय दिलेले असल्यामुळे सरकारी वकिल निर्णयाशी सहमत झाले. तरीही उच्च शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल करण्याच्या सूचना दिल्या. सर्वोच्च न्यायालयातील दिल्लीस्थित सरकारी वकिलांनी हे प्रकरण विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल करण्याच्या लायकीचे नाही तेव्हा विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल करण्याच्या सूचना मागे घ्याव्यात अशी विभागाला विनंती केली पण उच्च शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपला राजहट्ट कायम ठेवला.

**(C)** विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल झाली व फेटाळल्या गेली. सर्वोच्च न्यायालयाने अशी आगंतुक (uncalled for) प्रकरणे इथे आणत जाऊ नका असे ताशेरे ओढले. राज्यशासनाकडून आगंतुक प्रकरणे दाखल होण्याची संख्या फार वाढली आहे. राज्याच्या मुख्य सचिवांनी याबाबत कारवाई करावी असे मा.सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले. राज्याच्या मुख्य सचिवांनी तसे परिपत्रक काढले पण उच्च शिक्षण विभागातील अधिकारी दुरुस्त व्हायला तयार नाहीत. मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर २०२३ पर्यंत त्याबाबतचा धोरणात्मक निर्णय अजूनही निर्गमित होऊ नये ही अत्यंत लाजीरवाणी गोष्ट आहे. मा.उच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या ९ खंडपीठांनी उपरोक्तप्रमाणे निर्णय दिले. पहिला निर्णय देणाऱ्या खंडपीठातील मा.ज्येष्ठ न्यायमूर्ती सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश झाले. याप्रकरणी दुसरा निर्णय देणाऱ्या खंडपीठातील मा.ज्येष्ठ न्यायमूर्ती सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश झाले. तत्पूर्वीच मा.सर्वोच्च न्यायालयाने 'आगंतुक' प्रकरणे इकडे आणत जाऊ नका असे फटके मारल्यानंतरसुद्धा काहीच सुधारणा होऊ नये हे तर अत्यंत लज्जास्पद वर्तन होय. *(परिच्छेद ४६)*

**(D)** "**जुलै २००९ पूर्वी ज्यांनी एम.फील. पदवी धारण केली आहे, अशा शिक्षकाला नेमणुकीच्या पहिल्या दिवसापासून सेवा धरून आश्वासित प्रगती योजनेसह इतर सर्व लाभ द्यावे लागतील**" असा मा.उच्च न्यायालयाचा आदेश आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयावर शिक्कामोर्तब केले. असे असतांना महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाशी दिनांक २० ऑक्टोबर २०२३ रोजी उच्च शिक्षण संचालकांनी चर्चा केली. सारा विषय समजून घेतला व दिनांक २३ नोव्हेंबर २०२३ रोजी "(२) **ज्यांनी सेवेत असताना एम.फील. अर्हता धारण केली असेल, त्यांना सदर अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ देय राहतील.**" असे आदेश काढले. त्यांची ही घोडचूक दुरुस्त करण्यासाठी मंत्रालयातील उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्याने दिनांक ३० नोव्हेंबर २०२३ रोजी एक वेगळा आदेश काढला त्यात

"**(ब) अध्यापकांनी सेवेत असताना एम.फील. अर्हता धारण केली असेल तर, विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेली मान्यता विचारात घेऊन, विद्यापीठाने संबंधित उमेदवाराला ज्या दिनांकापासून परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिली असेल अशा दिनांकापासून त्याला कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ अनुज्ञेय होतील.**" असे नमूद करून आणखी महाघोडचूक करून ठेवली.

उच्च शिक्षण संचालकांचे आदेश वेगळे, उपसचिवांचे आदेश त्याहून वेगळे आणि दोघांनीही मा.उच्च न्यायालयाचा व मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय वाचलाच नाही. वाचला असल्यास त्यांना तो समजलाच नाही. साधारणपणे लिहिता वाचता येणाऱ्या व्यक्तिनांच उच्च शिक्षण संचालक व उपसचिव, उच्च शिक्षण या पदांवर नेमले जाते ना? मग एवढ्या मोठ्या पदावर काम करणाऱ्या या अधिकाऱ्यांना न्यायालयाच्या निर्णयातील दोन ओळी वाचता येत नसतील तर त्यांचे काय करावे? *(परिच्छेद ५०)*

**(E)** तेच तेच युक्तिवाद पुन्हा पुन्हा न कंटाळता करायचे, मा.उच्च न्यायालयाने धोरणात्मक निर्णय दिला तरी त्या व्यक्तीपुरती अंमलबजावणी

*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या ठरावानुसार*

**मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांप्रती सचिव उच्च शिक्षण व संचालक उच्च शिक्षण यांच्या लज्जास्पद व निषेधार्ह वर्तनाचा तीव्र**

# *निषेध - विशेषांक*

करून हात 'शेकत' राहायचे, या उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या हट्टीपणामुळे उच्च शिक्षण क्षेत्रातील शेकडो लोक वैतागून गेलेले आहेत. असाच वैताग मा.उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने कोणत्या शब्दात व्यक्त केलेला आहे ते पहा. :-

**"Finally, we are constrained to note our great dismay, even displeasure, at the manner in which the State Government persists in raking up the same defence again and again. We do not know how many times this Court has to pronounce the law."** *(परिच्छेद १०७)*

**(F)** याच निर्णयात पुढे असे ही नमूद करण्यात आले आहे की, "The aforesaid extracts show that this Court had laid down the law, and the pronouncement was not limited to the facts of any particular case. Yet, the government persists in the belief that the law declared by this court is somehow not binding on it, or that every judgment, no matter what the wording and even if it clearly lays down the law is confined to that particular petition. **We are letting it pass this once, but if this is repeated we may well be moved to far sterner action."** *(परिच्छेद १०८)*

**(G)** मा.सर्वोच्च न्यायालयाने कन्फर्म केलेल्या मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयात "**(i) या सर्व शिक्षकांचे ७१ दिवसांचे वेतन त्यांना परत करा (ii) ते विलंबाने परत केल्याबद्दल देय दिनांकापासून अदायगीच्या दिनांकापर्यंत त्यावर आठ टक्के व्याज अदा करा**" असे आदेशित केले. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे या दोनही रकमा त्यांना परत करा असा शासननिर्णय दिनांक ७ डिसेंबर २०२० रोजी निघाला. तर मा.सर्वोच्च न्यायालयाचे पूनर्विलोकनाचे अधिकार वापरून उच्च न्यायालयाचा निर्णय व राज्यशासनाचा शासननिर्णय आपल्या अधिकारात उच्च शिक्षण संचालकांनी दुरुस्त केला. दिनांक ९ डिसेंबर २०२० रोजी "विलंबाबद्दल ८ टक्के रक्कम देण्याची बाब वगळून, फक्त ७१ दिवसांचे कापलेले वेतन परत करा" असे आदेश उच्च शिक्षण संचालकांनी आपल्या सहसंचालकांना दिले. **मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयात व शासननिर्णयात दुरुस्ती करण्याचा आपल्याला अधिकार नाही एवढीही अक्कल संचालक पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला नसेल तर त्यांना ते पद भूषविण्याचा अधिकार कसा काय प्राप्त होतो?** देय दिनांकापासून अदायगीच्या दिनांकापर्यंत मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे आठ टक्क्याची रक्कम उच्च शिक्षण संचालकांकडून आजही अदा करण्यात आलेली नाही. *(परिच्छेद ५७)*

**(H)** दिनांक १२ ऑगस्ट २०२२ रोजी उच्च शिक्षण संचालकांनी जो आदेश काढला त्यामध्ये त्यांनी अध्यापकनिहाय **देय दिनांकापासून प्रत्यक्ष वेतन अदायगी झालेल्या दिनांकापर्यंत 8% p.a. व्याजाच्या रकमेची मागणी आजच संचालनालयाला सादर करा** असे आपल्या आदेशात नमूद केले. पण या रकमा या शिक्षकांना पूर्णांशाने अदा करावयाच्या नाहीत. त्यात फार मोठ्या प्रमाणात कपात करावयाची असे त्यांनी मनाशी ठरवून टाकले होते. त्यासाठी अत्यंत अभद्र मार्गाचा त्यांनी वापर केला. **आपल्या आदेशात मा.उच्च न्यायालयाचा निर्णय उद्‌धृत करतांना त्यांनी त्यातील एक शब्द गाळून टाकला. त्यामुळे मनमानी कपात करण्याचे समाधान त्यांनी मिळविले. उच्च शिक्षण संचालक या नात्याने आपल्या आदेशात मा.उच्च न्यायालयाचा निर्णय उद्‌धृत करतांना न्यायालयाच्या निर्णयातील शब्द वगळून टाकण्याचे कृत्य हे गुन्हेगारी स्वरूपाचे कृत्य आहे असे या महासंघाचे ठाम मत आहे.** *(परिच्छेद ६३)*

**(I)** मा.उच्च न्यायालयाने २७१९/२०२० या प्रकरणात दिनांक ९ फेब्रुवारी २०२१ रोजी दिलेल्या एक निर्णयाला एका सहसंचालकांनी दिनांक १२ मे २०२१ रोजी एक आदेश काढून स्थगिती *(188/21)* देण्याचा अभूतपूर्व अपप्रकार महाराष्ट्राने पाहिला, तेव्हा महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला पत्रकार परिषद घेऊन त्यांच्या हकालपट्टीची मागणी करावी लागली. हकालपट्टी झाली व अवमान याचिकेनंतर मूळ निर्णयाची अंमलबजावणी झाली. *(परिच्छेद १०३)*

**(J)** मारुती दत्तात्रय पाटील प्रकरणात शासनाने दाखल केलेली विशेष अनुमती याचिका (SLP) दिनांक १ जुलै २०१९ रोजी 'डिसमिस' झाली. त्यानंतर विजयकुमार रणपीसे प्रकरणात SLP दाखल करतांना "यापूर्वी तत्सम प्रकरण या न्यायालयात निकाली निघाले आहे काय?" या रकान्यापुढे "No similar matter is disposed of" अशी धडधडीत खोटी माहिती उच्च शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी शपथपत्रावर मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. एवढ्यावर हा खोटेपणा थांबला नाही तर "तत्सम प्रकरण या न्यायालयात प्रलंबित आहे काय?" हा रकाना भरतांना राजेश वसंतराव पांडे यांचे प्रकरण आपल्याच अधिकाऱ्यांच्या गैरवर्तनामुळे येथे 'पेंडींग' पडलेले आहे याची माहिती असतांना **"No similar matter is pending" अशी धडधडीत खोटी माहिती शपथपत्रासह सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. असा खोटारडेपणा एकापेक्षा जास्त प्रकरणात या अधिकाऱ्यांनी केल्याचे पुरावे उपलब्ध आहेत. खोटेपणा उघडा पडल्याने त्या सर्व प्रकरणी 'डिसमिस' त्यांच्या नशिबी आले.** *(परिच्छेद ९२ ते ९५)*

**(K) सन २०२० ची याचिका क्रमांक LD-VC-CW No. 1045 of 2020** या प्रकरणात "**हा वादविषय संपुष्टात आला आहे असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. तुम्ही दोघेही तुमचे डोके चालवा (apply your mind) व त्याबाबत आठ दिवसात शपथपत्र दाखल करा**" असे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिनांक ३० ऑगस्ट २०२० रोजी पारित केले. "**न्यायालयाच्या पूर्व निर्णयाच्या विरोधात तुम्ही काही निर्णय घेतल्यास त्याची भारी किंमत तुम्हाला मोजावी लागेल**"

न्यायालयाने निर्णय घेण्यासाठी दिलेली मुदत संपत आलेली होती. **न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे "वादविषय संपुष्टात आलेला आहे किंवा नाही" याबाबत प्रधान सचिव, उच्च शिक्षण व संचालक उच्च शिक्षण यांनी निर्णय न घेता पळ काढला. आपले डोके चालवून नामी उपाय शोधून काढला. एकट्या याचिकाकर्त्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणारे शासनपत्र त्यांनी दिनांक १५ डिसेंबर २०२० रोजी निर्गमित केले व जुनी पेन्शन योजना लागू केली.** *(परिच्छेद १००)*

**(L) सन २०२० ची याचिका क्रमांक ST. No.9649** दिनांक १२ ऑक्टोबर २०२० रोजी सुनावणीला आली तेव्हा त्याच त्या विषयावर लोकांना पुन्हा पुन्हा याचिका दाखल करायला उच्च शिक्षण विभाग भाग पाडत आहे, ही गोष्ट मा.उच्च न्यायालयाच्या लक्षात आल्यामुळे मा.उच्च न्यायालयाने असे आदेश पारित केले की, "**प्रधान सचिव, उच्च शिक्षण व संचालक, उच्च शिक्षण यांनी दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ रोजी W.P. 13166 of 2017 या प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय विचारात घ्यावा. त्याचबरोबर विशेष अनुमती याचिका क्रमांक (सी.ए.) १३०९/२०२० या प्रकरणामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णयसुद्धा विचारात घ्यावा.** हे दोनही निर्णय विचारात घेऊन उच्च शिक्षण विभागाने घेतलेला अंतिम निर्णय **नमूद असलेले शपथपत्र मा.उच्च न्यायालयात सादर करावे.**"

**प्रधान सचिव उच्च शिक्षण व संचालक उच्च शिक्षण हे क्रमांक एक व दोनचे प्रतिवादी होते. उच्च न्यायालयाने धोरणात्मक निर्णय लक्षात आणून दिला व अंतिम निर्णय घेण्याचे आदेश दिले असतांना विभागाने एकट्या याचिकाकर्त्या पुरतेच प्रकरण मंजूर केले, याचिकाकर्त्याला जुनी पेन्शन योजना लागू केली व धोरणात्मक निर्णय न घेता पळ काढला.** *(परिच्छेद १०१)*

**(M) तत्सम विषयावरील तीन विशेष अनुमती याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या असतांना ही बाब सर्वोच्च न्यायालयात 'पेंडींग' आहे अशी सरळ सरळ असत्य माहिती मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर W.P.No. 4289 of 2019 च्या सुनावणीच्या वेळी सहसंचालकांनी ठेवणे, त्या आधारावर तेथे प्रकरण 'पेंडींग' पाडण्यात तात्पुरते यश मिळविणे, हा अव्वल दर्जाचा लुच्चेपणा तर आहेच पण मिळालेल्या या तात्पुरत्या यशाचा झेंडा हाती घेऊन इतर खंडपीठासमोर प्रकरण तात्पुरते 'पेंडींग' पाडण्यात यश मिळविणे, हा उच्च शिक्षण विभागाचे नेतृत्त्व करणाऱ्या या अधिकाऱ्यांच्या लुच्चेपणाचा कडेलोट म्हणून सांगता येईल. अर्थात हे यश तात्पुरतेच होते.** *(परिच्छेद १०२)*

***मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे व संविधानातील तरतुदीनुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन्सशी राज्यशासनाचा कायदा किंवा शासननिर्णय विसंगत असू शकत नाही ही भूमिका महाराष्ट्र राज्याच्या मा.राज्यपालांनी व मंत्रीमंडळाने मान्य केलेली असून त्याप्रमाणे राज्याच्या कायद्यात दुरुस्त्या केलेल्या आहेत. मात्र उच्च शिक्षण विभागातील अधिकारी ही भूमिका मान्य करायला तयार नसल्यामुळे शासननिर्णयातील विसंगत तरतुदी अजूनही जिवंत आहेत.***

*( परिच्छेद ७ पहा )*

## (१)
## मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे व संविधानातील तरतुदीनुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन्सशी राज्यशासनाचा कायदा किंवा शासननिर्णय विसंगत असू शकत नाही

### ही भूमिका महाराष्ट्र राज्याच्या मा.राज्यपालांनी व मंत्रीमंडळाने मान्य केलेली असून त्याप्रमाणे राज्याच्या कायद्यात दुरुस्त्या केलेल्या आहेत.

### मात्र उच्च शिक्षण विभागातील अधिकारी ही भूमिका मान्य करायला तयार नसल्यामुळे शासननिर्णयातील विसंगत तरतुदी अजूनही जीवंत आहेत.

**२.** भारतीय संविधान अस्तित्वात आले त्या दिवसापासून "**Co-ordination and determination of standards in institutions for higher education or research and scientific and technical institutions.**" हा विषय घटनेच्या सातव्या परिशिष्टातील केंद्रसूचीमध्ये समाविष्ट आहे. (Entry 66 in the Union List i.e. List I of Seventh Schedule of the Constitution of India.) केंद्र सूचित असलेल्या विषयाबाबत विधिविधानाचे अधिकार हे संसदेलाच (म्हणजे केंद्रशासनाला) असतील अशी घटनेच्या कलम २४६ मध्ये तरतूद आहे. ती पुढीलप्रमाणेः- **"246.** ..... Parliament has exclusive power to make laws with respect to any of the matters enumerated in List I in the Seventh Schedule in the Constitution referred to as the "Union List" संविधानाने दिलेल्या या अधिकाराचा वापर करून केंद्राने "**विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम १९५६**" हा कायदा पारित केला. या कायद्याच्या २६ व्या कलमान्वये रेग्युलेशन करण्याचे अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगाला प्रदान करण्यात आलेले आहेत. या अधिकारांचा वापर करून विद्यापीठ अनुदान आयोगाने पारित केलेले **"UGC REGULATIONS 2018"** हे अंमलात आले असून ते "The Gazette of India Extraordinary : Part III : Section 4" मध्ये दिनांक १८ जुलै २०१८ रोजी प्रकाशित झालेले आहेत. **"UGC Regulations on minimum qualifications for appointment of teachers and other academic staff in universities and colleges and measures for the maintenance of standards in Higher Education, 2018"** असा त्याचा मथळा आहे. *(यापुढे उल्लेख 'रेग्युलेशन' असा)*

**३.** **"25.** Education, including technical education, medical education and universities," हा विषय भारतीय संविधानाच्या सातव्या परिशिष्टात समवर्ती सूची या तिसऱ्या सूचीमध्ये २५ व्या क्रमांकावर समाविष्ट आहे. समवर्ती सूचीतील विषयावर कायदे करण्याचा व कारभार करण्याचा अधिकार केंद्रशासन व राज्यशासन या दोघांनाही असेल, मात्र दोहोंमध्ये विसंगती निर्माण झाल्यास संविधानाच्या खंड २५४ मधील व्यवस्था लागू होईल. कलम २५४ पुढीलप्रमाणे :-

**"254. (1)** If any provision of a law made by the Legislature of a State is repugnant to any provision of a law made by Parliament which Parliament is competent to enact, or to any provision of an existing law with respect to one of the matters enumerated in the Concurrent List, then, subject to the provisions of clause (2), the law made by Parliament, whether passed before or after the law made by the Legislature of such State, or, as the case may be, the existing law, shall prevail and the law made by the Legislature of the State shall, to the extent of the repugnancy, be void."

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अनेक निर्णयांनी याबाबतची स्थिती स्पष्ट केलेली आहे. ज्येष्ठ शास्त्रज्ञ व विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ.यशपाल यांनी याचिकाकर्ते म्हणून सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या याचिका प्रकरणी (Prof. Yashpal and another, Petitioners v. State of Chattisgarh and others... Respondents.) दिलेल्या निर्णयाच्या परिच्छेद ३२ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविला आहे:-

**"32. Any State legislation which stultifies or sets at naught an enactment validly made by Parliament would be wholly ultra vires.** We are fortified in our view by a Constitution Bench decision in R. Chitralekha v. State of Mysore AIR 1964 SC 1823 where power of the State under Entry 11 List II (as it then existed), and Entry 25 List III qua Entry 66 List I came up for consideration." (AIR 2005 SUPREME COURT 2026)

**४.** दिनांक ३ मार्च २०२२ रोजी **Writ Petition (Civil) No.1525 of 2019; Gambhirdan K Gadhvi VERSUS The State of Gujarat & Ors.** या प्रकरणी राज्यशासनांना व विद्यापीठांना यूजीसी रेग्युलेशनबाबतची सांवैधिक स्थिती स्पष्ट करणारा एक महत्त्वपूर्ण निर्णय मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे. गुजरात राज्यशासनाचा कायदा (सरदार पटेल युनिर्व्हसिटी ॲक्ट, १९५५) व विद्यापीठ अनुदान आयोगाचे रेग्युलेशन्स यामध्ये विसंगती असेल तर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन्समधील तरतुदी वरचढ ठरतील व त्याप्रमाणे कारवाई करावी लागेल, राज्यशासनाच्या कायद्यातील अशा तरतुदी प्रतिकुलतेच्या व्याप्ती पुरत्या शून्य होतील, अशाप्रकारचा स्पष्ट निर्णय मा.सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात दिलेला आहे. **गुजरात प्रकरणी दिलेल्या मा.सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयात पुढीलप्रमाणे "कायद्याचा अंतिम शब्द" निश्चित करून दिला आहे.:-**

**(i)** राज्यसरकार आणि त्या राज्यातील विद्यापीठे यांना विद्यापीठ अनुदान आयोग रेग्युलेशन्स २०१० व २०१८ यांचे पालन करणे बंधनकारक आहे, असे स्पष्टपणे या निर्णयाच्या परिच्छेद ११.४ मध्ये नमूद करण्यात आलेले आहे. ते पुढील शब्दात :- "Therefore, the State of Gujarat and the universities thereunder including the SP University are bound to follow UGC Regulations, 2010 and UGC Regulations, 2018."

**(ii)** राज्यशासनाच्या विद्यापीठ कायद्यातील तरतुदी ह्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन्सच्या विरोधात आहेत असे स्पष्टपणे या निर्णयात नमूद आहे आणि राज्यशासनावर व राज्यातील विद्यापीठांवर विद्यापीठ अनुदान आयोगाचे रेग्युलेशन्स हे बंधनकारक आहेत असेही या निर्णयाच्या परिच्छेद १२.२ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने नमूद केलेले आहे. ते पुढील शब्दात :- "Thus, the provisions of the SPU Act, 1955/provisions under the State legislation are just contrary to the UGC Regulations, 2010/2018, which, as observed hereinabove, are binding on the State Government and the universities thereunder."

**(iii)** कुलगुरुंची ही नेमणूक विद्यापीठ अनुदान आयोग रेग्युलेशन्स २०१८ च्या विरोधात आहे असे आमच्या लक्षात आले आहे असे या निर्णयाच्या परिच्छेद १५ मध्ये नमूद केलेले आहे. ते पुढील शब्दात:- "Thus, we find that the appointment of respondent No.4 is contrary to the UGC

**उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी ''समग्र योजना'' बासनात गुंडाळून ठेवली व दिनांक ८ मार्च २०१९ रोजीचा शासननिर्णय निर्गमित केला. आपल्या सोईनुसार 'अर्थपूर्ण चर्चा' करण्याच्या अनेक संधी व 'लक्ष्मीदर्शनाची अनेक आवर्तने' काढण्याच्या सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या अनेक अटी 'लोकल प्रॉडक्शन'च्या स्वरूपात त्या शासननिर्णयामध्ये घुसाडल्या व 'नॅशनल प्रॉडक्शन' विद्रुप करून ठेवले.**

*( परिच्छेद १२ पहा )*

**किमान ९० टक्के कायम शिक्षकांची भरती ही सर्वोच्च न्यायालय मान्य अशी कायद्याची सुस्थापित अंतिम स्थिती झालेली आहे. उपरोक्त तीन महत्त्वपूर्ण घटना घडल्यानंतर ९० टक्के जागा भरण्याचा निर्णय न घेणे हे पूर्णपणे घटनाबाह्य व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधातील कृत्य होय.** *( परिच्छेद ८ (३) (B) पहा )*

Regulations, 2018."

**(iv)** सरदार पटेल विद्यापीठाच्या कुलगुरुंची नेमणूक ही विद्यापीठ अनुदान आयोग रेग्युलेशन्स २०१८ चा भंग करून करण्यात आलेली आहे त्यामुळे ही नेमणूक रद्दबातल ठरविण्यात येत आहे, असे या निर्णयाच्या परिच्छेद १५ मध्ये पुढील शब्दात नमूद करण्यात आलेले आहे. :- "Therefore, when the appointment of respondent No.4 is found to be contrary to the UGC Regulations, 2018 and the UGC Regulations are having the statutory force, we are of the opinion that this is a fit case to issue a writ of quo warranto and to quash and set aside the appointment of respondent No.4 as the Vice Chancellor of the SP University."

**(v)** विद्यापीठ अनुदान आयोगाचे रेग्युलेशन्स आणि राज्याच्या विद्यापीठ कायद्यातील तरतुदी यामध्ये विसंगती असेल तर घटनेच्या कलम २५४ नुसार रेग्युलेशन्सप्रमाणे कारवाई करावी लागेल असेही या निर्णयाच्या परिच्छेद १५ मध्ये स्पष्टपणे नमूद केलेले आहे. ते पुढील शब्दात :- "UGC Regulation becomes part of the Act. In case of any conflict between State legislation and Central legislation, Central legislation shall prevail by applying the rule/principle of repugnancy as enunciated in Article 254 of the Constitution as the subject 'education' is in the Concurrent List (List III) of the Seventh Schedule of the Constitution."

**५.** गुजरात मधील प्रकरणामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने उपरोक्त निर्णय दिल्यानंतर राज्यशासनाच्या शासननिर्णयातील तरतुदी तर सोडाच, पण राज्यशासनाच्या कायद्यातील तरतुदी या रेग्युलेशनच्या विरोधात असतील तर त्या जिवंत राहू शकणार नाहीत, ही गोष्ट लक्षात आल्याने अनेक राज्यांमध्ये कुलगुरुंच्या नेमणुका एकामागोमाग रद्द होवू लागल्या. महाराष्ट्र शासनाने याबाबतीत कुलगुरू आणि प्र-कुलगुरू यांची निवड समिती व पात्रता याबाबत विद्यापीठ कायद्यात असलेल्या तरतुदी रेग्युलेशनशी विसंगत असल्यामुळे त्या दुरुस्त करून रेग्युलेशनशी सुसंगत करण्याचा निर्णय घेतला. अनेक ठिकाणी कुलगुरुंच्या नेमणुका होऊ घातलेल्या असल्यामुळे महाराष्ट्र शासनाला ही बाब स्वाभाविकपणे निकडीची वाटली व ताबडतोब कायद्यात दुरुस्ती करणारा सन २०२२ चा महाराष्ट्राचा अध्यादेश क्रमांक १३ काढण्यात आला. हा अध्यादेश गुरुवार, दिनांक २४ नोव्हेंबर २०२२ च्या महाराष्ट्र शासन राजपत्राच्या असाधारण भाग ८ मध्ये प्रकाशित करण्यात आला असून त्या अध्यादेशाच्या उद्देशपत्रिकेत परिच्छेद ३, ४ व ५ मध्ये पुढीलप्रमाणे नमूद आहे. :-

"3. **The Supreme Court has recently in the cases of Gambhirdan K Gadhvi v/s State of Gujarat & Ors. (Writ Petition (Civil) No. 1525 of 2019) and Professor (Dr.) Sreejith P.S. v/s Dr. Rajasree M.S.& Ors. (Civil Appeal Nos. 7634-7635 of 2022), held** that the eligibility criteria and appointment of Vice-Chancellor shall be always as per the relevant **UGC Regulations and the State Act if not on a par with the UGC Regulations must be amended to bring it on a par with the applicable UGC Regulations and until then it is the applicable UGC Regulations that shall prevail.**

4. The terms of Vice-Chancellors and Pro-Vice-Chancellors of certain universities in the State have already expired and new appointments are due.

5. In view of above, the existing provisions regarding appointments of Vice-Chancellors and Pro-Vice-Chancellors contained in the said **State Acts relating to universities needs to be amended suitably so as to make them in consonance with the UGC Regulations."** या अध्यादेशाचे आता अधिनियमामध्ये रूपांतर झाले असून सन २०२३ चा महाराष्ट्राचा अधिनियम क्रमांक ६ असे त्याचे क्रमांकन झाले आहे. (22/2023) हा अधिनियम दिनांक ११ जानेवारी २०२३ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्राच्या असाधारण भाग क्रमांक ६ मध्ये प्रसृत करण्यात आला आहे. आणि;

**६.** महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक ८ मार्च २०१९ रोजी २०१८ च्या रेग्युलेशनची अंमलबजावणी करणारा शासननिर्णय (No. Misc-2018/C.R.56/18/UNI-1) निर्गमित केला. *(यापुढे उल्लेख* ***'शासननिर्णय'*** *असा)* या शासननिर्णयात अनेक तरतुदी या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनशी विसंगत आहेत. भारतीय संविधानाच्या कलम २५४ चा सतत होत असलेला भंग व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची सतत होणारी अवहेलना करण्याचा उच्च शिक्षण विभागाकडून होत असलेला अपराध टाळण्याच्या दृष्टीने संविधानातील तरतुदीशी सुसंगत व सर्वोच्च न्यायालयाने कायद्याचा निश्चित केलेला अर्थ लक्षात घेता

"If any provision of a **Government Resolution** is repugnant to any provision of the UGC Regulations 2018 then the provision of **UGC Regulation 2018** shall prevail and provision in the Government Resolution shall, to the extent of the repugnancy, be void." अशी तरतूद समाविष्ट असलेला शासननिर्णय ताबडतोबीने निर्गमित करण्यात यावा अशी या महासंघाची मागणी आहे.

**७. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे व संविधानातील तरतुदीनुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन्सशी राज्यशासनाचा कायदा किंवा शासननिर्णय विसंगत असू शकत नाही ही भूमिका महाराष्ट्र राज्याच्या मा.राज्यपालांनी व मंत्रीमंडळाने मान्य केलेली असून त्याप्रमाणे राज्याच्या कायद्यात दुरुस्त्या केलेल्या आहेत. मात्र उच्च शिक्षण विभागातील अधिकारी ही भूमिका मान्य करायला तयार नसल्यामुळे शासननिर्णयातील विसंगत तरतुदी अजूनही जिवंत आहेत** अशी ही स्थिती आहे. ही स्थिती संपुष्टात आणण्यासाठी एकतर पूर्व परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे शासननिर्णय काढला पाहिजे किंवा भविष्यातील फार मोठा गोंधळ टाळण्याच्या दृष्टीने तातडीने दुरुस्त्या केल्या पाहिजेत.

**८.** ह्या तातडीच्या बाबी कोणत्या याचे तपशील पुढीलप्रमाणे :-

**(1) (A) निवड समितीची रचना :** निवड समितीची रचना ही विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन्सच्या परिच्छेद ५ मध्ये नमूद (60/18) केलेली असून ती पुढीलप्रमाणे आहे :-

**"V. Assistant Professor in Colleges, including Private and Constituent Colleges:**

(a) The Selection Committee for the post of Assistant Professor in Colleges, including Private and constituent Colleges shall consist of the following persons:

i) Chairperson of the Governing Body of the college or his/her nominee from amongst the members of the Governing body, who shall be the Chairperson of the Committee.

ii) The Principal of the College.

**The fixed emoluments paid to such contract teachers should not be less than the monthly gross salary of a regularly appointed Assistant Professor.** *( परिच्छेद ८ (३) (A) पहा )*

***मा.सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेले विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनचे श्रेष्ठत्व महाराष्ट्राच्या मा.राज्यपालांनी व मंत्रीमंडळाने मान्य केले असतांना तसे करण्यास आढ्यताखोरपणे उच्च शिक्षण विभागातील अधिकारी नकार देतात हा शिरजोरपणाचा प्रकार आहे. ''९० टक्के जागा भरल्याच पाहिजेत'' तसेच ''निवड समित्या ह्या रेग्युलेशनप्रमाणेच असल्या पाहिजेत'' या मा.सर्वोच्च न्यायालयाने निश्चित करून दिलेल्या कायद्याच्या अंतिम अर्थाचे पालन न करणे हे न्यायालयाचा अवमान करणारे कृत्य होय.***

*( परिच्छेद २० पहा )*

iii) Head of the Department/Teacher-incharge of the subject concerned in the College.

iv) Two nominees of the Vice-Chancellor of the affiliating university, of whom one should be a subject-expert. In case of colleges notified/declared as a minority educational institution, two nominees of the Chairperson of the college from out of a panel of five names, preferably from the minority community, recommended by the Vice-Chancellor of the affiliating university, from the list of experts suggested by the relevant statutory body of the college, of whom one should be a subject-expert.

v) Two subject-experts not connected with the college who shall be nominated by the Chairperson of the College governing body out of a panel of five names recommended by the Vice-Chancellor from the list of subject experts approved by the relevant statutory body of the university concerned. In case of colleges notified/declared as minority educational Institutions, two subject experts not connected with the University nominated by the Chairperson of the Governing Body of the College out of the panel of five names, preferably from the minority communities, recommended by the Vice-Chancellor from the list of subject experts approved by the relevant statutory body of the College.

vi) An academician representing SC/ST/OBC/Minority/ Women/Differently-abled categories, if any of candidates belonging to any of these categories is the applicant, to be nominated by the Vice-Chancellor, if any of the above members of the selection committee does not belong to that category.

(b) Five members, including two outside subject experts, shall constitute the quorum."

**(1) (B)** शासननिर्णयाच्या परिच्छेद ६ मध्ये या निवड समितीची व्यवस्था नमूद केलेली असून ती पूर्णपणे *(102/18)* रेग्युलेशनशी विसंगत आहे. यामध्ये तातडीने दुरुस्ती होणे आवश्यक आहे. **रेग्युलेशन्सशी विसंगत निवड समिती आज सर्वत्र कार्यरत असून या बेकायदेशीर निवड समितीच्या वतीने निवड न झालेले अनेक उमेदवार न्यायालयात गेलेले आहेत. ही बाब सर्वत्र जाहीर झाल्यामुळे हे प्रमाण पुढे वाढत जाईल.** परिणामी अस्थिरतेचे वातावरण उच्च शिक्षण क्षेत्रात निर्माण झाले असून उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या हट्टामुळे न्यायालयात शासनावर या भूमिकेमुळे मोठीच नामुष्की ओढवेल.

**(2) (A) एम.फील. आणि पीएच.डी. धारकांच्या प्रोत्साहनपर वेतनवाढी** : विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन्सच्या परिच्छेद १९ मध्ये Other Terms and Conditions नमूद केल्या असून त्या परिच्छेदातील *(75/18)* पहिला व दुसरा उपपरिच्छेद शब्दशः पुढीलप्रमाणे आहे. :-

**"19.1 Incentives for Ph.D./M.Phil. and other Higher Qualification**

i. Five non-compounded advance increments shall be admissible at the entry level of recruitment as Assistant Professor to persons possessing the degrees of Ph.D. awarded in a relevant discipline by the University following the process of admission, registration, course work and external evaluation as prescribed by the UGC.

ii. M.Phil degree holders at the time of recruitment to the post of Assistant Professor shall be entitled to two noncompounded advance increments."

PRC च्या स्तरावर याबाबत प्रथम विचार झाला. त्यानंतर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या स्तरावर याबाबत निर्णय झाला. त्यानंतर Draft Regulations जाहीर करण्यात आले. त्यावर देशभरातून आलेल्या हरकती व सूचना तज्ज्ञ समितीने विचारात घेतल्यावर आयोगाचे अंतिम नोटीफिकेशन केंद्रशासनाकडे पाठविण्यात आले. केंद्रीय मंत्रीमंडळाने मान्यता दिल्यावर दिनांक १८ जुलै २०१८ रोजीच्या भारत शासन राजपत्रात ते प्रख्यापित करण्यात आले.

**(2) (B)** महाराष्ट्राच्या शासननिर्णयामध्ये *(53/18)* याबाबतीत अत्यंत विसंगत व्यवस्था नमूद करण्यात आली असून ती पुढीलप्रमाणे :-

**"12.0. Incentives for Ph.D./M.Phil. and other Higher Qualification :** The incentive structure is built-in in the pay structure itself, wherein those having Ph.D/M.Phil/ PG Degree in Professional Courses will progress faster under CAS. Therefore, there shall be no incentives in form of advance increments for obtaining these degrees." ही तरतूद कोणत्याही प्रक्रियेतून उदयास आलेली नाही. तर उच्च शिक्षण क्षेत्राविषयी घृणास्पद भावना मनात बाळगणाऱ्या एखाद्या व्यक्तीच्या 'जनरल नॉलेज' मधून बाहेर ओकल्या गेलेले ते 'लोकल प्रॉडक्शन' या स्वरूपाचे रसायन आहे.

**(3) (A) ९० टक्के जागा भरण्याची सक्ती** : विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन्समध्ये विद्यापीठातून व महाविद्यालयातून कंत्राटी भरती व कायमस्वरूपी भरती याबाबतचे काटेकोर नियम *(73/18)* ठरवून दिलेले आहेत. त्या नियमाप्रमाणे कोणत्याही परिस्थितीत कंत्राटी पद्धतीने भरावयाच्या जागा १० टक्के पेक्षा जास्त असता कामा नये असे बंधनकारक केलेले आहे. ते शब्दशः पुढीलप्रमाणेः-

**"13.0 Appointments on Contract Basis :** The teachers should be appointed on contract basis only when it is absolutely necessary and when the student teacher ratio does not satisfy the laid-down norms. **In any case, the number of such appointments should not exceed 10% of the total number of faculty positions in a College/University.** The qualifications and selection procedure for appointing them should be the same as those applicable to a regularly-appointed teacher. **The fixed emoluments paid to such contract teachers should not be less than the monthly gross salary of a regularly appointed Assistant Professor.** Such appointments should not be made initially for more than one academic session, and the performance of any such entrant teacher should be reviewed for academic performance before reappointing him/her on

***न केलेल्या खर्चाची केंद्रशासनाकडून प्रतिपूर्ती मिळविणे हा फसवणुकीच्या स्वरूपाचा फौजदारी गुन्हा आहे. चौकशी करून अशा गुन्हेगारी स्वरूपाच्या कृत्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात यावे अशी या महासंघाची मागणी आहे.***

*( परिच्छेद १६ पहा )*

**Finally, we are constrained to note our great dismay, even displeasure, at the manner in which the State Government persists in raking up the same defence again and again. We do not know how many times this Court has to pronounce the law.** *( परिच्छेद १०७ पहा )*

contract basis for another session. Such appointments on contract basis may also be resorted to when absolutely necessary to fill vacancies arising due to maternity leave, child-care leave, etc."

**(3) (B)** शासननिर्णय निर्गमित करणाऱ्यांना ही बाब महत्त्वाची वाटली नाही व त्यामुळे याबाबतीत शासननिर्णयात कोणतीही तरतूद नाही. **दरम्यान ९० टक्के जागा ह्या कायम तत्त्वावर भरल्याच पाहिजेत हा विद्यापीठ अनुदान आयोगाचा नियम ही सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेली कायद्याची अंतिम सुस्थापित स्थिती आहे.** रेग्युलेशनने ठरवून दिल्याप्रमाणेच त्या कंत्राटी शिक्षकांना वेतन देण्यात यावे अशी या महासंघाची मागणी आहे. तसे न करणे हे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात आहे.

तत्कालीन उच्च शिक्षणमंत्री मा.श्री.विनोद तावडे यांनी दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला चर्चेसाठी बोलाविले होते. या चर्चेचे अधिकृत कार्यवृत्त दिनांक ८ ऑक्टोबर २०१८ रोजी महासंघाला देण्यात आले. त्यामध्ये शिक्षक भरतीबाबतचा उल्लेख शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"**मा. मंत्री यांचे निर्देश** :- प्राध्यापक भरतीवरील बंदी उठविण्याबाबत शासनाच्या उच्चाधिकार समितीनेही सहमती दिली असून याबाबत शिक्षकेतरची १०० टक्के पदे भरण्यास परवानगी दिली असून शिक्षकीय संवर्गाची ६० टक्के पदे भरायाला उच्च शिक्षण विभाग परवानगी मागत असून उरलेली ४० टक्के पदे तासिका तत्त्वावर भरण्यास तूर्त अनुमती मिळावी, ही तासिका तत्त्वावरील पदे भरतांना प्रत्येक अध्यापकास किमान १५ ते २० हजार मिळतील असे मानधन ठरविण्यात यावे. पुढील काळात ही पदे भरण्यात यावीत."

कबूल केल्याप्रमाणे दिनांक ३ नोव्हेंबर २०१८ रोजी याबाबतचा शासननिर्णय (*137/18*) निघाला व त्यानुसार काही शिक्षक भरती झालीसुद्धा. ६० टक्के पदे भरण्याचा निर्णय तत्कालीन उच्च शिक्षणमंत्र्यांनी घेतला. त्यानंतर सांवैधानिक दृष्ट्या बऱ्याच महत्त्वपूर्ण घटना घडलेल्या आहेत. **एक म्हणजे** गंभिरदन गढवी प्रकरणाचा - रेग्युलेशनच्या बंधनकारकतेबाबतचा - मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय दिनांक ३ मार्च २०२२ रोजी आला. **दुसरे म्हणजे** विसंगती असल्यास राज्यशासनाचा कायदा दुरुस्त करण्याची भूमिका महाराष्ट्राच्या मा.राज्यपालांनी मान्य करून वटहुकूम (Maharashtra Ordinane No. 13 of 2022) हा दिनांक २४ नोव्हेंबर २०२२ रोजी काढला. **तिसरे असे की,** राज्याच्या मंत्रीमंडळाने ही भूमिका मान्य करून अधिनियम (सन २०२३ चा अधिनियम क्रमांक ६) दिनांक ११ जानेवारी २०२३ रोजी प्रख्यापित केला. **त्यामुळे किमान ९० टक्के कायम शिक्षकांची भरती ही सर्वोच्च न्यायालय मान्य अशी कायद्याची सुस्थापित अंतिम स्थिती झालेली आहे. उपरोक्त तीन महत्त्वपूर्ण घटना घडल्यानंतर ९० टक्के जागा भरण्याचा निर्णय न घेणे हे पूर्णपणे घटनाबाह्य व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधातील कृत्य होय.**

**(4) (A) आश्वासित प्रगती योजनेचे (CAS) लाभ लागू होण्याची तारीख** : आश्वासित प्रगती योजनेचे लाभ हे केव्हापासून लागू व्हावेत याबाबत रेग्युलेशन्समध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे. :-

"**6.3 (VI)** The candidate shall offer himself/herself for assessment for promotion, if he/she fulfils the minimum grading specified in the relevant Assessment Criteria and Methodology Tables, by submitting an application and the required Assessment Criteria and Methodology Proforma. He/she can do so three months before the due date. The university shall send a general circular twice a year, inviting applications for the CAS promotions from the eligible candidates.

i) If a candidate applies for promotion on completion of the minimum eligibility period and is successful, **the date of promotion shall be from that of minimum period of eligibility."**

**(4) (B)** खरे म्हणजे केंद्राची ही योजना कोणत्याही प्रकारची सुधारणा न करता (without any modification) सर्व अटींचे पालन करून एक 'समग्र योजना' (Composite Scheme) म्हणून अंमलात आणावी लागेल या अटीवरच केंद्राचे ५० टक्के अर्थसाहाय्य मिळेल, ही माहिती असल्यामुळे उच्च शिक्षण विभागाने रेग्युलेशनमधील ही तरतूद दिनांक ८ मार्च २०१९ च्या शासननिर्णयामध्ये इमाने इतबारे जशीच्या तशी समाविष्ट केली होती. ती पुढीलप्रमाणे :-

"If a candidate applies for promotion on completion of the minimum eligibility period and is successful, **the date of promotion shall be from that of minimum period of eligibility."**

पण विद्यापीठ अनुदान आयोगाने याबाबतीत रेग्युलेशनमध्ये कोणताही बदल केलेला नसतांना लक्ष्मीदर्शनाची एक अतिरिक्त सुविधा उपलब्ध व्हावी म्हणून दिनांक १० मे २०१९ रोजी एक शासननिर्णय काढून एक नवे 'लोकल प्रॉडक्शन' निर्माण केले गेले. त्यामुळे ही तरतूद बदलली गेली. ती आता पुढीलप्रमाणे आहे.:-

"If a candidate applies for promotion from Level 10 to Level 11 and Level 11 to Level 12 on completion of the minimum eligibility period and is successful, **the date of promotion shall be from that of minimum period of eligibility for both Colleges and Universities.**

If a candidate applies for promotion from <u>level 12 to 13 A</u>

**This Court had laid down the law, and the pronouncement was not limited to the facts of any particular case. Yet, the government persists in the belief that the law declared by this court is somehow not binding on it, or that every judgment, no matter what the wording and even if it clearly lays down the law is confined to that particular petition. We are letting it pass this once, but if this is repeated we may well be moved to far sterner action.** *( परिच्छेद १०७ पहा )*

***मा.नागपूर खंडपीठाने (यापैकी ज्येष्ठ मा.न्यायमूर्ती पुढे सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश झालेत) याबाबतीत दिनांक २ जुलै २०१० रोजी दिलेला पहिला धोरणात्मक निर्णय विचारात घेऊन विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक १२ ऑगस्ट २०१० रोजी धोरणात्मक निर्णय घेतला. हे दोनही धोरणात्मक निर्णय विचारात घेऊन मा.औरंगाबाद द्विसदस्यीय खंडपीठाने (यापैकी ज्येष्ठ मा.न्यायमूर्ती पुढे सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती झालेत) दिनांक २० ऑक्टोबर २०१० रोजी दुसरा धोरणात्मक आदेश दिला. या गोष्टीला आता १२ वर्षाहून जास्त काळ झाला पण उच्च शिक्षण विभागाने अजूनही धोरणात्मक निर्णय निर्गमित केलेला नाही.***

*( परिच्छेद ३१ पहा )*

and Level 13A to Level 14 on completion of the minimum eligibility period and is successful, the date of promotion shall be **the date of selection by CAS for both Colleges and Universities.**

If a candidate applies for promotion from Level 14 to Level 15 in Universities on completion of the minimum eligibility period and is successful, **the date of promotion shall be the date of selection by CAS."**

हा बदल लहरीपणाचा आहे असे म्हणण्यापेक्षा तो रेग्युलेशनशी विसंगत आहे. त्यामुळेच तो असंवैधानिक आहे व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात आहे असे म्हणणे रास्त होईल.

**(5) (A) रिफ्रेशर कोर्सेसला मुदतवाढ :** रिफ्रेशर कोर्सेसच्या बाबतीत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन्समध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे. :-

**"6.3 VIII.** The requirement for Orientation course and Refresher course for promotions due under the CAS **shall not be mandatory upto 31st December, 2018."**

**(5) (B)** केंद्राची ही योजना कोणत्याही प्रकारची सुधारणा न करता (without any modification) सर्व अटींचे पालन करून एक 'समग्र योजना' (Composite Scheme) म्हणून अंमलात आणावी लागेल या अटीवरच केंद्राचे ५० टक्के अर्थसाहाय्य मिळेल, याची माहिती असल्यामुळे उच्च शिक्षण विभागाने रेग्युलेशनमधील ही तरतूद दिनांक ८ मार्च २०१९ च्या शासननिर्णयामध्ये जशीच्या तशी समाविष्ट केली होती. ती पुढीलप्रमाणे :-

"The requirement for Orientation course and Refresher course for promotions due under the CAS **shall not be mandatory up to 31st December, 2018."**

पण विद्यापीठ अनुदान आयोगाने याबाबतीत रेग्युलेशनमध्ये कोणताही बदल केलेला नसतांना दिनांक १० मे २०१९ रोजी एक शासननिर्णय काढून ही तरतूद 'लोकल प्रॉडक्शन'च्या द्वारे बदलून टाकली. ती आता पुढीलप्रमाणे आहे.:-

"The date for requirement of Orientation course and Refresher course for promotions due under the **CAS shall not be extended up to 31st December, 2018."**

हा बदल लहरीपणाचा आहे असे म्हणण्यापेक्षा तो रेग्युलेशनशी विसंगत आहे. त्यामुळेच तो असांवैधानिक आहे व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात आहे असे म्हणणे जास्त रास्त होईल.

**(5) (C)** अनेकदा प्लेसमेंट कमिटीच्या बैठका वेळेवर होत नाहीत. शिक्षक आश्वासित प्रगती योजनेच्या बढतीसाठी पात्र झाल्याची तारीख व स्थाननिश्चितीची तारीख यामध्ये बरेच अंतर पडते. त्यास्थितीत पात्रता धारण करण्याच्या तिथीपासूनच लाभ देण्यात यावा हे धोरण निश्चित करणारे आणखी एक Amending Regulation दिनांक ३१ जुलै २०२३ रोजी यूजीसीने काढलेले आहे. त्यामध्ये याबाबतीत पुढीलप्रमाणे खुलासा आहे. :-

"6.3 The criteria for promotions under Career Advancement Scheme laid down under these Regulations shall be effective from the date of notification of these Regulations. However, to avoid hardship to those faculty members who have already qualified or are likely to qualify within six months (till 17th January, 2019) as per the UGC Regulations on *Minimum Qualifications for Appointment of Teachers and other Academic staff in Universities and Colleges and other Measures for the Maintenance of Standards in Higher Education, 2010,* a choice may be given to them either, for being considered for promotions under the 2010 or 2018 Regulations. **This option can be exercised only up to 31st December 2023 and the date of eligibility shall be retained as the date of promotion.** On the date of submission of the application, the candidate should fulfil all eligibility criteria required for promotion."

"6.3 (viii) Wherever the requirement of the Orientation Course (OC)/Refresher Course (RC) has remained incomplete, the promotions would not be held up, but these requirements should be fulfilled by 31st December 2023 or as notified by the Commission from time to time."

**९.** विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या लागू करण्याबाबतचा सातव्या वेतन आयोगाशी समकक्ष वेतनश्रेण्यांचा प्रस्ताव केंद्रशासनाच्या मानव संसाधन विभागाने दिनांक २ नोव्हेंबर २०१७ रोजी सर्व राज्यांकडे पाठविला. या आदेशामध्ये "तुम्ही हा आदेश अंमलात आणला तर ५० टक्के भार केंद्रशासन सहन करील" असे नमूद होते. मात्र त्याबाबतची सर्वात महत्त्वाची अट याच आदेशाच्या परिच्छेद 16. (h) मध्ये पुढीलप्रमाणे नमूद होती :-

"(h) Payment of Central assistance for implementing this Scheme is also subject to the condition **that the entire Scheme of revision of pay scales, together with all the conditions to be laid down by the UGC by way of Regulations and other guidelines shall be implemented by Stale Governments and Universities and Colleges coming under their jurisdiction as a composite scheme without any modification** except in regard to the date of implementation and pay scales mentioned herein

***दिनांक १० मार्च २०१६ च्या शासननिर्णयाने स्थापन करण्यात आलेली समिती या बाबतीत न्यायिक कसोटीवर टिकणारी नाही. न्यायिक कामासाठी शासकीय अधिकाऱ्यांना नेमू नये असा मा.उच्च न्यायालयाचा निर्णय असतांना अर्धा डझनाच्यावर शासकीय अधिकारी या विशेष समितीवर सदस्य म्हणून नेमलेले आहेत. न्यायिक कामासाठी व्यक्तींची नेमणूक करतांना विद्यापीठाशी किंवा विद्यापीठाच्या कुलगुरुंशी सल्लामसलत करण्याची गरज नाही असा मा.उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला असताना सर्व विद्यापीठांच्या कुलगुरुंना या समितीवर सदस्य म्हणून नेमले आहे.***

*( परिच्छेद ८२ पहा )*

***केंद्रशासनाच्या अधिसूचनेमध्ये नमूद असलेली दोन पत्रे व दिनांक १८ जुलै २०१८ रोजीचे विद्यापीठ अनुदान आयोगाचे रेग्युलेशन्स यांची समग्र योजना म्हणून महाराष्ट्रात अंमलबजावणी करण्यात आलेली आहे, असे सांगून हा निधी आणण्याचा प्रकार एक घोर फसवणुकीचा प्रकार आहे. त्या समग्र योजनेतील अनेक अटींचा महाराष्ट्रात भंग करण्यात आला असून स्वतःच्या पदरच्या अनेक अटी अधिकाऱ्यांनी त्या शासननिर्णयामध्ये टाकल्या आहेत.***

*( परिच्छेद १२ पहा )*

above." केंद्राची ही योजना कोणत्याही प्रकारची सुधारणा न करता (without any modification) **सर्व अटींचे पालन करून एक 'समग्र योजना' (Composite Scheme) म्हणून अंमलात आणावी लागेल या अटीवरच केंद्राचे ५० टक्के अर्थसाहाय्य मिळेल, अशी ही तरतूद आहे. प्रत्यक्षात अनेक अटींची मोडतोड करून "आम्ही समग्र योजना जशीच्या तशी अंमलात आणली आहे" असे केंद्राला सादर करून तेथून १३२१ कोटी रुपये आणण्याचे कृत्य हे चोरी चपाटीच्या सदरात मोडणारे कृत्य होय.**

**१०.** महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळासमोर केंद्राची ही सारी कागदपत्रे ठेवण्यात आलीत. दिनांक ५ मार्च २०१९ रोजी राज्य मंत्रीमंडळाने बैठक क्रमांक २१५ मध्ये या विषयावर घेतलेला निर्णय मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या कार्यालयातील जनसंपर्क कक्षाने अधिकृतपणे त्याच दिवशी जाहीर केला. तो शब्दशः पुढीलप्रमाणेः-

"सातवा वेतन आयोग लागू केल्यामुळे अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील सुमारे २६ हजार ७४१ शिक्षक व शिक्षक समकक्ष पदावरील कर्मचाऱ्यांना याचा लाभ होणार आहे. वेतन आयोगातील तरतुदी १ जानेवारी २०१६ पासून लागू केल्याने ३१ मार्च २०१९ पर्यंत २५८४ कोटी ४७ लाख एवढा वाढीव खर्च येणार असून **त्यामध्ये राज्य शासनाचा ५० टक्के हिस्सा व केंद्र शासनाचा ५० टक्के हिस्सा आहे. या खर्चास मान्यता देण्यात आली असून** १ एप्रिल २०१९ नंतर येणाऱ्या ८०० कोटी रुपयांच्या वाढीव **खर्चासही मान्यता देण्यात आली आहे.**"

**११.** मंत्रीमंडळाच्या निर्णयाचा हा मसुदा काळजीपूर्वक वाचला तर त्यात पुढील निर्णय मंत्रीमंडळाने घेतल्याचे स्पष्टपणे दिसून येते. (१) विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना थकबाकी अदा करण्यापोटी येणाऱ्या एकूण २५८४ कोटी ४७ लाख रुपयाच्या एकूण खर्चाला मान्यता देण्यात आलेली आहे. (२) हा खर्च केल्यावर त्यापैकी ५० टक्के रक्कम (म्हणजे जवळ जवळ तेराशे कोटी रुपये) केंद्रशासनाकडून अर्थसाहाय्य म्हणून मिळणार आहे. या बाबीलासुद्धा मंत्रीमंडळाने मान्यता दिली. केंद्राची ही योजना कोणत्याही प्रकारची सुधारणा न करता (without any modification) सर्व अटींचे पालन करून एक 'समग्र योजना' (Composite Scheme) म्हणून अंमलात आणावी लागेल या अटीवरच केंद्राचे ५० टक्के अर्थसाहाय्य मिळेल, याची माहिती असतांना मंत्रीमंडळाने घेतलेला हा निर्णय आहे.

**१२. उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी "समग्र योजना" बासनात गुंडाळून ठेवली व दिनांक ८ मार्च २०१९ रोजीचा शासननिर्णय निर्गमित केला. आपल्या सोईनुसार 'अर्थपूर्ण चर्चा' करण्याच्या अनेक संधी व 'लक्ष्मीदर्शनाची अनेक आवर्तने' काढण्याच्या सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या अनेक अटी 'लोकल प्रॉडक्शन'च्या स्वरूपात त्या शासननिर्णयामध्ये घुसाडल्या व 'नॅशनल प्रॉडक्शन' विद्रुप करून ठेवले.** केंद्रीय योजनेमध्ये आपल्या आवडीच्या अनेक अटी घुसडल्या एवढ्यावरच उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची बहादुरी संपत नाही. खरी बहादुरी त्यापुढे आहे. ही एवढी सारी योजनेची मोडतोड करून ५० टक्केचा केंद्रशासनाचा हिस्सा म्हणून जवळ जवळ १३२१ कोटी रुपयांचा निधी आणण्यात हे अधिकारी यशस्वी झाले ही खरी बहादुरी आहे. **केंद्रशासनाच्या अधिसूचनेमध्ये नमूद असलेली दोन पत्रे व दिनांक १८ जुलै २०१८ रोजीचे विद्यापीठ अनुदान आयोगाचे रेग्युलेशन्स यांची समग्र योजना म्हणून महाराष्ट्रात अंमलबजावणी करण्यात आलेली आहे, असे सांगून हा निधी आणण्याचा प्रकार एक घोर फसवणुकीचा प्रकार आहे. त्या समग्र योजनेतील अनेक अटींचा महाराष्ट्रात भंग करण्यात आला असून स्वतःच्या पदरच्या अनेक अटी अधिकाऱ्यांनी त्या शासननिर्णयामध्ये टाकल्या आहेत.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने अनेक निवेदने सादर करून ह्या त्रुटी उच्च शिक्षण विभागाच्या लक्षात आणून दिल्या व त्याबाबतीत चर्चा करण्यासाठी वेळ मागितली. पण त्याला कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.

**१३. एका बाजूला समग्र योजनेतील अटीशर्तींची मोडतोड करून व दुसऱ्या बाजूला प्रत्यक्षात न केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती मिळवून उच्च शिक्षण विभागातील या अधिकाऱ्यांनी भारताच्या मा.राष्ट्रपतींची व केंद्रीय मंत्रीमंडळाची घोर फसवणूक करण्याचे अपकृत्य केलेले आहे. अशाप्रकारे मा.राष्ट्रपतींची व केंद्रीय मंत्रीमंडळाची फसवणूक करण्यात अपराधी असलेल्या अधिकाऱ्यांवर चौकशी करून कठोर कारवाई करण्यात यावी अशी या महासंघाची मागणी आहे.**

**१४.** गेल्या काही वर्षात उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची हिंमत इतकी वाढली की, देशाच्या मा. राष्ट्रपतींची व केंद्रशासनाची व राज्यमंत्रिमंडळाची फसवणूक करण्याचा प्रकार सुद्धा यातून घडला असे स्पष्टपणे दिसून येते. तो प्रकार पुढीलप्रमाणे :- केंद्रशासनाच्या मानव संसाधन विभागाने दिनांक २६ सप्टेंबर २०१९ रोजी "Reimbursement of central share for implementation of the scheme of revision of pay scales (7th CPC) of university and college teachers to the Govt. of Maharashtra-reg." या विषयावर एक शासकीय अधिसूचना (F.No.1-7/2019-U.II) निर्गमित केली ***(यापुढे उल्लेख केंद्रशासनाची अधिसूचना असा)*** असून या अधिसूचनेतील परिच्छेद ३ पुढीलप्रमाणे आहेः-

**"3. The sanction of the President is hereby accorded to the payment of Rs.1320,93,04,503/- (Rupees Thirteen Hundred Twenty Crore Ninety Three Lakh Four Thousand Five Hundred Three only)** to State Government of Maharashtra to enable it to meet additional expenditure involved in implementation of the Scheme during the period from 01.01.2016 to 31.03.2019. **This amount would be utilized by the State Govt. in accordance with the terms and conditions stipulated in this Department's letter referred to above."**

**१५. जवळ जवळ १३२० कोटी ९३ लक्ष रुपयांचा निधी महाराष्ट्र शासनाच्या सुपूर्त करण्यास भारताच्या मा. राष्ट्रपतींनी मान्यता दिली. त्याप्रमाणे तो निधी महाराष्ट्र शासनाच्या सुपूर्त करण्यात आला. केंद्रशासनाच्या पत्रात नमूद असलेल्या अटी व शर्तीनुसारच वापर केला जाईल या अटीवर हा निधी मंजूर करण्यात आला आहे,** असेही या अधिसूचनेत स्पष्टपणे नमूद आहे. घटनाशास्त्राच्या प्रत्येकच विद्यार्थ्याला याची कल्पना असते की, केंद्रीय मंत्रीमंडळाने मान्यता देऊन प्रस्ताव पाठविल्यानंतरच भारताचे मा.राष्ट्रपती त्यावर शिक्कामोर्तब करतात. केंद्रीय मंत्रीमंडळाने या रकमेला मान्यता दिलेली आहे. अशी मान्यता दिली असल्याबाबतचा स्पष्ट उल्लेख २६ सप्टेंबर २०१९ च्या केंद्रशासनाच्या या अधिसूचनेच्या परिच्छेद १ मध्ये आहे. तो पुढील शब्दातः-

"The Central Government had decided to provide financial assistance to State Governments opting to revise pay scales of teachers and other equivalent cadre, as per above said letters of this Department, by way of reimbursement, to the extent of

***एका बाजूला समग्र योजनेतील अटीशर्तींची मोडतोड करून व दुसऱ्या बाजूला प्रत्यक्षात न केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती मिळवून उच्च शिक्षण विभागातील या अधिकाऱ्यांनी भारताच्या मा.राष्ट्रपतींची व केंद्रीय मंत्रीमंडळाची घोर फसवणूक करण्याचे अपकृत्य केलेले आहे. अशाप्रकारे मा.राष्ट्रपतींची व केंद्रीय मंत्रीमंडळाची फसवणूक करण्यात अपराधी असलेल्या अधिकाऱ्यांवर चौकशी करून कठोर कारवाई करण्यात यावी अशी या महासंघाची मागणी आहे.***

*( परिच्छेद १३ पहा )*

***समितीच्या मंत्रालयातील बैठकीमध्ये ''नो वर्क नो पे हा निर्णय येथे लागू पडत नाही'' असा सभेत उपस्थित राहून एकमताने निर्णय घेणाऱ्या दोन अधिकाऱ्यांनी (उच्च शिक्षण सचिव व उच्च शिक्षण संचालक) त्या निर्णया विरुद्ध सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल केली.*** ( परिच्छेद ५६ पहा )

50% (fifty percent) of the additional expenditure involved in the implementation of the pay revision, for the universities, colleges and other higher educational institutions funded by the State Government, **for the period from 01.01.2016 to 31.03.2019, subject to fulfillment of prescribed terms and conditions."**

**१६.** राज्यशासनाने थकबाकी अदा केल्यानंतर ५० टक्के रकमेच्या प्रतिपूर्तीचा प्रस्ताव विहित नमुन्यामध्ये केंद्रशासनाकडे सादर करावयाचा आहे, असेही या अधिसूचनेमध्ये नमूद आहे. ते पुढील शब्दात :-

"(c) The **proposal for reimbursement** on account of pay revision in State funded universities, colleges and other higher educational institutions shall be submitted in the prescribed format by the State Governments."

प्रतिपूर्ती ही (Reimbursement) प्रत्यक्ष केलेल्या खर्चाची होत असते. मा.सर्वोच्च न्यायालयाने अनेक प्रकरणात या शब्दाचा अर्थ ठरवून दिला आहे तो पुढीलप्रमाणे :-

"Reimbursement has to mean and imply restoration of an equivalent for something paid or expended. Reimbursement presupposes previous payment." - *Tata Iron & Steel Co. Ltd. V. Union of India, (2001) 2 SCC 41 (50) : 2000 (8) Supreme 73: 2000 (8) SCALE 3: JT 2000 (Supp-3) SC 428: AIR 2000 SC 3706: 2000. (Supp-5) SCR 228: 2000 (8) SLT 625: 2001 (1) SRJ 156.*

**न केलेल्या खर्चाची केंद्रशासनाकडून प्रतिपूर्ती मिळविणे हा फसवणुकीच्या स्वरूपाचा फौजदारी गुन्हा आहे. चौकशी करून अशा गुन्हेगारी स्वरूपाच्या कृत्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात यावे अशी या महासंघाची मागणी आहे.**

**१७. केंद्रशासनातर्फे हे जे साहाय्य दिले जात आहे, हे केंद्राची संपूर्ण योजना (Entire Scheme) एक "समग्र योजना" (Composite Scheme) म्हणून कोणताही बदल न करता सर्व अटी व शर्तीसह व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन्ससह राज्यशासनाला अंमलात आणावी लागेल या अटीवरच देण्यात येत आहे, असाही स्पष्ट उल्लेख केंद्रशासनाच्या अधिसूचनेच्या परिच्छेद 4 च्या उपपरिच्छेद (h) मध्ये आहे.** तो पुढील शब्दातः-

"(h) Payment of Central assistance for implementing this Scheme is also subject to the condition that the **entire Scheme of revision of pay scales, together with all the conditions to be laid down by the UGC by way of Regulations and other guidelines shall be implemented by State Governments and Universities and Colleges coming under their jurisdiction as a composite scheme without any modification..."**

**१८. केंद्रशासनाच्या दिनांक २ नोव्हेंबर २०१७ व ८ नोव्हेंबर २०१७ या तारखांच्या दोन पत्रांमधील तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १८ जुलै २०१८ च्या रेग्युलेशन्समधील अटी व शर्ती यांचे पूर्णपणे पालन केल्या जाईल, या अटीवरच हे अनुदान देण्यात येत आहे, असा एक स्वतंत्र परिच्छेद केंद्राच्या अधिसूचनेमध्ये आहे.** तो परिच्छेद ५ पुढीलप्रमाणे आहे:-

"5. The grant is further subject to the terms and conditions stipulated in this Ministry's letter No.1-7/2015-U.II(1) dated 2nd November, 2017 & 8th November, 2017 and subsequent instructions/clarifications, if any, issued from time to time and UGC's Notification dated 18th July, 2018."

**१९.** राज्याला हा निधी मंजूर करणाऱ्या केंद्रशासनाच्या या अधिसूचनेची प्रत महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे सचिव यांना अग्रेषित करण्यात आली असून या अधिसूचनेच्या परिच्छेद ४ व ५ मध्ये नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती समाविष्ट असलेली योजना राज्यातर्फे जशीच्या तशी अंमलात आणल्या जाईल, या अटीवरच हे अर्थसहाय्य देण्यात आलेले आहे, असे स्पष्टपणे बजावण्यात आलेले आहे. ते पुढील शब्दात :-

"Copy to (1) The Secretary, Higher and Technical Education Department, Govt. of Maharashtra, 411, Mantralaya Annexe, Hutatma Rajguru Chowk, Mumbai - 400 032. It may kindly be noted that implementation of the Scheme of revision of pay scales for teachers and other equivalent cadres in universities/ colleges in Maharashtra shall be subject to the conditions stipulated in Para 4 and 5 of this sanction letter as well as those laid down in the guidelines/regulations/orders that may be issued by the Government of India/UGC in this behalf from time to time."

**२०. मा.सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेले विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनचे श्रेष्ठत्व महाराष्ट्राच्या मा.राज्यपालांनी व मंत्रीमंडळाने मान्य केले असतांना तसे करण्यास आढ्यताखोरपणे उच्च शिक्षण विभागातील अधिकारी नकार देतात हा शिरजोरपणाचा प्रकार आहे. "९० टक्के जागा भरल्याच पाहिजेत" तसेच "निवड समित्या ह्या रेग्युलेशनप्रमाणेच असल्या पाहिजेत" या मा.सर्वोच्च न्यायालयाने निश्चित करून दिलेल्या कायद्याच्या अंतिम अर्थाचे पालन न करणे हे न्यायालयाचा अवमान करणारे कृत्य होय. भारताच्या मा.राष्ट्रपतींची, केंद्रीय मंत्रीमंडळाची व राज्य मंत्रीमंडळाची या अधिकाऱ्यांनी उघडउघड फसवणूक करणे हे अत्यंत लज्जास्पद कृत्य होय. या सर्व बाबींची चौकशी करण्यात यावी व जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी या महासंघाची मागणी आहे.**

***समितीच्या बैठकीमध्ये एकमताने ''नो वर्क नो पे हा निर्णय येथे लागू पडत नाही'' असा निर्णय झाला होता. वित्त सचिव त्या बैठकीला हजर होते. नेमके त्याविरुद्ध ''नो वर्क नो पे या तत्वानुसारच निर्णय करावा लागेल, उच्च शिक्षण विभागाचा प्रस्ताव मान्य करता येत नाही'' असे मत मांडणारी त्यांची टिपणी मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आली. उपरोक्त तीनही वरिष्ठ अधिकाऱ्यांचे हे कृत्य प्रशासनाचा अत्यंत क्षुद्र दर्जा दर्शविणारे म्हणावे लागेल.*** (परिच्छेद ५६ पहा)

***मा.सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या तत्त्वांचा विचार करता शासनाने प्राचार्य किंवा सरकारी अधिकाऱ्यांच्या संवर्गांतून पीठासीन अधिकाऱ्यांच्या नेमणुका करू नये असे स्पष्ट आदेश या निर्णयाच्या परिच्छेद ९ मध्ये नमूद आहेत.*** ( परिच्छेद ८० पहा )

## *(२)*
## *मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतरही एम.फील. धारकांचा छळ सुरुच*

**२१. "जुलै २००९ पूर्वी ज्यांनी एम.फील. पदवी प्राप्त केली त्यांना नेट-सेटची पात्रता सेवेत भरती होतांना अथवा आश्वासित प्रगती योजनेच्या प्रयोजनार्थ लागू होत नाही त्यांना CAS चे लाभ नेमणुकीच्या दिवसापासून द्यावे लागतील"** असे निर्णय एका मागून एक मा.उच्च न्यायालयाच्या अनेक खंडपीठांनी दिले. याबाबतीत पहिला निर्णय **SUDHIR SHARADRAO HUNGE** (In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench, Nagpur, Writ Petition No.1489/2010, Date of Judgment : 02.07.2010) या प्रकरणातील आहे. **जुलै २०१० मध्ये झालेल्या मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाला तातडीने ऑगस्ट २०१० मध्ये बैठक घेऊन धोरणात्मक निर्णय करावा लागला.** सदरहू प्रकरणामध्ये निरनिराळ्या २६ याचिका मा. खंडपीठाने एकत्रितरीत्या सुनावणीला घेतल्या व एकत्रच दिनांक २ जुलै २०१० रोजी या प्रकरणी निर्णय दिला. या २६ याचिकांमध्ये एकूण याचिकाकर्त्यांची संख्या ३५ च्या वर आहे. यातील प्रत्येक याचिकाकर्ता विधिवतरीत्या निवड समिती मार्फत निवड होऊन सेवेत आलेला आहे व त्यातील प्रत्येक याचिकाकर्ता हा एम.फील. पदवी धारक आहे.

**२२.** मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयाच्या परिच्छेद ६ मध्ये याबाबतची वस्तुस्थिती पुढील शब्दात नमूद केलेली आहे. :-

"It is not in dispute that before 11.7.2009 i.e. the date on which the University Grants Commission prescribed compulsory NET/SLET qualification for the recruitment and appointment of lecturers in Universities/Colleges/Institutions, there was exemption to the candidates possessing M.Phil. degree by virtue of UGC (Minimum Qualifications required for the appointment and Career Advancement of teachers in Universities and Institutions affiliated to it) (2nd Amendment), Regulation 2006 dated 14.6.2006 (hereinafter referred to as "second amendment')."

**२३.** या प्रकरणामध्ये मा.खंडपीठासमोर काय प्रश्न निर्णयासाठी आहे? याचा स्पष्ट उल्लेख उच्च न्यायालयाच्या या निर्णयाच्या परिच्छेद २ मध्ये आहे. तो पुढील शब्दात :-

"All these writ petitions are being disposed of by this common judgment and order in view of the common question of law involved therein. The question of law that falls for consideration is as under:

Whether introduction of NET/SLET as eligibility condition for recruitment and appointment of Lecturers in Universities/ Colleges/Institutions as per Gazette Notification dated 11.7.2009 prescribed by University Grants Commission (UGC) will affect the selections and appointments made in accordance with the approved advertisements/notifications published before 11.7.2009 when the eligibility condition was not compulsory NET/SLET ?"

**२४.** मा. खंडपीठाने याबाबतीत स्वतःच वरप्रमाणे प्रश्न उपस्थित करून सर्व बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन तसेच वस्तुस्थिती व कायद्याच्या प्रश्नाचा तपशीलवार ऊहापोह करून परिच्छेद ११ मध्ये याबाबतचा आपला निर्णय नोंदविला आहे. तो पुढील शब्दात :-

"For all the above reasons, therefore, we answer the question framed by us holding that the selections and **appointments made pursuant to the advertisements published in these writ petitions prior to 11.07.2009 shall not be affected by introduction of compulsory NET/SLET eligibility criteria** as the said gazette notification dated 11.07.2009 is prospective in nature....."

**२५.** मा. उच्च न्यायालयाने आपला हा निर्णय *(याला '**पहिला निर्णय**' म्हणू)* सर्वोच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या तीन निर्णयांच्या आधारावर दिलेला आहे व तसे आपल्या निर्णयात तपशीलाने नमूद केलेले आहे. ते तीन निर्णय पुढीलप्रमाणे:-

**(i)** Ashok Kumar Sharma and others...Versus...Chander Shekhar and another, reported in 1997 (4) Supreme Court Cases 18

**(ii)** Gopal Krushna Rath...Versus...M.A.A. Baig (Dead) By Lrs. and others, reported in 1999 (1) Supreme Court Cases 544

**(iii)** Madan Mohan Sharma and another...Versus...State of Rajasthan and others, reported in 2008 (3) Supreme Court Cases 724

**२६.** मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने या प्रकरणी दिनांक २ जुलै २०१० रोजी दिलेल्या **या निर्णयाच्या विरोधात राज्यशासनाने सर्वोच्च न्यायालयात SLP दाखल केली नाही. त्यामुळे मा. खंडपीठाच्या या निर्णयाला याबाबतीत "कायद्याचा अंतिम शब्द" हे स्थान प्राप्त झाले.** हे पाहून विद्यापीठ अनुदान आयोगाने १२ ऑगस्ट २०१० रोजी याबाबतीत धोरणात्मक निर्णय घेतला.

**२७.** मा.सर्वोच्च न्यायालयाच्या तीन निर्णयांच्या आधारे द्विसदस्यीय नागपूर खंडपीठाने (त्यापैकी एक न्यायमूर्ती पुढे मा.सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश झाले.) दिनांक २ जुलै २०१० रोजी दिलेल्या धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी करणारा शासननिर्णय उच्च शिक्षण विभागाने आजतागायत काढलेला नाही. ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे.

**२८.** यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाचा दुसरा धोरणात्मक निर्णय **ATUL SURESH PATIL** (In the High Court of Judicature at Bombay : Bench at Aurangabad, Writ Petition No. 357 of 2010, Date of Judgment : 20th October, 2010) हा होय. या प्रकरणामध्ये सुनावणी होत असतांना दिनांक १२ ऑगस्ट २०१० रोजीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या बैठकीचे कार्यवृत्त याचिकाकर्त्यातर्फे खंडपीठासमोर दाखल करण्यात आले होते. याचा उल्लेख न्यायालयाच्या निर्णयाच्या परिच्छेद ७ मध्ये नमूद आहे. तो पुढीलप्रमाणे:-

"Not only this but perusal of the Minutes of the 471st meeting of the UGC held on 12/8/2010 would also fortify the case of the petitioners. The copy of the said Minutes are produced by the petitioners. The same are taken on record and marked "X" for identification. It would be relevant to refer to relevant part of Resolution No.3 of the said meeting"

**२९.** एम.फील. पदवी बाबतचा विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय तपशीलवारपणे मा.उच्च न्यायालयाने आपल्या या निर्णयाच्या परिच्छेद ७ मध्ये उधृत केला व त्यानंतर परिच्छेद ८ मध्ये पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविलेला आहे.:-

"It can thus be seen that UGC itself has resolved that all the candidates who are possessing M.Phil on or before 1/7/2009 shall remain exempted from the requirement of NET for the purpose of appointment as Lecturer/Assistant Professor. It is not in dispute that all the petitioners are having a degree of

***मा.उच्च न्यायालयात काम करणाऱ्या सरकारी वकिलांनी व मा.सर्वोच्च न्यायालयात काम करणाऱ्या सरकारी वकिलांनी हे प्रकरण SLP दाखल करण्याच्या लायकीचे नाही असे सांगितल्यानंतरसुद्धा हट्टाने SLP दाखल करणारे कोण अधिकारी आहेत? याची चौकशी होऊन जबाबदारी निश्चित झाली पाहिजे.***

*( परिच्छेद ५२ पहा )*

***अशी फालतू प्रकरणे इकडे आणत जाऊ नका असा फटका मा.सर्वोच्च न्यायालयाने हाणला. तसे आदेश काढा असे राज्याच्या मुख्य सचिवांना आदेश दिले तरीही हा फालतुपणा डिसेंबर २०२३ पर्यंत सुरू ठेवण्यास व त्यानंतरही सुरूच ठेवण्यास कोण अधिकारी जबाबदार आहेत याची चौकशी झाली पाहिजे. जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे व या फालतुपणापोटी राज्यशासनावर पडलेला भूर्दंड जबाबदार अधिकाऱ्यांकडून व्यक्तिशः वसूल करण्यात आला पाहिजे अशी या महासंघाची मागणी आहे.***

*( परिच्छेद ५२ पहा )*

M.Phil before 10/7/2009."

**३०.** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांच्या आधारावर सुधीर हुंगे प्रकरणात (W.P.No. 1489 of 2010) मा. नागपूर खंडपीठाने दिनांक २ जुलै २०१० रोजी दिलेल्या निर्णयाचा तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाचा उल्लेख करून या निर्णयाच्या परिच्छेद ९ मध्ये मा. उच्च न्यायालयाने पुढीलप्रमाणे आदेश पारित केलेले आहेत. :-

"In that view of the matter, since it is an undisputed position that all the petitioners are having M.Phil qualification prior to 10/7/2009 and that in the advertisement, there was no requirement of compulsorily having the qualification of NET/SET, we find that the case of the present **petitioners is squarely covered by the judgment of the Division Bench of this Court at Nagpur Bench cited supra and also by the resolution of the UGC."**

**३१. मा.नागपूर खंडपीठाने (यापैकी ज्येष्ठ मा.न्यायमूर्ती पुढे सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश झालेत) याबाबतीत दिनांक २ जुलै २०१० रोजी दिलेला पहिला धोरणात्मक निर्णय विचारात घेऊन विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक १२ ऑगस्ट २०१० रोजी धोरणात्मक निर्णय घेतला. हे दोनही धोरणात्मक निर्णय विचारात घेऊन मा.औरंगाबाद द्विसदस्यीय खंडपीठाने (यापैकी ज्येष्ठ मा.न्यायमूर्ती पुढे सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती झालेत) दिनांक २० ऑक्टोबर २०१० रोजी दुसरा धोरणात्मक आदेश दिला. या गोष्टीला आता १२ वर्षाहून जास्त काळ झाला पण उच्च शिक्षण विभागाने अजूनही धोरणात्मक निर्णय निर्गमित केलेला नाही.**

**३२.** सन २०१० पासून पुढची १२-१३ वर्षे उच्च शिक्षण विभाग झोपा काढत होता असे कुणाला वाटेल, पण ते खरे नाही. "जो जें वांच्छील तो ते लाहो" या तत्वानुसार एक एका प्रकरणी 'गुणवत्ते'वर 'तपासून' निर्णय करण्याचा धोरणात्मक निर्णय या विभागाने घेतला होता. कारण अशा धोरणामुळे 'अर्थपूर्ण चर्चा' करण्याच्या संधी उपलब्ध राहतात. तसेच लक्ष्मी दर्शनाचे अनेक योग त्यातून उपलब्ध होतात. त्याचा परिणाम असा झाला की, शेकडो शिक्षकांना मा.उच्च न्यायालयात जाऊन न्याय मिळवावा लागला, अनेकांना न्यायालयात न जाता 'तसाच' न्याय मिळाला. आम्ही म्हणून त्याला देऊ, 'पूजाअर्चा' बरोबर केली नाही तर न देऊन न्यायालयात पाठवू, उच्च न्यायालयात न्याय मिळाल्यावरसुद्धा एखाद दुसऱ्याला सर्वोच्च न्यायालयात पाठवू. परिणामी उच्च शिक्षण क्षेत्रात सर्वत्र अराजकाचे वातावरण निर्माण झाले. अविधीमय मार्गाने जाणार नाही. जे काही मिळायचे असेल ते विधीमय मार्गानेच मिळवू, असा निर्धार केलेले मुंबई विद्यापीठ क्षेत्रातील १७ शिक्षक आजही मा.उच्च न्यायालयात सन २०२० ची याचिका क्रमांक (L) ७५०२ दाखल करून आहेत.

**३३.** जुलै २००९ पूर्वी एम.फील. पदवी धारण करणाऱ्या सेवेतील अनेक शिक्षकांना मा.उच्च न्यायालयाच्या धोरणात्मक निर्णयामुळे सर्व लाभ मिळाले. मात्र अशा अनेक शिक्षकांना CAS च्या लाभापासून वंचित ठेवण्यात आले. वारंवार मा.उच्च न्यायालयाचे अनेक निर्णय लक्षात आणून दिल्यावरही उच्च शिक्षण विभाग धोरणात्मक निर्णय निर्गमित करायला तयार नाही. अशा वेळी न्यायालयात धाव घेण्याशिवाय लाभवंचितांना कोणताही मार्ग शिल्लक राहत नाही. मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठांनी जो पहिला व दुसरा धोरणात्मक निर्णय दिला त्याला आधार धरून निरनिराळ्या खंडपीठांचे २० ते २५ निर्णय झाले. प्रत्यक्ष संघटनेच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या नऊ निर्णयांचे तपशील पुढीलप्रमाणे :-

**(1) SUDHIR SHARADRAO HUNGE** : In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench, Nagpur, **Writ Petition No.1489/2010,** Date of Judgment : 02.07.2010 *(P73NB2010)*

**(2) ATUL SURESH PATIL** : In the High Court of Judicature at Bombay : Bench at Aurangabad, **Writ Petition No. 357 of 2010,** Date of Judgment : 20th October, 2010 *(P11NB2011)*

**(3) THE ANIKET EDUCATION SOCIETY** : In the High Court of Judicature at Bombay, Nagpur Bench : Nagpur, **Writ Petition No.1973 of 2011,** Date of Judgment : 22th June, 2011.

**(4) REKHA TARACHAND ZALKE** : In the High Court of Judicature at Bombay, Appellate Side Nagpur Bench, Nagpur, Writ Petition No. 5630 of 2011, Date of Judgment : 30th July, 2012.

**(5) DR. MAHESH PRABHAKAR KULTHE** : In the High Court of Judicature at Bombay, Bench at Aurangabad, **Writ Petition No. 10149 of 2010,** Date of Judgment : October 17, 2013 *(P234NB2013)*

**(6) VIVEK TULSHIRAM MASKE** : In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench : Nagpur, **Writ Petition No.1525 of 2014,** Date of Judgment : 13th June, 2014.

**(7) MADHURI MADHUKAR DESHMUKH** : In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench at Nagpur, **Writ Petition No.1213/2009,** Date of Judgment : 24.02.2017.

**(8) ASHOK AKARAM PATIL** : In the High Court of Judicature at Bombay Civil Appellate Jurisdiction, **Writ Petition No.3989 of 2012,** Date of Judgment : 17th July 2017.

**(9) DR. SHIVAJI BHAGWANRAO YADAV** : In the High Court of Judicature at Bombay Bench at Aurangabad, **Writ Petition No. 12249 of 2017,** Date of Judgment : 12th July, 2018.

**३४.** मुंबई उच्च न्यायालयामध्ये १७ शिक्षकांनी दाखल केलेली याचिका म्हणजे सन २०२० ची याचिका क्रमांक (L) ७५०२ होय. हे सारे शिक्षक एम.फील. पदवी धारक असून इतर अनेक एम.फील. पदवी धारकांना मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाने CAS चे लाभ देण्यात आले आहे तसे ते आम्हालाही देण्यात यावे, अशा प्रकारची मागणी या याचिकेतून करण्यात आलेली आहे. या याचिकेसोबत विभागीय सहसंचालकांनी त्यांच्या त्यांच्या भागामध्ये एम.फील. पदवी धारक शिक्षकांना आश्वासित प्रगती योजनेचे लाभ लागू केलेले आहेत. अशा ७२९ शिक्षकांची यादी याचिकाकर्त्यांनी माहितीच्या अधिकारामध्ये मिळविलेली असून त्यांची विभागनिहाय संख्या पुढीलप्रमाणे आहे. सुरुवातीला अनुक्रमांक

***उच्च शिक्षण संचालकांचे आदेश वेगळे, उपसचिवांचे आदेश त्याहून वेगळे आणि दोघांनीही मा.उच्च न्यायालयाचा व मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय वाचलाच नाही. वाचला असल्यास त्यांना तो समजलाच नाही. एवढ्या मोठ्या पदावर काम करणाऱ्या या अधिकाऱ्यांना न्यायालयाच्या निर्णयातील दोन ओळी वाचता येत नसतील तर त्यांचे काय करावे?***

*( परिच्छेद ५० पहा )*

***मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका डिसमिस केली इतकेच नव्हे तर अशा प्रकारची आगंतुक (uncalled for) प्रकरणे विशेष अनुमती याचिका म्हणून सर्वोच्च न्यायालयात राज्यशासनाने दाखल करू नयेत असेही ताशेरे ओढले.***

*( परिच्छेद ४६ पहा )*

दिला असून त्यानंतर विभागीय सहसंचालकांचा विभाग आहे व शेवटी लाभधारक शिक्षकांची संख्या नमूद केलेली आहे. ती पुढीलप्रमाणे :-

| | |
|---|---|
| (१) सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर | ...१५ |
| (२) सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर | .....१० |
| (३) सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग | .....३२९ |
| (४) सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे | .....९६ |
| (५) सहसंचालक, उच्च शिक्षण, जळगाव विभाग, जळगाव | .....५६ |
| (६) शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, नांदेड विभाग, नांदेड | ....९७ |
| (७) सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग | ....१२६ |
| **एकूण** | ....७२९ |

**३५.** दिनांक १.१.१९९४ ते २००९ अखेर पर्यंतच्या काळातील उपरोक्त आकडेवारी माहितीच्या अधिकारात याचिकाकर्त्यांना उपलब्ध झालेली आहे. ती या याचिकेसोबत सहपत्र 'जी' म्हणून जोडलेली आहे. काही विभागांची माहिती उपलब्ध झालेली नाही असे दिसून येते.

**३६.** उच्च शिक्षण विभागामध्ये हे जे 'तघलकीराज्य' चालू आहे त्याचे हे सारे तपशील नमूद करतांना या कार्यकारी मंडळाला मनापासून दुःख होत असले तरी उच्च शिक्षण विभागाने एका प्रकरणामध्ये केलेले 'महातघलकी धर्तीचे अत्यंत लज्जास्पद वर्तन' उघड करणे हा आम्हाला आमच्या कर्तव्याचा भाग वाटतो.

**३७.** आश्वासित प्रगती योजनेचे लाभ नाकारण्यात आल्यामुळे याचिकाकर्त्यांना मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल करावी लागली. (In the High Court of Judicature at Bombay Nagpur Bench at Nagpur, Writ Petition No.1213/2009, Date of Judgment : 24.02.2017) सदरहू प्रकरणामध्ये याचिकाकर्त्यांची नेमणूक दिनांक २१ एप्रिल २००३ रोजी ग्रंथपाल म्हणून झालेली होती अशी स्पष्ट माहिती खंडपीठाच्या या निर्णयाच्या परिच्छेद ५ मध्ये नमूद आहे. ती पुढीलप्रमाणे :- "The Principal of the respondent no.4 – College vide appointment order dated 21.4.2003 informed the petitioner that she is appointed as a full time librarian on a probation for a period of two years." सदरहू याचिकाकर्त्यांनी मार्च २००९ मध्ये एम.फील. पदवी प्राप्त केलेली होती हेही या निर्णयाच्या परिच्छेद ९ मध्ये नमूद आहे. ते पुढील शब्दात :- " It is also not in dispute that the petitioner acquired M.Phil. qualification in the month of March, 2009."

**३८. दिनांक १ जुलै २००९ पूर्वी नियुक्त झालेल्या. एम.फील. पदवी धारकांना नेट-सेटच्या पात्रतेपासून मुक्तता देण्यात आलेली असून हा विषय आता वादविषय राहिलेला नाही.** न्यायालयाच्या अनेक निर्णयांनी याबाबतची अंतिम स्थिती सुनिश्चित झालेली आहे असे खंडपीठाने आपल्या निर्णयात नमूद केले असून **सरकारी वकिलांनी सुद्धा ही गोष्ट मान्य केलेली आहे** असेही आपल्या निर्णयाच्या परिच्छेद १० मध्ये नमूद केलेले आहे. ते पुढील शब्दात :-

"The issue that the candidates who acquired M.Phil. qualification prior to 1.7.2009 are not required to clear NET/ SET examination *is not res integra.* This Court in various decisions has ruled that the **candidates who acquired the M.Phil qualification prior to 1.7.2009 are not required to clear NET/ SET examination. The learned Additional Government Pleader did not dispute this position."** या परिच्छेदातील शेवटचे वाक्य फार महत्त्वाचे आहे.

**३९.** शेवटी मा. उच्च न्यायालयाने याबाबतीत याचिकाकर्त्यांच्या बाजूने निर्णय दिला. तो पुढील शब्दात :-

"In the present case, the petitioner acquired M.Phil qualification in March, 2009. The petitioner in pursuance of the advertisement dated 30.3.2003 was holding the other qualification to hold the post of Librarian, except NET/SET. The petitioner, therefore, in our view, is entitled to have right to get approval from the respondent no.3 as a Librarian. In that view of the matter, **the present writ petition needs to be allowed and the Rule is made absolute in terms of prayer clause (i) and (ii-a)."**

**४०.** याचिकाकर्त्यांनी आपल्या याचिकेमध्ये परिच्छेद (i) व (ii-a) मध्ये केलेल्या प्रार्थना मा.उच्च न्यायालयाने मान्य केल्या असे या निर्णयात नमूद आहे. मात्र त्या प्रार्थना काय होत्या? हे मूळ याचिकेमधून प्रार्थना खंड (Prayer Clause) पाहिल्याशिवाय याबाबतचा पूर्णपणे बोध होत नाही म्हणून संबंधित याचिकेतील प्रार्थना खंड (i) आणि (ii-a) जसाच्या तसा पुढे नमूद करण्यात येत आहे.

**"PRAYER :** "It is, therefore, most humbly prayed that this Hon'ble Court be pleased to issue a writ of certiorari, mandamus or any other appropriate writ order or direction and pleased to -

(i) Direct the respondents, especially respondent no. 3, to grant regular approval to the services of the petitioner from the date of her appointment;

(ii-a) Declare that the petitioner is eligible to be appointed as Librarian and is also entitled for continuation and regularization on the post held by her and **is also entitled for all consequential benefits."**

नेमणुकीच्या दिनांकापासून सेवेला नियमित मान्यता देण्यात यावी. तसेच शिक्षक या नात्याने उपलब्ध होणारे **सर्व आनुषंगिक लाभ (all consequential benefits) उपलब्ध करून द्यावेत असा मा.उच्च न्यायालयाचा हा आदेश आहे.**

**४१.** या प्रकरणातील मा.उच्च न्यायालयाचा निर्णय हा दिनांक २४ फेब्रुवारी २०१७ रोजी झाला. उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी १८ ऑगस्ट २०१७ रोजी दिल्ली येथील सरकारी वकिलांना एक पत्र लिहून उच्च न्यायालयाच्या या निर्णयाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करावी असे कळविले. **दिल्लीतील सरकारी वकिलांनी ही सारी कागदपत्रे तपासून विशेष अनुमती याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्याविषयीच्या सूचना उच्च शिक्षण विभागाने मागे घ्याव्यात असे दिनांक २० नोव्हेंबर २०१७ रोजीच्या पत्रान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या सचिवांना कळविले.**

**४२.** आपण संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली असून सर्व कागदपत्रे काळजीपूर्वक पाहिलेली आहेत असे या पत्रात दिल्लीस्थित सरकारी वकिलांनी नमूद केले होते. "The Learned Additional Government Pleader did not dispute this position." हे मा. खंडपीठाच्या निर्णयातील वाक्य उधृत करून दिल्लीतील सरकारी वकिलांनी असे नमूद केले की, या वाक्याचा गंभीरपणे विचार केला पाहिजे. **मा.उच्च न्यायालयासमोर सरकारी वकिल जेव्हा एखाद्या निर्णयाशी सहमत होतात तेव्हा त्यावर अपील करण्याची स्थिती हातून निघून गेलेली असते ही कायद्याची सर्वमान्य स्थिती आहे. (settled legal position**

***मा.सर्वोच्च न्यायालयाचे पुनर्विलोकनाचे अधिकार वापरून उच्च न्यायालयाचा निर्णय व राज्यशासनाचा शासननिर्णय आपल्या अधिकारात उच्च शिक्षण संचालकांनी दुरुस्त केला.***

*( परिच्छेद ५७ पहा )*

***मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयात व शासननिर्णयात दुरुस्ती करण्याचा आपल्याला अधिकार नाही एवढीही अक्कल संचालक पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला नसेल तर त्यांना ते पद भूषविण्याचा अधिकार कसा काय प्राप्त होतो?***

( परिच्छेद ५७ पहा )

**of law)** सरकारी वकिल सहमत झाल्याची बाब चुकून मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयामध्ये नोंदविल्या गेली असेल तर ती नोंद चुकीची आहे म्हणून त्याच न्यायालयात पुनर्विलोकन याचिका (Review Petition) दाखल करणे हा मार्ग उपलब्ध असतो. दिल्ली येथील सरकारी वकिलांच्या पत्रातील हा मजकूर शब्दशः पुढीलप्रमाणेः-

"Today, I had a detailed conference about the matter with Dr. Archana Nerkar, Joint Director, Higher Education, Amravati Division, Amravati. So also, I have gone through the case papers in detail. It is observed that the High Court has considered the case in proper manner by observing in paragraphs no. 9 & 10.

*"9. It is also not in dispute that the petitioner acquired M.Phil. qualification in the month of March, 2009.*

*10. The issue that the candidates who acquired M.Phil. qualification prior to 1.7.2009 are not required to clear NET/ SET* ***examination is not res integra.*** *This Court in various decisions has ruled that the candidates who acquired the M.Phil qualification prior to 1.7.2009 are not required to clear NET/ SET examination.* ***The learned Additional Government Pleader did not dispute this position."***

In addition to that last sentence in paragraph no. 10 requires a serious consideration, ***"The learned Additional Government Pleader did not dispute this position."*** It is a settled legal position that no order can be challenged in case of concession given by a party. In case the concession is recorded wrongly, the State should first file a Review Petition by contending wrong recording of the concession and then only a Special Leave Petition can be filed."

**४३.** शेवटी या पत्रामध्ये दिल्ली येथील सरकारी वकिलांनी मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल करण्याविषयीच्या आपल्या सूचना मागे घ्याव्यात अशी विनंती राज्याच्या उच्च शिक्षण सचिवांना केली होती. ती पुढील शब्दात :-

"Considering the documents on record, the judgment and order passed by the High Court and the concession of the Additional Govt. Pleader, I hereby opine that no purpose will be served in case the State files a Special Leave Petition. **You are therefore requested to withdraw the instructions given as per above referred letter."**

**४४.** एकंदर घटनाक्रमाचे अवलोकन करता असे दिसून येते की, विशेष अनुमती याचिका दाखल करण्याचा दुराग्रह उच्च शिक्षण विभागाने कायम ठेवला व त्यामुळे उच्च न्यायालयाच्या या निर्णयाच्या विरोधात विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आली. मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये ही विशेष अनुमती याचिका दिनांक ११ जुलै २०१८ रोजी सुनावणीला आली. या याचिकेचे तांत्रिक तपशील पुढीलप्रमाणे आहेत. :-

**"SUPREME COURT OF INDIA : (1) Special Leave Petition (Civil)......... Diary No(s).20879/2018** (Arising out of impugned final judgment and order dated 24-02-2017 in WP No.1213/ 2009 passed by the High Court Of Judicature At Bombay At Nagpur) State Of Maharashtra & Anr. Petitioner(s) **Versus** Madhuri Madhukar Deshmukh & Ors. Respondent(s) Coram : Hon'ble Mr. Justice Arun Mishra Hon'ble Mr. Justice S. Abdul Nazeer Date of Judgment : 11-07-2018."

**४५.** भारतीय संविधानाच्या कलम १३६ अंतर्गत विशेष अनुमती याचिका दाखल करून घेण्यासाठीची कोणतीही कारणे समोर मांडण्यात आलेली नाही असे नमूद करून आपल्या निर्णयाच्या परिच्छेद २ मध्ये ही विशेष अनुमती याचिका सर्वोच्च न्यायालयाने डिसमिस केली. ती पुढील शब्दात :-

"No ground for interference is made out in exercise of our jurisdiction under Article 136 of the Constitution of India. **The special leave petition is accordingly dismissed.** Pending application, if any, stands disposed of."

**४६. मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका डिसमिस केली इतकेच नव्हे तर अशा प्रकारची आगंतुक (uncalled for) प्रकरणे विशेष अनुमती याचिका म्हणून सर्वोच्च न्यायालयात राज्यशासनाने दाखल करू नयेत असेही ताशेरे ओढले.** कोणतेही पुरेसे कारण नसतांना अनेक विशेष अनुमती याचिका अनेक प्रकरणांमध्ये दाखल केल्याचे आमच्या लक्षात आलेले आहे. आमच्या या आदेशाची प्रत राज्याच्या मुख्य सचिवांना पाठविण्यात यावी. मुख्य सचिवांनी यामध्ये लक्ष घालून अनावश्यक विशेष अनुमती याचिका दाखल होणार नाहीत हे पहावे व त्याबाबतीत काय कृती केलेली आहे, हे दोन महिन्याच्या आत सर्वोच्च न्यायालयाला कळवावे असेही त्या दिवशीच्या आदेशात सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले. हे नमूद असलेला परिच्छेद ३ शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"We feel that the State Government should not file such cases in this Court, **filing of which are uncalled for.** We have seen large number of cases are being filed without any sufficient reason. State bodies should not file unnecessary litigation. A copy of the order be sent to the Chief Secretary of the concerned State. Let the Chief Secretary of the State look into the matter and see that no matter is filed unnecessarily. **Report of action taken be submitted by the Chief Secretary, State of Maharashtra, to this Court within two months from today."**

**४७.** फालतू (uncalled for) प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात आणत जाऊ नका असा फटका मा.सर्वोच्च न्यायालयाने उच्च शिक्षण विभागाला हाणला आहे. या फटक्यातील uncalled for या शब्दाचा महाराष्ट्र शासनाच्या 'शासनव्यवहार कोशा'मध्ये 'अनाहुत' किंवा 'आगंतुक' असा अर्थ सांगितलेला आहे. प्रस्तुत विवेचनामध्ये शासनव्यवहार कोशातील हे शब्दार्थ चपखल वाटत नसल्याने या शब्दांचे अर्थ "मराठी शब्दरत्नाकर" या शब्दकोशामध्ये पाहिले असता 'अनाहुत' या शब्दाचा अर्थ 'न बोलावता आलेला' असा सांगितला असून आगंतुक या शब्दाचा अर्थ "न बोलविता जेवणास गेलेला मनुष्य" असा सांगितलेला आहे. आता हे दोनही अर्थसुद्धा विवेचनाधिन प्रकरणी स्थितीचे यथायोग्य वर्णन करतात असे वाटत नाही, कारण सर्वोच्च न्यायालय काही कोणाला जेवणास बोलावत नाही. फार झाले तर "भारतीय संविधानाच्या १३६ व्या कलमाप्रमाणे तुमची लायकी नसतांना इकडे भोजनास कसे काय आलात?" असा फार तर uncalled for चा अर्थ काढता येईल. सोप्या मराठीतून फालतू (uncalled for) या शब्दाने मा.सर्वोच्च न्यायालयाच्या भावनांचे यथार्थ दर्शन होते असे काही तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

***उच्च शिक्षण संचालक या नात्याने आपल्या आदेशात मा.उच्च न्यायालयाचा निर्णय उद्धृत करतांना न्यायालयाच्या निर्णयातील शब्द वगळून टाकण्याचे कृत्य हे गुन्हेगारी स्वरूपाचे कृत्य आहे असे या महासंघाचे ठाम मत आहे.***

( परिच्छेद ६३ पहा )

**४८.** मा.सर्वोच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेश पारित झाल्यानंतर दिनांक ४ सप्टेंबर २०१८ रोजी महाराष्ट्र राज्याच्या मुख्य सचिवांनी "Precautions to be taken by the Government Departments while filing Special Leave Petition before the Hon'ble Supreme Court of India" या मथळ्याचे एक परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या सर्व विभागांना पाठविले. या परिपत्रकातील परिच्छेद २ पुढीलप्रमाणे :-

"The Hon'ble Supreme Court has ordered and directed that the State Government should not file cases before the Hon'ble Court, filing of which is uncalled for. The Hon'ble Court further observed that a large number of cases are being filed without any sufficient reason, and that State bodies should not file unnecessary litigation. The Hon'ble Supreme Court has observed and directed inter-alia as under:-

***"2. No ground for interference is made out in exercise of our jurisdiction under Article 136 of the Constitution of India. The special leave petition is accordingly dismissed. Pending application, if any, stands disposed of.***

***3. We feel that the State Government should not file such cases in this Court, filing of which are uncalled for. We have seen large number of cases are being filed without any sufficient reason. State bodies should not file unnecessary litigation. A copy of the order be sent to the Chief Secretary of the concerned State. Let the Chief Secretary of the State look into the matter and see that no matter is filed unnecessarily."***

**४९.** याच परिपत्रकाच्या परिच्छेद ३ मध्ये पुढीलप्रमाणे नमूद आहे. :- "In view of the aforesaid directions of the Hon'ble Court, all the departments are hereby directed to carefully examine the matters before forwarding a proposal for filing of Appeal/ Revision or other proceedings against the orders passed by a Court or Tribunal. An endeavour shall be made to avoid filing of unnecessary litigation. The Departments are directed to ensure that the recourse to the remedy of Appeal/Revision etc. shall be made in only those cases where there are sufficient and justifiable grounds/reasons for filing of Appeal/Revision or other proceedings."

**५०. मा.उच्च न्यायालयाने उच्च शिक्षण विभागाला याबाबत दिलेले आदेश अतिशय स्पष्ट आहेत. "जुलै २००९ पूर्वी ज्यांनी एम.फील. पदवी धारण केली आहे, अशा शिक्षकाला नेमणुकीच्या पहिल्या दिवसापासून सेवा धरून आश्वासित प्रगती योजनेसह इतर सर्व लाभ द्यावे लागतील**" असा हा आदेश आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने या निर्णयावर शिक्कामोर्तब केले. इतकेच नव्हे तर "भारतीय संविधानातील तरतुदीअंतर्गत तुमचे हे प्रकरण SLP दाखल करून घेण्याच्या लायकीचे नाही" असा फटका उच्च शिक्षण विभागाला लगावला. आणखी पुढे "अशा प्रकारची आगंतुक (uncalled for) प्रकरणे इकडे आणत जावू नका" असा जोरदार फटका मारला. **इतके सारे झाल्यावर या महासंघाला आंदोलनाचा निर्णय का घ्यावा लागत आहे हे नमूद करणे आवश्यक आहे.**

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाशी दिनांक २० ऑक्टोबर २०२३ रोजी उच्च शिक्षण संचालकांनी चर्चा केली. सारा विषय समजून घेतला व दिनांक २३ नोव्हेंबर २०२३ रोजी "(२) **ज्यांनी सेवेत असताना एम.फील. अर्हता धारण केली असेल, त्यांना सदर अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ देय राहतील.**" असे आदेश काढले. त्यांची ही घोडचूक दुरुस्त करण्यासाठी मंत्रालयातील उपसचिव दर्जाच्या अधिकाऱ्याने दिनांक ३० नोव्हेंबर २०२३ रोजी एक वेगळा आदेश काढला त्यात

"(ब) **अध्यापकांनी सेवेत असताना एम.फील. अर्हता धारण केली असेल तर, विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेली मान्यता विचारात घेऊन, विद्यापीठाने संबंधित उमेदवाराला ज्या दिनांकापासून परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिली असेल अशा दिनांकापासून त्याला कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ अनुज्ञेय होतील.**" असे नमूद करून आणखी महाघोडचूक करून ठेवली.

**उच्च शिक्षण संचालकांचे आदेश वेगळे, उपसचिवांचे आदेश त्याहून वेगळे आणि दोघांनीही मा.उच्च न्यायालयाचा व मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय वाचलाच नाही. वाचला असल्यास त्यांना तो समजलाच नाही. एवढ्या मोठ्या पदावर काम करणाऱ्या या अधिकाऱ्यांना न्यायालयाच्या निर्णयातील दोन ओळी वाचता येत नसतील तर त्यांचे काय करावे?**

**५१. मा.उच्च न्यायालयाने उच्च शिक्षण विभागाला याबाबत दिलेले आदेश अतिशय स्पष्ट आहेत. "जुलै २००९ पूर्वी ज्यांनी एम.फील. पदवी धारण केली आहे, अशा शिक्षकाला नेमणुकीच्या पहिल्या दिवसापासून सेवा धरून आश्वासित प्रगती योजनेसह इतर सर्व लाभ द्यावे लागतील**" सन २०१० मधील पहिल्या व दुसऱ्या न्यायालयीन निर्णयांनी हा कायद्याचा अंतिम अर्थ निश्चित करून दिला. त्याला धरून दिनांक २४ फेब्रुवारी २०१७ रोजी मा.नागपूर खंडपीठाने तत्सम निर्णय दिला. त्यापूर्वी अनेक खंडपीठांनी तसेच निर्णय दिलेले असल्यामुळे सरकारी वकिल निर्णयाशी सहमत झाले. तरीही उच्च शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल करण्याच्या सूचना दिल्या. सर्वोच्च न्यायालयातील दिल्लीस्थित सरकारी वकिलांनी हे प्रकरण विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल करण्याच्या लायकीचे नाही तेव्हा विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल करण्याच्या सूचना मागे घ्याव्यात अशी विभागाला विनंती केली पण उच्च शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपला राजहट्ट कायम ठेवला. विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल झाली व फेटाळल्या गेली. सर्वोच्च न्यायालयाने अशी आगंतुक (uncalled for) प्रकरणे इथे आणत जाऊ नका असे ताशेरे ओढले. राज्यशासनाकडून आगंतुक प्रकरणे दाखल होण्याची संख्या फार वाढली आहे. राज्याच्या मुख्य सचिवांनी याबाबत कारवाई करावी असे मा.सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले. राज्याच्या मुख्य सचिवांनी तसे परिपत्रक काढले पण उच्च शिक्षण विभागातील हे अधिकारी दुरुस्त व्हायला तयार नाहीत. मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर २०२३ पर्यंत त्याबाबतचा धोरणात्मक निर्णय निर्गमित होऊ नये ही अत्यंत लाजीरवाणी गोष्ट आहे. मा.उच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या ९ खंडपीठांनी उपरोक्तप्रमाणे निर्णय दिले. त्यातील एका खंडपीठातील ज्येष्ठ न्यायमूर्ती मा.सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश झाले. निर्णय देणाऱ्या दुसऱ्या खंडपीठातील ज्येष्ठ न्यायमूर्ती मा.सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश झाले. तत्पूर्वीच मा.सर्वोच्च न्यायालयाने 'आगंतुक'पणा करू नका असे फटके मारल्यानंतरसुद्धा काहीच सुधारणा होऊ नये हे तर अत्यंत लज्जास्पद वर्तन होय.

**५२.** सन २०१० मध्ये मा.उच्च न्यायालयाचा या प्रकरणामध्ये पहिला व दुसरा धोरणात्मक निर्णय झालेला असतांना गेली १३ वर्षे याबाबतचा धोरणात्मक शासननिर्णय न काढण्यास कोण अधिकारी जबाबदार आहेत? याची चौकशी झाली पाहिजे.

पहिल्या व दुसऱ्या धोरणात्मक निर्णयाप्रमाणे त्यानंतर मा.उच्च न्यायालयाच्या निरनिराळ्या चार खंडपीठांनी धोरणात्मक निर्णय दिले. अशा एकूण सहापैकी एकाही प्रकरणी SLP झाली नाही असे असतांना तत्सम सातव्या प्रकरणात SLP दाखल करण्यास कोण अधिकारी जबाबदार आहेत? याचीही चौकशी झाली पाहिजे.

**मा.उच्च न्यायालयात काम करणाऱ्या सरकारी वकिलांनी व मा.सर्वोच्च न्यायालयात काम करणाऱ्या सरकारी वकिलांनी हे प्रकरण SLP दाखल करण्याच्या लायकीचे नाही असे सांगितल्यानंतरसुद्धा हट्टाने SLP दाखल करणारे कोण अधिकारी आहेत? याची चौकशी होऊन जबाबदारी निश्चित झाली पाहिजे.**

**अशी फालतू प्रकरणे इकडे आणत जाऊ नका असा फटका मा.सर्वोच्च न्यायालयाने हाणला. तसे आदेश काढा असे राज्याच्या मुख्य सचिवांना आदेश दिले तरीही हा फालतुपणा डिसेंबर २०२३ पर्यंत सुरू ठेवण्यास व त्यानंतरही सुरूच ठेवण्यास कोण अधिकारी जबाबदार आहेत याची चौकशी झाली पाहिजे. जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे व या फालतुपणापोटी राज्यशासनावर पडलेला भूर्दंड जबाबदार अधिकाऱ्यांकडून व्यक्तिशः वसूल करण्यात आला पाहिजे अशी या महासंघाची मागणी आहे.**

***महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागातील अधिकारी सर्वोच्च न्यायालयासमोर सुद्धा शपथपत्रावर धडधडीत असत्य माहिती दाखल करतात, हे केवळ आश्चर्यकारक नव्हे तर खेदजनक सुद्धा आहे.***

*( परिच्छेद १२ पहा )*

## (३)
## ७१ दिवसांची बेकायदेशीर वेतनकपात
## मा. उच्च व सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय झाला, त्याची अंमलबजावणी करा असा शासननिर्णय निघाला, मात्र उच्च शिक्षण संचालकांची बेकायदेशीर कृती

**५३.** ज्या कामासाठी वेतन दिले जात नाही "ते काम केले नाही" म्हणून वेतन रोखून ठेवले व "ते काम समाधानकारकपणे पार पाडले" तरी सुद्धा रोखून ठेवण्यात आलेले वेतन अदा करण्यात आले नाही. तेंव्हा महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला मा.उच्च न्यायालयात जावे लागले. इतरही काही याचिका या संदर्भात दाखल झाल्या. तपशील पुढीलप्रमाणे :- याचिका क्र. १९१३/२०१३ महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिव्हर्सिटी ॲण्ड कॉलेज टिचर्स, याचिका क्र. २२९०/२०१५ - बॉम्बे युनिव्हर्सिटी ॲण्ड टिचर्स युनियन, याचिका क्र. २८२५/२०१४ - डॉ.सुभाष अमर सावंत व इतर विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर.

**५४.** मा. मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २३ जानेवारी २०१९ रोजी या प्रकरणी आदेश पारित केले. त्यातील महत्त्वाचा भाग शब्दशः पुढीलप्रमाणे :-

"2. Now, that the issue has been resolved and it is agreed that the pay for this duration has to be released, we direct that in terms of the decision taken in the meeting held on 25/09/2018 (see Minutes of 08/10/2018) amount be released as expeditiously as possible and, in any event, before 30/03/2019. The Writ Petitions are disposed of with these directions.

3. All concerned to act on an authenticated copy of this order.

4. If the amount is not released by the above date, it shall carry interest @ 8% p.a. from the due date till the date the same is disbursed."

**५५.** त्यानंतर उच्च शिक्षण विभागाने उच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका दाखल केली. ही पुनर्विलोकन याचिका म्हणजे सन २०१९ ची पुनर्विलोकन याचिका क्रमांक ३३ होय. (R. P. (L) 33 of 2019) खरे म्हणजे **मा.उच्च न्यायालयातील कामकाजाकडे उच्च शिक्षण विभागातील अधिकारी किती निष्काळजीपणे पहातात याचा पूरावाच या याचिकेमध्ये आपल्याला दिसून येतो. शासनाच्यावतीने न्यायालयासमोर अधिकाऱ्यांना बिनशर्त क्षमायाचना करावी लागली. खरी वस्तुस्थिती आम्ही न्यायालयासमोर ठेवली नव्हती, हेही शासनातर्फे मान्य करण्यात आले.** शासनाच्या या पुनर्विलोकन याचिकेच्या परिच्छेद ६ मधील पुढील उल्लेख पहा:-

"6. At the outset, the Applicants render an unconditional apology to this Hon'ble Court for not being able to place before this Hon'ble Court true and correct facts, at the time when the aforesaid Order itself was passed by this Hon'ble Court."

**या प्रकरणाच्या सुनावणीच्या वेळी खरी व बिनचूक माहिती आम्ही न्यायालयासमोर ठेवली नाही म्हणून उच्च शिक्षण विभागाला बिनशर्त क्षमायाचना करावी लागली ही बाब उच्च शिक्षण विभागाची शोभा वाढविणारी नाही.** राज्यशासनाची ही पुनर्विलोकन याचिका मा. उच्च न्यायालयासमोर दिनांक ८ नोव्हेंबर २०१९ रोजी सुनावणीला आली. **"That is impermissible in review jurisdiction.** Though we condone the delay in filing the Review Petition, **we find no merits in the same. It is accordingly dismissed."** या शब्दात ती याचिका मा.उच्च न्यायालयाने फेटाळून लावली.

**५६.** एवढे सारे झाल्यावर दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजीच्या तक्रार निवारण **समितीच्या मंत्रालयातील बैठकीमध्ये "नो वर्क नो पे हा निर्णय येथे लागू पडत नाही" असा सभेत उपस्थित राहून एकमताने निर्णय घेणाऱ्या दोन अधिकाऱ्यांनी (उच्च शिक्षण सचिव व उच्च शिक्षण संचालक) त्या निर्णया विरुद्ध सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (SLP) दाखल केली.** दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी तक्रार निवारण **समितीच्या बैठकीमध्ये एकमताने "नो वर्क नो पे हा निर्णय येथे लागू पडत नाही" असा निर्णय झाला होता. वित्त सचिव त्या बैठकीला हजर होते. नेमके त्याविरुद्ध "नो वर्क नो पे या तत्वानुसारच निर्णय करावा लागेल, उच्च शिक्षण विभागाचा प्रस्ताव मान्य करता येत नाही" असे मत मांडणारी त्यांची टिपणी मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आली. उपरोक्त तीनही वरिष्ठ अधिकाऱ्यांचे हे कृत्य प्रशासनाचा अत्यंत क्षुद्र दर्जा दर्शविणारे म्हणावे लागेल.** हा प्रकार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आल्याशिवाय राहिला नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाने उच्च शिक्षण विभागाची विशेष अनुमती याचिका दिनांक ७ फेब्रुवारी २०२० रोजी (SLP (Civil) Diary No. 1076/2020) फेटाळून लावली. इतकेच नव्हे तर भारतीय घटनेच्या कलम १३६ अंतर्गत विशेष अनुमती देण्याच्या लायकीचे हे प्रकरण नाही, असेही मा.सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालात नमूद केले. ते पुढील शब्दात :-"Delay condoned. We are not inclined to entertain the Special Leave Petition under Article 136 of the Constitution of India.The Special Leave Petition is accordingly **DISMISSED."** *(14/2020)*

**५७.** मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय झाल्यानंतर बऱ्याच विलंबाने उच्च शिक्षण विभागाने डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून दिनांक ७ डिसेंबर २०२० रोजी याबाबतचा शासननिर्णय काढला. या शासननिर्णयातील परिच्छेद १ पुढीलप्रमाणे:-

"१. सन २०१३ मध्ये दि. ०४.०२.२०१३ ते दि. १० मे २०१३ या **संप कालावधीतील वेतन मा. उच्च न्यायालयाने** याचिका क्र. १९१३/२०१३, क्र. २२९०/२०१५, क्र. २८२५/२०१४ मध्ये **दि. २३.०१.२०१९ रोजीच्या आदेशानुसार संबंधित अध्यापकांना अदा करण्यात यावे."**

दिनांक ७ डिसेंबर २०२० रोजी जो शासननिर्णय मंत्रालयातून निर्गमित करण्यात आला, त्याची ताबडतोब अंमलबजावणी करण्यासाठी दिनांक ९ डिसेंबर २०२० रोजी संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी एक परिपत्रक निर्गमित करून आपल्या सर्व विभागीय सहसंचालकांना आदेश दिले.

मा.सर्वोच्च न्यायालयाने कन्फर्म केलेल्या मा.उच्च न्यायालयाच्या आदेशात **"(i) या सर्व शिक्षकांचे ७१ दिवसांचे वेतन त्यांना परत करा (ii) ते विलंबाने परत केल्याबद्दल त्यावर आठ टक्के व्याज अदा करा"** असे आदेशित होते. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे या दोनही रकमा त्यांना परत करा असा शासननिर्णय दिनांक ७ डिसेंबर २०२० रोजी निघाला. तर **मा.सर्वोच्च न्यायालयाचे पुनर्विलोकनाचे अधिकार वापरून उच्च न्यायालयाचा निर्णय व राज्यशासनाचा शासननिर्णय आपल्या अधिकारात उच्च शिक्षण संचालकांनी दुरुस्त केला.** दिनांक ९ डिसेंबर २०२० रोजी "विलंबाबद्दल ८ टक्के रक्कम देण्याची बाब वगळून, फक्त ७१ दिवसांचे कापलेले वेतन परत करा" असे आदेश उच्च शिक्षण संचालकांनी आपल्या सहसंचालकांना दिले. **मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयात व शासननिर्णयात दुरुस्ती करण्याचा आपल्याला अधिकार नाही एवढीही अक्कल संचालक पदावर काम करणाऱ्या व्यक्तीला नसेल तर त्यांना ते पद भूषविण्याचा अधिकार कसा काय प्राप्त होतो?** देय दिनांकापासून अदायगीच्या दिनांकापर्यंत मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे आठ टक्क्याची रक्कम उच्च शिक्षण संचालकांकडून आजही अदा करण्यात आलेली नाही.

***या प्रकरणी तीन विशेष अनुमती याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या असतांना ही बाब सर्वोच्च न्यायालयात 'पेंडींग' आहे अशी सरळ सरळ असत्य माहिती मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर सहसंचालकांनी ठेवणे, त्या आधारावर तेथे प्रकरण पेंडींग पाडण्यात तात्पुरते यश मिळविणे, हा अव्वल दर्जाचा लुच्चेपणा तर आहेच पण मिळालेल्या या तात्पुरत्या यशाचा झेंडा हाती घेऊन इतर खंडपीठासमोर प्रकरण तात्पुरते पेंडींग पाडण्यात यश मिळविणे, हा उच्च शिक्षण विभागाचे नेतृत्त्व करणाऱ्या या अधिकाऱ्यांच्या लुच्चेपणाचा कडेलोट म्हणून सांगता येईल.***

( परिच्छेद १०२ पहा )

**“No similar matter is pending”**

***अशी धडधडीत खोटी माहिती शपथपत्रासह सर्वोच्च न्यायालयात दाखल केली. असा खोटारडेपणा एकापेक्षा जास्त प्रकरणात या अधिकाऱ्यांनी केल्याचे पुरावे उपलब्ध आहेत. खोटेपणा उघडा पडल्याने त्या सर्व प्रकरणी ‘डिसमिस’ त्यांच्या नशिबी आले.***

*( परिच्छेद १ पहा )*

**५८.** संचालक उच्च शिक्षण यांच्या विक्षिप्त वर्तनाचे तीव्र पडसाद उमटले. महासंघाच्या घटक संघटनांनी या प्रकाराचा तीव्र निषेध केला. एका घटक संघटनेच्या आमसभेत उच्च शिक्षण संचालकांच्या हकालपट्टीची मागणी करणारा १० परिच्छेदांचा एक तपशीलवार ठराव (292/2022) संमत करण्यात आला. त्या ठरावातील दहावा परिच्छेद शब्दशः पुढीलप्रमाणे:-

“ज्यांना मा.उच्च न्यायालयाच्या २३ जानेवारी २०१९ च्या स्वयंस्पष्ट निर्णयातील चार ओळीचा अर्थ समजत नाही, ज्यांना ७ डिसेंबर २०२० च्या शासननिर्णयाच्या पहिल्या परिच्छेदातील एक वाक्यसुद्धा धड वाचता आले नाही किंवा वाचता येत नाही व वाचता आले असेल तर त्यांना त्याचा अर्थ कळत नाही, ज्यांनी ७१ दिवसाच्या बेकायदेशीर वेतनकपातीच्या विरोधात मा.उच्च व मा.सर्वोच्च न्यायालयाने शिक्षकांच्या बाजूने निर्णय दिलेला असतांना या हजारो शिक्षकांच्या व्यावसायिक जीवनाशी निर्दयीपणे व निर्बुद्धपणे क्रौर्यपूर्ण खेळ मांडलेला आहे, **ज्याला उघडउघडपणे या अपराधाबद्दल उच्च शिक्षण सचिवांनी दोषी धरलेले आहे, अशा उच्च शिक्षण संचालकांची त्या पदावरून ताबडतोब हकालपट्टी करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे.**”

**५९.** मा.उच्च न्यायालयाच्या (सर्वोच्च न्यायालयाने कायम केलेल्या) निर्णयाची इमानेइतबारे अंमलबजावणी करण्याचे उच्च शिक्षण संचालक टाळत असल्यामुळे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या घटक संघटनांनी अवमान याचिका दाखल कराव्यात असा निर्णय या महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या दिनांक ८ मे २०२२ रोजीच्या बैठकीत घेण्यात आला. कोल्हापूरहून सुटा युनिटने याबाबतच्या तयारीचा भाग म्हणून आपल्या अधिवक्त्यामार्फत दिनांक २० जुलै २०२२ रोजी उच्च शिक्षण सचिवांना, संचालक व सहसंचालक उच्च शिक्षण यांना ‘लिगल नोटीसेस’ पाठविल्या. “**अवमान याचिका दाखल झाल्यावर तुम्ही नागपूर खंडपीठाच्या क्षेत्रातील काही शिक्षकांना विलंबाबद्दल १८ टक्के व्याज अदा केले पण आमचे मात्र ८ टक्के अजून दिलेले नाही**” असे या नोटीस मध्ये नमूद केलेले होते.

**६०.** मा. उच्च न्यायालयाने याबाबतचा निर्णय दिनांक २३ जानेवारी २०१९ रोजी दिला. (मा.सर्वोच्च न्यायालयाने तो निर्णय कायम केला.) मा.उच्च न्यायालयाच्या त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे आदेश देणारा शासननिर्णय दिनांक ७ डिसेंबर २०२० रोजी निर्गमित करण्यात आला. पण उच्च शिक्षण संचालकांनी त्याची इमानेइतबारे अंमलबजावणी केली नाही. तेव्हा दिनांक २२ जून २०२२ रोजी उच्च शिक्षण विभागाने उच्च शिक्षण संचालकांना पुढील शब्दात फटकारले :-

“**याचिका क्र. १९१३/२०१३ व इतर याचिकांमध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. २३.०१.२०१९ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्याबाबतचा निर्णय संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णय दि. ०७.१२.२०२० अन्वये घेण्यात आलेला आहे.** तथापि, शासन निर्णयानुसार कार्यवाही होत नसल्याने शासनाकडे निवेदने प्राप्त झाली होती. सदर निवेदनांच्या अनुषंगाने संदर्भाधीन क्र. २ येथील पत्रान्वये शासन निर्णयातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.”

**६१.** इतक्या उपर उच्च शिक्षण संचालकांचे वर्तन दुरुस्त झाले नाही, स्वतः काहीही करावयाचे नाही, मंत्रालयाने आदेश दिल्यावरसुद्धा चुकीची अंमलबजावणी करावयाची व सतत मंत्रालयाला विनाकारण ते मार्गदर्शन मागत राहिले तेव्हा दिनांक १० ऑगस्ट २०२२ च्या पत्रान्वये सचिवांनी त्यांना पुढीलप्रमाणे फटकारले :-

“**तथापि, संदर्भाधीन क्र. ३ येथील पत्रान्वये याचिकाकर्ते यांचे वकील मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार व्याजाची रक्कम अदा करण्याबाबत कार्यवाही होत नसल्याने अवमान याचिका दाखल करण्यात येणार असल्याबाबत लिगल नोटीस दिली असल्याचे आपण नमूद केले आहे. त्यानुसार या प्रकरणी शासन स्तरावरून उचित आदेश होण्याची विनंती केली आहे.** त्यानुषंगाने आपले लक्ष **शासननिर्णय दि. ०७.१२.२०२० मधील परि. क्र. १ कडे वेधण्यात येत आहे. सदर परिच्छेदामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या दि. २३.०१.२०१९ रोजीच्या आदेशानुसार कार्यवाही करण्याच्या स्पष्ट सूचना नमूद (~~करण्यात~~) आलेल्या आहेत. मात्र त्यानुसार कार्यवाही न होता याबाबत वारंवार शासनाकडे पत्रव्यवहार होत आहे. शासनस्तरावरून स्पष्ट निर्देश असताना देखील आपल्या स्तरावरून कार्यवाही होत नाही, ही अत्यंत गंभीर बाब आहे. त्यामुळे आपणांस सूचित करण्यात येते की, या प्रकरणी शासन निर्णय दि. ०७.१२.२०२० मधील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही आपल्या स्तरावरून करण्यात यावी.**”

याच पत्रान्वये उच्च शिक्षण सचिवांनी तत्कालीन उच्च शिक्षण संचालकांना पुढीलप्रमाणे इशारा दिला होता. :-

“**तसेच या प्रकरणी शासन स्तरावरून मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना देऊनही आपल्या स्तरावरून त्याची अंमलबजावणी न झाल्यामुळे अवमान याचिका दाखल झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील, याची कृपया नोंद घेण्यात यावी.**”

**६२.** उच्च शिक्षण संचालकांनी दिनांक १२ ऑगस्ट २०२२ रोजी आदेश (172/2022) पारित केले व “प्रस्तुत न्यायालयीन प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याकरिता आपआपल्या विभागातील महाविद्यालयनिहाय तसेच **अध्यापकनिहाय देय दिनांकापासून प्रत्यक्ष वेतन अदायगी झालेल्या दिनांकापर्यंत 8% p.a. व्याजाच्या रक्कमेची मागणी आजच संचालनालयास सादर करण्यात यावी.**” असे सहसंचालकांना कळविले. लेखी आदेशात “देय दिनांकापासून प्रत्यक्ष वेतन अदायगी झाल्याच्या दिनांकापर्यंत” असे शब्द त्यांनी वापरले मात्र “देय दिनांकापासून (Due date) देण्याची काही गरज नाही” अशा तोंडी सूचना दिल्याचे पुरावे आहेत. संचालकांनी Due date या शब्दाचा त्यांच्या ‘जनरल नॉलेज’प्रमाणे चुकीचा अर्थ लावून Due date पासून देण्याची गरज नाही असे स्वतःच ठरविले व ८ टक्क्यांच्या रकमांमध्ये मोठी कपात केली. मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयात बदल करण्याचा अधिकार त्यांनी वापरला.

**६३.** दिनांक १२ ऑगस्ट २०२२ रोजी उच्च शिक्षण संचालकांनी जो आदेश काढला त्यामध्ये त्यांनी अध्यापकनिहाय **देय दिनांकापासून प्रत्यक्ष वेतन अदायगी झालेल्या दिनांकापर्यंत 8% p.a. व्याजाच्या रकमेची मागणी आजच संचालनालयाला सादर करा** असे आपल्या आदेशात नमूद केले. पण या रकमा या शिक्षकांना पूर्णांशाने अदा करावयाच्या नाहीत. त्यात फार मोठ्या प्रमाणात कपात करावयाची असे मनाशी ठरवून टाकले होते. त्यासाठी अत्यंत अभद्र मार्गाचा त्यांनी वापर केला. **आपल्या आदेशात मा.उच्च न्यायालयाचा निर्णय उद्‌धृत करतांना त्यांनी त्यातील एक शब्द गाळून टाकला. त्यामुळे मनमानी कपात करण्याचे समाधान त्यांनी मिळविले. उच्च शिक्षण संचालक या नात्याने आपल्या आदेशात मा.उच्च न्यायालयाचा निर्णय उद्‌धृत करतांना न्यायालयाच्या निर्णयातील शब्द वगळून टाकण्याचे कृत्य हे गुन्हेगारी स्वरूपाचे कृत्य आहे असे या महासंघाचे ठाम मत आहे.**

***तक्रार निवारण यंत्रणेमध्ये तक्रारीचे जन्मदातेच जर समाविष्ट असतील तर परिणाम काय होतात याचे ही समिती म्हणजे उत्तम उदाहरण होय. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानंतरसुद्धा यथोचित तक्रार निवारक यंत्रणा स्थापित होऊ नये व केवळ त्या आदेशाची थट्टा केली जावी ही गोष्ट अनुचित होय.***

*( परिच्छेद ७४ पहा )*

## (४)
## १० वर्षांपेक्षा जास्त काळ झाला पण मा.उच्च न्यायालयाच्या तक्रार निवारक यंत्रणेबाबतच्या निर्णयाची अंमलबजावणी नाही
### Grievance Redressal Mechanism

**६४.** उच्च शिक्षण विभागाने घेतलेल्या काही निर्णयांमुळे विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांवर व्यथित होण्याची पाळी आली असेल तर त्या व्यथेतून मुक्ती मिळविण्यासाठी आंदोलन करण्याशिवाय आज दुसरा कोणताही मार्ग शिक्षकांना उपलब्ध नाही. ही गोष्ट शिक्षक संघटनांनी वारंवार शासनाच्या लक्षात आणून दिली पण त्याबाबतीत कोणतीही उपाययोजना करण्यात आली नाही. सन २०१२ च्या याचिका क्रमांक १३२६ मध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिनांक **१० मे २०१३** रोजी जो निर्णय दिला त्यातील परिच्छेद २४ पुढीलप्रमाणे आहेः-

"24. Whatever may be the reason for delay in taking the decision or justification or otherwise for not extending the cooperation to the examination related work, it is the students who are bound to suffer on account of such non-cooperation between the teachers and the authorities. We are therefore of the view that State Government should set up the **Grievance Redressal Mechanism** before which the teacher or their Association can raise their grievances or demands and after considering the recommendations of such body, the State Government or the University may take necessary decisions. It is on account of **absence of such mechanism** to get the disputes and grievances resolved and redressed that the present unfortunate agitation started. The Grievance Redressal Body should be set up by 31st July 2013."

मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयावर उच्च शिक्षण विभागाने SLP दाखल केली नाही व या निर्णयातील बहुतेक आदेशांची अंमलबजावणी केली. मात्र उपरोक्त परिच्छेद २४ मधील आदेशाची आज १० वर्षांपेक्षा जास्त काळ झाला तरी अंमलबजावणी झाली नाही. याबाबत केवळ काही हास्यास्पद उपाययोजना करण्यात आल्या. त्यांचा प्रथम आढावा घेऊ.

**६५.** तक्रार निवारक यंत्रणा ३१ जुलै २०१३ पर्यंत स्थापन केल्या जाईल व त्यामुळे शिक्षकांवर आंदोलन करण्याची पाळी येणार नाही अशी एक मोठी समाधानाची भावना मा. उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे उच्च शिक्षणक्षेत्रामध्ये निर्माण झालेली होती. पण दुर्दैवाने याबाबतीत जो शासननिर्णय निर्गमित करण्यात आला **त्या शासननिर्णयाने व्यथा निर्मिती यंत्रणेलाच व्यथा निवारक यंत्रणेची झूल पांघरण्यात आली.** २५ जुलै २०१३ च्या या शासननिर्णयाने निर्माण केलेल्या तक्रार निवारक यंत्रणेमध्ये निरनिराळ्या आठ सदस्यांचा समावेश करण्यात आलेला होता तो पुढीलप्रमाणे :-

"1. Hon'ble Minister (Higher & Technical Education) ....President

2. Hon'ble State Minister (Higher & Technical Education) ...Vice President

3. Principal Secretary (Higher & Technical Education) ...Member

4. Principal Secretary (Service)...Member

5. Principal Secretary (Finance)...Member

6. Principal Secretary (Planning)...Member

7.Principal Secretary (Law and Justice)...Member

8. Joint Secretary/Deputy Secretary (Vishi)...Member"

**६६.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने दिनांक २४ सप्टेंबर २०१३ रोजी राज्यशासनाला एक निवेदन पाठवून या शासननिर्णयाबाबतची आपली तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केलेली होती. त्या पत्रातील परिच्छेद ३, ४ व ५ पुढीलप्रमाणे आहेतः-

"3. **The entire teaching community in the State is shocked by the composition of the Grievance Redressal mechanism in the form of a Committee inasmuch as the creators of the grievance are assigned the role to act as arbitrators through the said Committee.**

4. **As your honour are fully aware that no decision in the Higher Education Department is taken without the approval of either the cabinet or the Minister of the cabinet rank holding the charge of the department of Higher Education.** In the mechanism constituted by the G.R., the Hon'ble Minister is occupying the post of Chairman of the Committee. The other members are mostly either instrumental in taking decision or are subordinate to the decision-makers. The present arrangement **is completely opposed to the concept of fair-play and justice and would only make a mockery of the Grievance Redressal Mechanism which the Hon'ble High Court had very thoughtfully and rightly directed to be constituted.**

5. **In fact, the Principal Secretary to Higher Education, Joint Secretary and Deputy Secretary in the Higher Education Department (Vishi) would be the answerable parties before the grievance redressal mechanism in respect of the grievances that MFUCTO may raise.** They cannot therefore be the members of such Committee. This arrangement would ask the very persons whose actions have resulted in the grievance to hold hearing and decide the matter."

**६७.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने २४ सप्टेंबर २०१३ च्या याच निवेदनात ही व्यथा निवारक यंत्रणा कशी असावी याबाबत सुद्धा या पत्राच्या परिच्छेद ६ मध्ये एक प्रस्ताव दिलेला होता. तो पुढीलप्रमाणे :-

"6. MFUCTO as a gesture of constructive contribution proposes that the composition of the Grievance Redressal mechanism in the form of a Committee should be of two or three retired Presiding Officers of the University & College Tribunals in Maharashtra who are either sitting Judges or retired Judges of the Hon'ble High Court at Bombay whose impartiality cannot be doubted by the parties."

**६८.** याबाबतचा महाराष्ट्रातील इतिहास काळजीपूर्वक लक्षात घेतला तर विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांची यापूर्वी झालेली बहुतेक आंदोलने ही मंत्रालयातून सचिवांनी काढलेल्या शासननिर्णयांमुळे निर्माण झालेली होती असे स्पष्टपणे दिसून येते. याची काही ठळक उदाहरणे नमूना म्हणून पुढीलप्रमाणे नमूद करता येतील:-

**(i) सन १९७५ ते १९७७ चे आंदोलन :** तिसऱ्या वेतन आयोगाच्या वेळी मंत्रीमंडळाने निर्णय घेतला. **त्याप्रमाणे राज्याच्या शिक्षणमंत्र्यांनी विधानसभेत दिनांक ४ एप्रिल १९७५ रोजी निवेदन केले ते पुढीलप्रमाणे :- "नवीन वेतनश्रेणी :- विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेल्या वेतनश्रेणी जशाच्या तशा शासनाने स्वीकारलेल्या आहेत.** या वेतनश्रेणी वि. अ. आ. ने किंवा विद्यापीठांनी

***पीठासीन अधिकारी म्हणून प्राचार्य किंवा सरकारी अधिकाऱ्यांची नेमणूक म्हणजे न्यायाधिकरणाची थट्टा करणे होय...... मा.सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या न्यायतत्त्वाचा विचार करता असे करणे संपूर्णपणे चुकीचे आहे. असा निष्कर्ष मा.उच्च न्यायालयाने या प्रकरणी नमूद केला.***

( परिच्छेद ७९ पहा )

***जवळ जवळ १३२० कोटी ९३ लक्ष रुपयांचा निधी महाराष्ट्र शासनाच्या सुपूर्त करण्यास भारताच्या मा. राष्ट्रपतींनी मान्यता दिली. त्याप्रमाणे तो निधी महाराष्ट्र शासनाच्या सुपूर्त करण्यात आला. केंद्रशासनाच्या पत्रात नमूद असलेल्या अटी व शर्तीनुसारच वापर केला जाईल या अटीवर हा निधी मंजूर करण्यात आला आहे.*** *( परिच्छेद १५ पहा )*

विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांना देण्यात येतील व ज्या शिक्षकांना दोन्ही अर्हता नाहीत त्यांना त्या अर्हता प्राप्त करीपर्यंत आजची वेतनश्रेणी लागू राहील व त्यांनी अर्हता ५ वर्षात प्राप्त करावी अन्यथा त्यांची पुढील वार्षिक वेतनवाढ रोखली जाईल." *(महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही : अधिकृत प्रतिवेदन, खंड ४३, क्रमांक २८, पृष्ठ ३६-३८)*

**(ii)** पुढे जून १९७५ मध्ये देशामध्ये आणिबाणी घोषित करण्यात आली, याचा फायदा घेऊन सचिवांनी वेगळाच प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवला. "राईट अबाऊट टर्न" ची भूमिका घेतली. विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केलेल्या वेतनश्रेणी लागू करण्यासाठीचा शासन निर्णय (क्रमांक USG-1174/ 104287) हा दिनांक ४ आक्टोबर १९७५ रोजी निर्गमित झाला. **"These qualifications are applicable to both existing teachers and the teachers who may be recruited hereafter."** अशा प्रकारची उलटी शब्द रचना या शासननिर्णयामध्ये टाकण्यात आली. शब्द फिरविण्याच्या शासनाच्या या भूमिकेमुळे उच्च शिक्षण क्षेत्राला कमालीचा धक्का बसला, कुलगुरू हादरून गेले. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने याचा धिक्कार केला. धिक्काराच्या एका जाहीर सभेनंतर **महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष व सरचिटणिस यांना १ नोव्हेंबर १९७५ रोजी 'मिसा'खाली अटक करून १५ महिने स्थानबद्धतेत ठेवण्यात आले.**

**(iii)** पुढे अनेक लहानमोठी आंदोलने झाली. आणिबाणी संपली. मंत्रीमंडळ बदलले. आंदोलने सुरूच राहीलीत. तत्कालीन मा. मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील यांनी महासंघाला चर्चेसाठी बोलाविले व पूर्वीच्या शासनाची चूक दुरुस्त करण्याचे मान्य केले. ४ ऑक्टोबर १९७५ च्या आणिबाणी काळातील शासननिर्णयाच्या परिच्छेद ६ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद होती :- "The qualifications are **applicable to both existing teachers and the teachers who may be recruited hereinafter."** उपरोक्त तरतूद काढून टाकून त्याऐवजी पुढील तरतूद शासननिर्णयामध्ये टाकण्यात यावी असे ठरले :- "The qualifications mentioned in (a)/(b) above are applicable to lecturers/teachers **who may be recruited hereafter** i.e. on or after the date of this revised Government Resolution." ठरल्याप्रमाणे नवीन शासननिर्णय हा दिनांक २५ ऑक्टोबर १९७७ रोजी निर्गमित झाला.

सारांश काय तर मंत्रालयीन निर्णयातून व्यथा निर्माण झाली होती. मोठे आंदोलन झाल्यावर व मंत्रीमंडळ बदलल्यावर नव्या मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानंतर व्यथा निवारण झाले. **येथे आंदोलनाऐवजी सुसंस्कृत समाजाला तक्रार निवारक यंत्रणेसमोर बाजू मांडण्याचा मार्ग कां मान्य होवू नये?**

**६९. सन १९८८ मध्ये झालेले ३२ दिवसांचे आंदोलन :- कार्यभाराबाबत एका सचिवांनी अज्ञानापोटी केलेल्या कारवाईमुळे अकारणच सन १९८८ मध्ये ३२ दिवसांचे कामबंद आंदोलन विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांवर लादल्या गेले.**

**(i)** कलकत्ता विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ.एस.एन.सेन यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठ अनुदान आयोगाने नेमलेल्या कमिटीने (Committee on Governace of Universities & Colleges) आपला अहवाल १९७३ मध्ये आयोगाला सादर केला. सेन कमिटीने कार्यभारासंबंधी काही शिफारशी केल्या व या शिफारशीवर विचार करून विद्यापीठ अनुदान आयोगाने याबाबतचा आपला निर्णय केंद्र शासनाला कळविला व केंद्र शासनाने १६.१.१९७५ च्या आदेशान्वये प्राध्यापकांचा दर आठवड्याचा कार्यभार काय असावा या विषयीच्या तपशीलवार सूचना दिल्या. **त्याशिवायचे इतर आणखी तपशील आपण राज्याच्या पातळीवर ठरवावेत असेही कळविले.**

**(ii)** महाराष्ट्र राज्याच्या मा.मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी जी चर्चा झाली त्यामध्ये याबाबतचे तपशीलवार व बारीक-सारीक निर्णय झाले. दिनांक ८ जुलै १९७७ रोजी झालेल्या या बैठकीचे अध्यक्ष खुद्द मा.मुख्यमंत्री होते. मा.शिक्षणमंत्री व शिक्षण राज्यमंत्री सुद्धा या बैठकीला हजर होते. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या वतीने संघटनेचे कार्यकारी मंडळ या चर्चेमध्ये सहभागी झाले होते. सहाही विद्यापीठाच्या वतीने विद्यापीठाचे कुलगुरू या बैठकीला उपस्थित होते. मतैक्यपत्रामध्ये कार्यभाराविषयीचे हे मुद्दे तपशीलवारपणे नोंदविले आहेत. तीनही मतैक्यपत्राच्या आधारे एकत्रित समझोतापत्रक (टर्मस् ऑफ सेटलमेंट) तयार करून दिनांक २२.९.१९७७ रोजी हा समझोता कार्यभाराच्या तपशीलासह मा.मुंबई उच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आला. उपरोक्त समझोता पत्राच्या आधारावर २५ ऑक्टोबर १९७७ रोजी शासन आदेश क्रमांक यु.एस.जी.११७७/१२९३८७/३२ सेल हा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. या शासननिर्णयाच्या परिच्छेद (vi) मध्ये कार्यभाराविषयीचे उपरोक्त तपशील जसेच्या तसे एका शब्दाचा बदल न करता नमूद करण्यात आलेले आहेत.

**७०. सन २००९ चे ४४ दिवसांचे आंदोलन :- तक्रार निवारक यंत्रणेच्या अभावी सचिवांची मनमानी कशी चालते व ते मंत्रीमंडळात त्यांना पाहिजे ते निर्णय कसे करवून घेतात याचा ऐतिहासिक** नमुना सन २००९ मध्ये पहायला मिळाला. १ जानेवारी २००६ पासून लागू झालेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या महाराष्ट्रात लागू केल्या तर जवळ जवळ १५१० कोटी रुपयाचे (८० टक्के) अनुदान केंद्र शासन महाराष्ट्राला देईल असे केंद्रीय शिक्षण विभागाने महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण विभागाला लेखी कळविले होते. केंद्राची एक रुपयाची मदत नाही मिळाली तरी चालेल पण या शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वेतनश्रेण्या द्यायच्याच नाहीत असे उच्च शिक्षण सचिवांनी स्वतःशीच ठरवून टाकले होते.

**(i)** दिनांक १४ जुलै २००९ पासून महासंघातर्फे सुरु करण्यात आलेल्या बेमुदत काम बंद आंदोलनाचा परिणाम म्हणून दिनांक १५ जुलै २००९ रोजी महाराष्ट्र शासनाच्या मा. उच्च शिक्षण मंत्री व सचिव यांनी महासंघाच्या कार्यकारी मंडळाला चर्चेसाठी निमंत्रण दिले व महासंघासोबत दिनांक १५, १६ व १८ जुलै २००९ रोजी महासंघाच्या मागण्या संदर्भात चर्चा केली. दिनांक २३ जुलै रोजी सचिवांनी अत्यंत चूकीचा प्रस्ताव ठेवून निर्णय मंत्रीमंडळामध्ये करवून घेतला. शासनाने **दिनांक २४ जुलै २००९** रोजी आंदोलनाच्या मागण्यासंदर्भात एक पत्र महासंघाला दिले. सदर पत्राच्या वाचनानंतर महासंघासोबत सचिव फार मोठा घातपात करीत आहेत हे महासंघाच्या लक्षात आले. कारण या पत्रात सचिवांनी असे स्पष्टपणे नमूद केले होते की मंत्रिमंडळाने "**राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे १ जानेवारी, २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत निर्णय घेतला आहे.**" या वाक्याचा अर्थ पत्र लिहिणाऱ्यांना कळला की नाही हे त्यांचे त्यांना ठाऊक पण महासंघाला तो नक्की कळला. उपरोक्त वाक्याच्या वाचनाने महासंघाच्या कार्यकारी मंडळाला आश्चर्य वाटले. **महाराष्ट्रभर प्राध्यापकांमध्ये या वाक्यामुळे संतापाची लाट उसळली.** दिनांक २६ जुलै २००९ रोजी महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत शासनाच्या या पहिल्या पत्राच्या निषेधाचा एक तपशीलवार ठराव सम्मत करुन तो मा. उच्च शिक्षण मंत्र्यांना पाठविण्यात आला.

**(ii)** महासंघाच्या अनेक नेत्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री श्री. अशोकराव

***भारताच्या मा.राष्ट्रपतींची, केंद्रीय मंत्रीमंडळाची व राज्य मंत्रीमंडळाची या अधिकाऱ्यांनी उघडउघड फसवणूक करणे हे अत्यंत लज्जास्पद कृत्य होय. या सर्व बाबींची चौकशी करण्यात यावी व जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी या महासंघाची मागणी आहे.***

*( परिच्छेद २० पहा )*

चव्हाण यांच्या कानावर सचिवांच्या या दुष्टबुद्धीच्या प्रस्तावाची माहिती दिली. खुद्द मा. मुख्यमंत्र्यांनी याबाबतची स्वतंत्रपणे माहिती करवून घेतली. ३० जुलैच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत २४ जुलै २००९ रोजीचा निर्णय बदलण्यात आला.

"केंद्र शासनाच्या मानव संसाधन विकास विभागाच्या पत्र क्र.१-३२/२००६/U-II/U,१(i), दिनांक ३१ डिसेंबर, २००८ अन्वये अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक संवर्गासाठी ज्या वेतनश्रेणी इ.बाबतच्या शिफारशी करण्यात आल्या आहेत. त्याचा विचार करुन राज्य शासनाने **"राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालये/संस्था यामधील शिक्षक व इतर समकक्ष पदांना केंद्र शासनाप्रमाणे (यू.जी.सी. योजना) वेतनश्रेणी व महागाई भत्ता दिनांक १.१.२००६ पासून लागू करण्याचा व इतर भत्ते व अनुषंगिक लाभ राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे लागू करण्याचा निर्णय घेतला आहे." असे उच्च शिक्षण सचिवांनी या महासंघाला ३१ जुलै २००९ रोजीच्या पत्रान्वये कळविले.**

**७१.** नेट-सेटमुक्त शिक्षकांचा मनापासून द्वेष करणाऱ्या उच्च शिक्षण सचिवांनी **"१९९१ नंतर लागलेल्या व नेट-सेट नसलेल्या सर्व शिक्षकांच्या नेमणूका बेकायदेशीर आहेत. त्यांना सहाव्या वेतन आयोगातील कोणत्याही वेतनश्रेणीत टाकता येणार नाही"** असा प्रस्ताव मंत्रीमंडळात मंजूर करवून घेतला व **"यांना काढून टाकता येईल काय?"** याबाबत त्यांनी विधी विभागाकडे लेखी मत मागविले होते. काढून टाकण्याच्या बाबतीत विधी विभागाने "Not desirable" या शब्दात त्यांना लेखी मत दिले. त्यानंतर पाचव्या वेतन आयोगाच्या आहे त्याच वेतनश्रेणीत या शिक्षकांना ठेवण्याचा निर्धार सचिवांनी केला. तशा तरतुदी त्यांनी १२ ऑगस्ट २००९ च्या शासननिर्णयात टाकून ठेवल्या व तो शासननिर्णय निर्गमित झाला.

मा. मुख्यमंत्र्यांच्या दालनात दिनांक २० ऑगस्ट २००९ रोजी महासंघाच्या कार्यकारी मंडळाशी झालेल्या चर्चेच्या वेळी "या शिक्षकांना सहाव्या वेतन आयोगातील बॉटम स्केल सुद्धा दिले जाणार नाही असा शासननिर्णय निर्गमित झाला आहे" ही बाब महासंघाने तत्कालीन मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण यांच्या लक्षात आणून दिली तेव्हा त्यांना मोठेच आश्चर्य वाटले. त्यानंतर श्री.अशोकराव चव्हाण यांनी अतिशय करड्या आवाजात सर्वासमक्ष शिक्षण सचिवांना "या नेट-सेटमुक्त शिक्षकांना चौथ्या वेतन आयोगात आपण 'बॉटम स्केल' दिले होते की नाही?" सचिव 'होय' म्हणाले. पून्हा अशोकरावांनी प्रश्न केला "या शिक्षकांना पाचव्या वेतन आयोगात आपण 'बॉटम स्केल' दिले होते काय?" सचिव म्हणाले 'होय'. त्यावर श्री. अशोकराव चव्हाण यांनी ठाम आदेश दिला. "सहाव्या वेतन आयोगात त्यांना बॉटम स्केल दिले जाईल" अशी शासननिर्णयात दुरुस्ती करा. तशी दुरुस्ती झाली.

**७२.** महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासून तर आजतागायत विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांची जी राज्यस्तरीय आंदोलने झालीत त्याची माहिती करून घेतल्यास असे लक्षात येते की, जवळ जवळ सर्वच्या सर्व आंदोलने ही मंत्रालयातून निघालेल्या शासननिर्णयातून उद्‌भवलेली होती. शिवाय सचिवांना मंत्र्यांचे व मंत्रीमंडळाचे जे सान्निध्य असते त्यामुळे एखाद्या वर्गाविषयीच्या आपल्या पूर्वग्रहासह मंत्रीमंडळात निर्णय करवून घेणे त्यांना सहज शक्य असते. तसेही मंत्रीमंडळाचा एकही निर्णय चुकू शकत नाही असे कोणीही म्हणणार नाही. असा जर चुकीचा निर्णय झाला असेल तर त्यावर पुनर्विचार किंवा पुनर्निर्णय होण्याच्या मधल्या काळामध्ये आंदोलन हा एकच उपाय असावा काय? याचा सुसंस्कृत समाजामध्ये निश्चित विचार झाला पाहिजे आणि **त्यासाठीच तक्रार निवारक यंत्रणा ही एक महत्त्वाची उपाययोजना होय. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानंतरसुद्धा अशा प्रकारची तक्रार निवारक यंत्रणा स्थापित होऊ नये व केवळ त्या आदेशाची थट्टा केली जावी ही गोष्ट अनुचित होय.**

**७३.** दिनांक २५ जुलै २०१३ च्या शासननिर्णयान्वये स्थापन केलेल्या तक्रार निवारण यंत्रणेबद्दल सर्व बाजूंनी तक्रारी आल्यात व जवळ जवळ ती यंत्रणा निरुपयोगी झाली. सन २०१३ पासून २०१६ पर्यंत या समितीने एकही तक्रार निकाली काढल्याच इतिहास नाही. तेव्हा शासनाने या समितीची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेतला. दिनांक १० मार्च २०१६ रोजीच्या शासननिर्णयान्वये तक्रार निवारक यंत्रणा म्हणून एका विशेष समितीची स्थापना करण्यात आली. ही विशेष समिती २०१३ च्या यंत्रणेपेक्षासुद्धा टाकावू यंत्रणा म्हणून सिद्ध झाली. पहिले कारण म्हणजे ही समिती जवळ जवळ १८ ते २० सदस्यांची होती. दुसरे असे की, या यंत्रणेचे कार्यालय कोठे राहील व कार्यपद्धती कशी राहील याविषयीचा कोणताही उल्लेख या शासननिर्णयामध्ये नमूद नाही आणि त्यामुळेच सन २०१६ पासून तर आजपर्यंतच्या काळात ही समिती 'निष्काम' स्थितीत सुस्त पडून आहे. खुद्द या शासननिर्णयाच्या परिच्छेद ३ मध्ये विशेष बाब म्हणून एक बाब या समितीकडे सोपविली होती ती पुढीलप्रमाणे:-

"३. उपरोक्त नमूद बाबीव्यतिरिक्त दि. ०४ फेब्रुवारी, २०१३ ते दि. १० मे, २०१३ या कालावधीत परीक्षेच्या कामकाजावरील बहिष्कारात सहभागी झालेल्या शिक्षकांचे दि. ०४ फेब्रुवारी, २०१३ ते दि. १० मे, २०१३ या कालावधीचे वेतन बंद करण्याबाबत घेतलेल्या आदेशाच्या अनुषंगाने शिक्षक संवर्ग व शिक्षक संघटनांची भूमिका ऐकून घेऊन निर्णय घ्यावा."

**७४.** हा जो विषय या समितीकडे सोपविला होता या एका विषयावर समितीने दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये एकमताने निर्णय घेतला व त्या निर्णयाचे सुद्धा पुढे खूप धिंडवडे निघाले. समितीने घेतलेला हा निर्णय एकमताचा होता. समितीच्या निर्णयाला उचलून धरणारा व समितीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास बाध्य करणारा निर्णय मा.उच्च न्यायालयाने दिनांक २३ जानेवारी २०१९ रोजी दिला. पण याचा त्या विशेष समितीला आनंद झाला नाही. उच्च शिक्षण सचिव व उच्च शिक्षण संचालक हे दोघेही समितीच्या बैठकीला उपस्थित होते व तो एकमताचा निर्णय घेण्यामध्ये सहभागी होते. असे असूनही या दोघांनीही त्यांच्या एकमताच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयामध्ये पुनर्विलोकन याचिका (Review Petition) दाखल केली. आणखी विशेष गोष्ट अशी की, समितीने एकमताने घेतलेल्या निर्णयाच्या बाजूने उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात या दोन सदस्यांनी सर्वोच्च न्यायालयात SLP दाखल केली. त्याहूनही आणखी विशेष बाब अशी की, राज्याचे वित्त सचिव हे या समितीचे सदस्य होते व एकमताने निर्णय घेण्यात ते सहभागी होते. पण त्यांची एक तपशीलवार नोट समितीच्या निर्णयाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल झाली. सारांश काय तर या समितीचे अशा रीतीने धिंडवडे निघाले. **तक्रार निवारण यंत्रणेमध्ये तक्रारीचे जन्मदातेच जर समाविष्ट असतील तर परिणाम काय होतात याचे ही समिती म्हणजे उत्तम उदाहरण होय. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानंतरसुद्धा यथोचित तक्रार निवारक यंत्रणा स्थापित होऊ नये व केवळ त्या आदेशाची थट्टा केली जावी ही गोष्ट अनुचित होय.** अतएव यथोचित तक्रार निवारक यंत्रणा तातडीने स्थापित करण्यात यावी. ताबडतोबीची व्यवस्था म्हणून त्या त्या विभागाच्या न्यायाधिकरणाकडे हे काम सोपविले जावे, अशी या महासंघाची मागणी आहे.

**७५.** सेवामुक्तीच्या तक्रारी व इतर प्रकारच्या तक्रारींची सुनावणी करणे व त्यावर निर्णय देणे हे एक प्रकारे न्यायिक स्वरूपाचे काम होय. सेवामुक्तीच्या तक्रारी ऐकण्यासाठीच्या यंत्रणेची निर्मिती दिनांक २३ एप्रिल १९७७ रोजी मा.मुख्यमंत्री व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ यांच्यात झालेल्या पहिल्या मतैक्यपत्रातून अस्तित्वात आली. उभयपक्षी स्वाक्षरीत झालेल्या या मतैक्यपत्रामध्ये तिसऱ्या परिच्छेदाचा मथळा "Retrenchment cases of 1975" असा असून तो परिच्छेद पुढीलप्रमाणे आहे. :-

"**3. Retrenchment cases of 1975 :** It was noted that the main reason why these cases (of 116 retrenched teachers) have remained pending is that **there is no legally constituted machinery to redress the grievances** of the teaching and non-teaching staff of non-Government affiliated Colleges regarding their service conditions. **It was agreed that this lacuna will be removed by a suitable amendment of the University Acts.** The Chief Minister, however, observed that while undertaking this amendment, it ought to be ensured that the legal process does not become lengthy and dilatory and that the cases of disputes are settled promptly and, in any case, within a period of 2 months. **The details of the amendment will be speedily worked out."**

**७६.** शासनाने एकदा मागणी सभागृहात किंवा सभागृहाच्या बाहेर मान्य केल्यावर त्या मागणीच्या पूर्ततेसाठीचा शासननिर्णय निर्गमित करणे, अधिनियमाची किंवा सुधारणा अधिनियमाची (Amending Act) पूर्तता करण्याच्या प्रक्रिया पार पाडणे, याबाबतच्या कृती किती वेगाने मंत्रालयात पार पडतात? हे लक्षात घेणे आवश्यक आहे. ज्या मागणीची पूर्तता करीत असतांना वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांना सेवेच्या काही नव्या संधी उपलब्ध होतील. (उदाहरण नमूद करावयाचे झाले तर राज्य निवडणूक आयोग स्थापीत होत असतांना केलेल्या कायद्यामध्ये सेवेतील किंवा सेवानिवृत्त सनदी अधिकाऱ्यांची सोय लावण्यात आली. जलसंपत्ती नियमन प्राधिकरण तयार करण्यात आले तर त्यावर सुद्धा सेवानिवृत्त सनदी अधिकाऱ्यांची सोय लावण्यात आली. अशी डझनावारी प्रकरणे नमूद करता येतील. कोणत्याही महामंडळावर किंवा प्राधिकरणावर अशा अधिकाऱ्यांची सोय लावण्याची संधी म्हणून पाहिले जाते.) अशा प्रकारच्या मागण्यांच्या पूर्ततेबाबत मंत्रालयात फार वेगाने कार्यवाही होते, असे दिसून येते.

न्यायाधिकरणाच्या स्थापनेच्या मागणीची पूर्तता करण्याच्या बाबतीत मंत्रालयातील अधिकाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर सेवेची संधी म्हणून त्याकडे पाहिले गेले व त्यामुळे या मागणीची पूर्तता त्वरेने झाली. दिनांक २३ एप्रिल १९७७ रोजी उभयपक्षामध्ये मतैक्यपत्र स्वाक्षरीत झाले व पुढच्या अधिवेशनातच न्यायाधिकरणाची स्थापना करणारे विधेयक अतिशय तडफदारपणे सादर करण्यात आले. अधिकृतपणे **"महाविद्यालयीन न्यायाधिकरण"** (College Tribunal) स्थापन करणारे हे विधेयक तयार करीत असतांना उपसचिव किंवा त्यापेक्षा वरच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांची "प्रिसायडींग ऑफिसर" म्हणून सोय लावण्याची तरतूद या विधेयकामध्ये करण्यात आली. फक्त सनदी अधिकाऱ्यांनाच "सेवेची संधी" उपलब्ध करून दिली तर "संधीची सेवा" करण्यासाठी पात्र असलेल्या समतूल्य वर्गामध्ये 'शोभा' होऊ नये म्हणून पाच वर्षाची सेवा झालेल्या प्राचार्यांना सुद्धा "प्रिसायडींग ऑफिसर" म्हणून जिल्हा न्यायाधिशापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या न्यायिक व्यक्तीच्या बरोबरीत आणून बसविण्यात आले.

**७७.** न्यायिक कामकाजाशी आयुष्यात कधीही संबंध न आलेल्या व्यक्तींना पीठासीन अधिकारी म्हणून सुरुवातीच्या काळात नेमण्यात आले. त्याचे दुष्परिणामसुद्धा दिसायला लागले. काही ठिकाणाहून भ्रष्टाचाराच्या तक्रारी यायला लागल्या. एका पीठासीन अधिकाऱ्याला लाच घेतांना पकडले गेले अशी माहिती खुद्द राज्यमंत्र्यांनी सभागृहात दिनांक ६ डिसेंबर १९८८ रोजी दिली ती पुढीलप्रमाणे :-

**"प्रा.जावेद खान** : अध्यक्ष महोदय, **मा.सदस्य की शिकायत सही है ! बहुत दिनों से प्रिसाईडिंग ऑफिसर नही है ! वहाँपर जो प्रिसाईडिंग ऑफिसर था उसे एन्टी करप्शन ने पकड लिया !"** *(महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही : मंगळवार, दिनांक ६ डिसेंबर १९८८ : अधिकृत प्रतिवेदन, खंड ८४, क्रमांक ०२, पृष्ठ १४)*

**७८.** विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांसाठी न्यायाधिकरणाची जी कशीतरी "कुडमुडी व्यवस्था" महाराष्ट्रामध्ये स्थापन झाली तिच्यामध्ये आमूलाग्र सुधारणा करणारा एक निर्णय मा.उच्च न्यायालयाने दिनांक २९ जून १९८७ रोजी दिला. **खरे म्हणजे न्यायाधिकरणाच्या व्यवस्थेची फार मोठ्या प्रमाणात 'साफसफाई' करणारा निर्णय असेच या निर्णयाचे वर्णन करावे लागेल. क्रिष्णचंद्र शर्मा यांच्या प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या या निर्णयाचे तांत्रिक तपशील पुढीलप्रमाणे आहेत.** :- "High Court of Bombay : Krishna Chandra Sharma vs Sind Hyderabad National Collegiate Board and others : Hon'ble Judges : P.B. Sawant, G.H. Guttal : Case Type : Civil Reference : Final Decision : Delivered on 29th June 1987 : Reported : 1987 Mh. LJ 782"

**७९. पीठासीन अधिकारी म्हणून प्राचार्य किंवा सरकारी अधिकाऱ्यांची नेमणूक म्हणजे न्यायाधिकरणाची थट्टा करणे होय :** न्यायाधिकरणावर पीठासीन अधिकारी म्हणून प्राचार्यांची नेमणूक किंवा सरकारी अधिकाऱ्यांची नेमणूक करणारी कायद्याच्या कलम ४२ (ए) (३) च्या उपकलम (सी) आणि (डी) मधील तरतूद म्हणजे न्यायाधिकरणाच्या उद्दिष्टांची थट्टा करणे होय. **मा.सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या न्यायतत्त्वाचा विचार करता असे करणे संपूर्णपणे चुकीचे आहे. असा निष्कर्ष मा.उच्च न्यायालयाने या प्रकरणी नमूद केला.** न्यायाधिकरणाला ही प्रकरणे न्यायतत्त्वानुसार (Judicially) निकालात काढावयाची असतात. या न्यायाधिकरणाला सिव्हिल प्रोसीजर कोडप्रमाणे अधिकार देण्यात आलेले असतात. प्राचार्य आणि सरकारी अधिकारी यांना न्यायिक प्रकरणे निकाली काढण्याचा कोणताही अनुभव नसतो असे स्पष्ट मत मा.न्यायालयाने आपल्या निर्णयाच्या परिच्छेद ९ मध्ये व्यक्त केलेले आहे. ते शब्दशः पुढीलप्रमाणे:-

"It is contended, and according to us rightly, that to impose persons mentioned in Clauses 42-A(3)(c) and (d) as presiding officers of the Tribunal **is to make a mockery of the object of constituting the Tribunal** and is also against the essence of the law laid down by the Supreme Court on the subject, The persons concerned are virtually from the executive branch of administration with no experience either of Court of law or of deciding matters otherwise judicially. The Tribunal is vested with the power to decide the disputes judicially and is vested with the same powers as are vested in an Appellate Court under the Code of Civil Procedure. The persons concerned will have no experience of Court procedure much less of the procedure under the Civil Procedure Code."

**८०. शासकीय अधिकारी व प्राचार्य पीठासीन अधिकारी म्हणून नेमू नये : मा.सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या तत्त्वांचा विचार करता शासनाने प्राचार्य किंवा सरकारी अधिकाऱ्यांच्या संवर्गांतून पीठासीन अधिकाऱ्यांच्या नेमणुका करू नये असे स्पष्ट आदेश या निर्णयाच्या परिच्छेद ९ मध्ये नमूद आहेत.** ते पुढील शब्दात :-

"In view of the law laid down by the Supreme Court, we will have to hold that the provisions of section 42-A(3)(c) and (d) are in breach of the law and therefore void. **The Government therefore shall not appoint any person from the categories** mentioned in sub-clauses (c) and (d) of section 42-A(3) to preside over the Tribunal."

**८१. विद्यापीठाचा सल्ला अनावश्यक, मा.उच्च न्यायालयाशी सल्लामसलत आवश्यक :** विद्यापीठाशी सल्लामसलत करून या पीठासीन अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याबाबतच्या कायद्यातील तरतुदी ह्या न्यायिक तत्त्वाशी विसंगत आहेत. अशा प्रश्नावर सल्ला देण्यासाठी विद्यापीठ ही निश्चितच योग्य यंत्रणा नव्हे. पीठासीन अधिकाऱ्यांच्या नेमणुका करतांना मा.उच्च न्यायालयाशी सल्लामसलत बंधनकारक असेल असेही या निर्णयात नमूद करण्यात आलेले आहे. ते पुढील शब्दात :-

"We find that there is a good deal of substance in the grievance that University is hardly a body to tender advice on such appointments. In consonance with the view taken by a Division Bench of this Court in State of Maharashtra v. Labour Law Practitioner's Association, Tardeo, Bombay, 89 Bom.L.R. 120 and in view of the fact that the Tribunal so appointed is expected to work judicially, **the appointments to the Tribunal should be made by the State, Government in consultation with the High Court and not with the University which cannot be said to be a proper authority to give advice in such cases.** This is particularly so when we have held that no appointments to the Tribunal can be made from the categories of persons mentioned in section 42-A(3)(c) and (d)."

**८२.** सन १९९४ च्या विद्यापीठ कायद्यात "पीठासीन अधिकारी म्हणून उच्च न्यायालयातील सेवानिवृत्त न्यायमूर्तींचीच नेमणूक करण्यात येईल" अशी तरतूद आली. या गोष्टीला आता उणीपुरी ३० वर्षे होतात. तेव्हापासून न्यायाधिकरणाच्या कामकाजाबावत कोणत्याही कोपऱ्यातून कोणत्याही प्रकारच्या तक्रारी नाही. त्यापूर्वीच्या काळात तक्रारीचा महापूर महाराष्ट्राने पाहिला आहे. सेवामुक्तीबाबतच्या तक्रारी संबंधी जशी त्रयस्थ यंत्रणा महाराष्ट्रात आहे तशीच व्यवस्था इतर तक्रारीबाबत मा.उच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर सुद्धा का होऊ नये?

**दिनांक १० मार्च २०१६ च्या शासननिर्णयाने स्थापन करण्यात आलेली समिती या बाबतीत न्यायिक कसोटीवर टिकणारी नाही. न्यायिक कामासाठी शासकीय अधिकाऱ्यांना नेमू नये असा मा.उच्च न्यायालयाचा निर्णय असतांना अर्धा डझनाच्यावर शासकीय अधिकारी या विशेष समितीवर सदस्य म्हणून नेमलेले आहेत. न्यायिक कामासाठी व्यक्तींची नेमणूक करतांना विद्यापीठाशी किंवा विद्यापीठाच्या कुलगुरुंशी सल्लामसलत करण्याची गरज नाही असा मा.उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला असताना सर्व विद्यापीठांच्या कुलगुरुंना या समितीवर सदस्य म्हणून नेमले आहे.** याबाबतीत दिनांक १० मे २०१३ रोजीच्या मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अजूनही अंमलबजावणी झालेली नाही, हे अशोभनीय होय.

***केंद्रशासनातर्फे हे जे साहाय्य दिले जात आहे, हे केंद्राची संपूर्ण योजना* (Entire Scheme) *एक ''समग्र योजना''* (Composite Scheme) *म्हणून कोणताही बदल न करता सर्व अटी व शर्तीसह व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशन्ससह राज्यशासनाला अंमलात आणावी लागेल या अटीवरच देण्यात येत आहे.*** *( परिच्छेद १७ पहा )*

## (७)
## नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबतच्या मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांची अवहेलना

८३. "**नेट-सेट मुक्त शिक्षकांना नेमणुकीच्या दिवसापासून सेवा धरून जुनीच पेन्शन योजना लागू करावी लागेल**" अशा अर्थाचे मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या वेगवेगळ्या खंडपीठांनी निर्णय दिले. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले. पण उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी त्यासंदर्भात कसा खेळखंडोबा केला याचा इतिहास त्या विभागाला लाजेने मान खाली घालायला लावणारा आहे. याबाबतीत पहिला निर्णय हा दिनांक **३ ऑक्टोबर २०१८** रोजी मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने सन २०१७ च्या याचिका क्रमांक १३१६६ मध्ये दिलेला आहे. *(120/2018)* मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयाच्या परिच्छेद ६ मध्ये याचिकाकर्त्यांबाबतचे तपशील पुढील शब्दात नमूद आहेत :-

"We find that the contention raised on behalf of the Respondents are wholly untenable. Undisputedly, the **Petitioner when he was appointed in 1999 was possessing the requisite qualification except the net-set examination.** Not only this but the Petitioner's appointment was already approved by the Competent Authority and as such requisite scale was made applicable to the Petitioner till his retirement." *(120/2018)*

८४. मा. खंडपीठाने आपल्या या निर्णयाच्या परिच्छेद ७ मध्ये शासनाचा २७ जून २०१३ चा संपूर्ण शासननिर्णय शब्दशः उद्धृत केलेला आहे व त्याबाबतचे खंडपीठाचे मत परिच्छेद ८ मध्ये नमूद केलेले आहे. :-

**"It can be thus seen that vide aforesaid G.R., the State Government has exempted the lecturers who are appointed between 23/10/1992 to 03/04/2000 and who were not possessing the net-set examination,** M.Phil. and Ph.D.qualification. Only requirement is that the appointment of these lecturers is required to be made after following due selection process. The other requirement is that appointment of such lecturers ought to have been approved by the University and University should have submitted the proposal for grant of approval of such teachers to the University Grant Commission."

८५. या शिक्षकाची सेवा त्याच्या नेमणुकीच्या दिनांकापासून धरण्यात यावी असे मा.उच्च न्यायालयाच्या या आदेशाच्या परिच्छेद ९ मध्ये नमूद आहे. ते पुढील शब्दात :-

"Undisputedly, the Petitioners' appointment was made after following due selection process. Not only University as well as the Respondent -Joint Director of Education had also granted approval to the appointment of the Petitioner. **As such, it can be clearly seen that the Petitioner is entitled to the benefits of the said G.R. Undisputedly, the Petitioner's date of appointment is 20/9/1999 i.e. the date which falls between 23/10/1992 to 03/04/2000."**

८६. मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या या धोरणात्मक निर्णयाच्या विरोधात उच्च शिक्षण विभागाने मा.सर्वोच्च न्यायालयात SLP दाखल केली. (Civil Diary No. 14703/2019) दिनांक १ जुलै २०१९ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने ती फेटाळून लावली. मा.उच्च न्यायालयाचा हा पहिला निर्णय दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ रोजीचा आहे. त्यावर केव्हाही स्थगनादेश नव्हता. उलट SLP फेटाळून लावण्यात आली. असे असताना जवळ जवळ तीन वर्षे याबाबत उच्च शिक्षण विभागाने धोरणात्मक निर्णय निर्गमित करण्याची कोणतीही कारवाई केली नाही. नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजनाच लागू करावी लागेल असे आदेशित करणारा दुसरा धोरणात्मक निर्णय सन २०१७ च्या याचिका क्रमांक १२१९ मध्ये दिनांक १९ ऑक्टोबर २०१८ रोजी मा.मुंबई खंडपीठाने दिला. पहिल्या धोरणात्मक निर्णयाचा स्पष्ट उल्लेख या दुसऱ्या निर्णयामध्ये करण्यात आला असून त्या सारखेच हे प्रकरण असल्याचे खंडपीठाने या निर्णयाच्या परिच्छेद तीन मध्ये नमूद केलेले आहे. ते पुढील शब्दात :-

"(3) The facts in the present case are almost identical with the facts in Writ Petition No.13166 of 2017, which has been allowed by Division Bench of this Court vide judgment dated 3rd October 2018. We therefore find it appropriate to allow this Petition in the light of the judgment of the Division Bench dated 3rd October 2018 passed in Writ Petition No.13166 of 2017." *(137/2018)*

८७. या निर्णयामध्ये जुनी पेन्शन योजना लागू करण्याचे आदेश तर मा.उच्च न्यायालयाने दिलेच, मात्र त्याचबरोबर जुनी पेन्शन योजना लागू करतांना ५.१०.१९९२ या नेमणुकीच्या तारेखपासून त्या शिक्षकाची सेवा धरावी लागेल असे स्पष्ट आदेश या प्रकरणात पारित केले ते पुढीलप्रमाणे :-

**"ORDER : (i)** The Respondents are directed to make the pension applicable to the Petitioner on the basis of her last drawn salary. **(ii)** The pension is to be paid to the Petitioner from the month of November 2018. All the arrears between the date of superannuation till 31/10/2018 shall be cleared within a period of 3 months from today. **(iii)** Needless to state that while making pensionary scheme applicable, the date of the appointment of the Petitioner shall be construed as 05/10/1992. **(iv)** The Writ Petition is disposed of in the aforesaid terms." *(137/2018)*

८८. पहिला धोरणात्मक निर्णय शिक्षकांच्या बाजूने लागला व तो सर्वोच्च न्यायालयात कन्फर्म झाला तरीही धोरणात्मक शासननिर्णय निर्गमित न झाल्यामुळे शेकडो शिक्षकांना उच्च न्यायालयात जावे लागले. एकही निर्णय त्यांच्या विरोधात गेला नाही. जवळ जवळ ३५ वर खंडपीठांनी याबाबत अनुकूल निर्णय दिले. त्यातील महासंघाच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या २१ निर्णयांचे तपशील पुढीलप्रमाणे:-

**(1)** Writ Petition No. 13166 of 2017, Date of Judgment : 03rd October, 2018. **(2)** Writ Petition No.1219 of 2017, Date of Judgment : 19th October, 2018. **(3)** Writ Petition No. 1304 of 2016, Date of Judgment :12th December, 2018. **(4)** Writ Petition No. 755 of 2019, Date of Judgment : 9th April 2019. **(5)** Writ Petition No. 3293 of 2019, Date of Judgment :18/06/2019. **(6)** Writ Petition No. 2068 of 2019, Date of Judgment : 29th July 2019. **(7)** Writ Petition No. 11316 of 2015, Date of Judgment : 28th August 2019. **(8)** Writ Petition No.7375 of 2019, Date of Judgment : 9th July, 2020. **(9)** Writ Petition No.7395 of 2019, Date of Judgment : 9th July, 2020. **(10)** Writ Petition No. 9215 of 2018, Date of Judgment : 12th March, 2019. **(11)** Writ Petition No. 8909 of 2016, Date of Judgment : 3 February 2021. **(12)** Writ Petition No. 2719 of 2020, Date of Judgment : 09th February, 2021. **(13)** Writ Petition No. 7292 of 2020, Date of Judgment : 09th February, 2021. **(14)** Writ Petition No. 6905 of 2021, Date of Judgment : 20th August, 2021. **(15)** Writ Petition No.785 & 786 of 2021, Date of Judgment : 23rd August 2021. **(16)** Writ Petition No.2241 of 2021, Date of Judgment : 31st August, 2021. **(17)** Writ Petition No.2238 of 2021, Date of Judgment : 31st August, 2021. **(18)** Writ Petition No. 8724 of 2021, Date of Judgment : 05th October, 2021. **(19)** Writ Petition No. 2098 of 2021, Date of Judgment : 16.11.2021. **(20)** Writ Petition No. 2900 of 2020, Date of Judgment : 23rd November, 2021. **(21)** Writ Petition No. 404 of 2021, Date of Judgment : 23rd November, 2021.

८९. मा.उच्च न्यायालयाच्या वेगवेगळ्या खंडपीठाने जे निर्णय दिले त्यापैकी एका निर्णयात महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला विद्यापीठ अनुदान आयोगाने पाठविलेल्या एका पत्राचा उल्लेख आहे तो पुढील शब्दात :-

"21. This court had considered that pursuant to directions to UGC by Division Bench of this court at Nagpur dated 20-04-2011 in Writ Petition No. 4908 of 2010, UGC in its meeting held

on 08-07-2011 had resolved and accordingly **on 16-08-2011 communicated the same to the General Secretary of Maharashtra Federation of University and College Teachers Organization** with reference to its representation dated 17th August, 2011 as under:-

*"Kindly refer to your representation dated 17th August, 2011 on the subject mentioned above. The issue raised in the representation has been examined in the UGC and this is to inform you that, the Commission in its meeting held on 08-07-2011 considered the representation received in respect of lecturers appointed in the State of Maharashtra from 19th September, 1991 till 3rd April 2001 and resolved as under:-*

*"The Commission deliberated on the issue regarding appointment of various teachers in the State of Maharashtra from September 19, 1991 until April 3, 2000 and resolved that, all such appointments made on regular basis by various Universities in the State of Maharashtra where the University has granted exemption to teacher from the requirement of NET in terms of the UGC Regulations, 1991 and subsequent notification dated 24.12.1998 and where the representation has been forwarded to Commission seeking further approval in relation to such regular appointment made during the said period w. e. f. September 19, 1991 till April 3, 2000 is approved. ...."*

*The above decision (dated 08-07-2011) of the Commission has alreadybeen communicated by the UGC vide its letter No. F-1-1/2002 (PS) Exemp, Pt. File IV dated 16th August 2011 to the Principal Secretary, State of Maharashtra, Higher and Technical Education Department, Mumbai.*

*As may be seen from the above decision of the Commission, the Commission has taken the said decision in respect of all such appointments made on regular basis by various universities during the period from September 1991 to April 3, 2000.* ***Therefore, the services of such teachers for all purpose should be counted from the date of their regular appointment."***

**९०.** आणखी एका प्रकरणात तर मा.उच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात असे नमूद केले होते की, **"It emerges from the affidavit in reply filed by UGC that its regulations of 1991 were not implemented by government of Maharashtra providing for eligibility tests by UGC** or tests accredited by UGC." पण त्यापासून या अधिकाऱ्यांनी काही बोध घेतला नाही.

**९१. नेमणुकीच्या दिनांकापासून सेवा धरून या सर्व नेट-सेट मुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू राहील असा धोरणात्मक निर्णय मा.उच्च न्यायालयाच्या दोन खंडपीठांनी दिल्यानंतरसुद्धा त्यावर धोरणात्मक शासननिर्णय काढण्यासाठी उच्च शिक्षण विभागाने पुढच्या दोन-तीन वर्षात कोणतीही कारवाई केली नाही. पुढच्या काळात 'विपरित करणी' भरपूर केली.** संबंधित शिक्षकांना सहसंचालकांच्या मागे फिरायला लावणे, सहसंचालक प्रसन्न झाल्यास जुनी पेन्शन योजना लागू करणे, प्रसन्न करता न आल्यास "तुमच्याकडून काय होईल ते करून घ्या" असा मंत्र वापरला जाणे, "तुम्ही कोर्टात जा" "तेथे काहीही झाले तरी पुढचे आमच्याच हाती आहे" अशा धमक्या सुद्धा दिल्या जाणे, नुसत्या धमक्या दिल्या असे नव्हे तर त्या खऱ्याही करण्यात आल्या. मा.उच्च न्यायालयात अनुकूल निर्णय झाल्यावर काहींना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात आली तर काहींच्या विरुद्ध SLP दाखल करून त्यांना सर्वोच्च न्यायालयात पाठविण्यात आले. हा सारा इतिहास उच्च शिक्षण विभागाला लाजेने मान खाली घालायला लावणारा असला तरी त्यांची माहिती करून घेणे आवश्यक आहे.

**९२. महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण विभागातील अधिकारी सर्वोच्च न्यायालयासमोर सुद्धा शपथपत्रावर धडधडीत असत्य माहिती दाखल करतात, हे केवळ आश्चर्यकारक नव्हे तर खेदजनक सुद्धा आहे.** ही बाब तपशीलाने नमूद करण्याचे या महासंघाने ठरविले आहे. वस्तुतः सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका दाखल करतांना सर्वोच्च न्यायालयातील शासकीय अधिवक्त्यांना योग्य ती माहिती पुरविणे याबाबतची जबाबदारी विशिष्ट अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आलेली असते. ज्यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे, ते अधिकारी किती बेजबाबदारपणे काम करतात व धडधडीत असत्य माहिती सर्वोच्च न्यायालयासमोर सादर करतात याचे पुरावे नमूद करणे आवश्यक आहे. ते पुढीलप्रमाणे :-

**(i)** पहिले प्रकरण याचा अर्थ मारुती दत्तात्रय पाटील विरुद्ध महाराष्ट्र शासन या वादी प्रतिवादी मध्ये मा.उच्च न्यायालयाने सन २०१७ च्या याचिका क्रमांक १३१६६ मध्ये दिनांक ०३.१०.२०१८ रोजी ज्या प्रकरणी निर्णय दिला ते प्रकरण होय. या प्रकरणातील SLP चे तांत्रिक तपशील पुढीलप्रमाणे :-

**(1) Supreme Court of India :** Record of Proceedings : Special Leave Petition (Civil) Diary No(s).14703/2019 (Arising out of impugned final judgment and order dated 03-10-2018 in WP No. 13166/2017 passed by the High Court of Judicature at Bombay) The State of Maharashtra & Ors. Petitioner(s) Versus Maruti Dattatraya Patil & Ors. Respondent(s) **Date of Judgment : 01-07-2019.** *(यापुढे उल्लेख* ***'पहिले प्रकरण'*** *असा)*

**(ii)** दुसरे प्रकरण याचा अर्थ विजयकुमार बाबुराव रणपिसे विरुद्ध महाराष्ट्र शासन या वादी प्रतिवादी मध्ये मा.उच्च न्यायालयाने सन २०१९ च्या याचिका क्रमांक ७५५ मध्ये दिनांक ०९.०४.२०१९ रोजी ज्या प्रकरणी निर्णय दिला ते प्रकरण होय. या प्रकरणातील SLP चे तांत्रिक तपशील पुढीलप्रमाणे :-

**(2) Supreme Court of India :** Record of Proceedings : Special Leave Petition (Civil) Diary No(s).1076/2020 (Arising out of impugned final judgment and order dated 09-04-2019 in WP No. 755/2019 passed by the High Court of Judicature at Bombay) The State of Maharashtra & Ors. Petitioner(s) Versus Ranpise Vijaykumar Baburao & Ors. Respondent(s) **Date of Judgment : 07-02-2020.** *(यापुढे उल्लेख* ***'दुसरे प्रकरण'*** *असा)*

**(iii)** तिसरे प्रकरण याचा अर्थ राजेश वसंतराव पांडे विरुद्ध महाराष्ट्र शासन या वादी प्रतिवादी मध्ये मा.उच्च न्यायालयाने सन २०१९ च्या याचिका क्रमांक २०६८ मध्ये दिनांक २९.०७.२०१९ रोजी ज्या प्रकरणी निर्णय दिला ते प्रकरण होय. या प्रकरणातील SLP चे तांत्रिक तपशील पुढीलप्रमाणे :-

**(3) Supreme Court of India :** Record of Proceedings : Special Leave Petition (Civil) Diary No(s).1309/2020 (Arising out of impugned final judgment and order dated 29-07-2019 in WP No. 2068/2019 passed by the High Court of Judicature at Bombay Bench At Nagpur) The State of Maharashtra & Anr. Petitioner(s) Versus Rajesh Vasantrao Pande & Anr. Respondent(s) **Date of Judgment : 17-02-2020.** *(यापुढे उल्लेख* ***'तिसरे प्रकरण'*** *असा)*

**९३.** सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका दाखल करतांना एका तक्त्यामध्ये माहिती भरून तो तक्ता विशेष अनुमती याचिकेसोबत वर जोडावा लागतो. या तक्त्यात भरावयाची माहिती ही सर्वोच्च न्यायालयाच्या नियमांनी ठरवून दिलेली आहे. "PROFORMA FOR FIRST LISTING" असे या तक्त्याचे नाव असून त्यामध्ये या प्रकरणी हायकोर्टाचा निर्णय केव्हा झाला? व तेथे न्यायमूर्ती कोण होते? ही माहिती भरावी लागते. दुसऱ्या प्रकरणामध्ये "PROFORMA FOR FIRST LISTING" भरतांना ६ (अ) व (ब) या दोनही विचारणेला अधिकाऱ्यांनी अत्यंत असत्य व खोटारडी माहिती भरलेली आहे. दुसऱ्या प्रकरणात शासनातर्फे दाखल करण्यात आलेला या PROFORMA वर नजर फिरविली तरी ६(अ) आणि ६ (ब) या रकान्यात भरलेली माहिती संपूर्णपणे असत्य आहे, हे कोणाच्याही लक्षात येईल. भरण्यात आलेली माहिती ही असत्य आहे, एवढे नमूद करून न थांबता याबाबत दुसऱ्या प्रकरणी सत्य माहिती काय आहे? ती पहाणे आवश्यक आहे.

**९४.** दुसऱ्या प्रकरणामध्ये **भरावयाची माहिती :** 6. (a) Similar disposed of matter with citation, if any, & case details **भरलेली माहिती :** No similar matter is disposed of **अधिकाऱ्यांनी भरलेली माहिती धादांत खोटारडेपणाची आहे. खरी माहिती पुढीलप्रमाणे भरायला हवी होती** :- Yes, similar matter is disposed of on 01.07.2019. Citation and case details are as follows :- (1) SLP No : Special Leave Petition (Civil) Diary No(s).14703/2019. (2) Arising out of impugned final judgment and order dated 03-10-2018 in WP No. 13166/2017 passed by the High Court of Judicature at Bombay. (3) The State of Maharashtra & Ors. Petitioner(s) **VERSUS** Maruti

Dattatraya Patil & Ors. Respondent(s) (4) Date of Order : 01-07-2019.

**भरावयाची माहिती** : 6. (b) Similar pending matter with case details **भरलेली माहिती :** No similar matter is pending **अधिकाऱ्यांनी भरलेली माहिती धादांत खोटारडेपणाची आहे. खरी माहिती पुढीलप्रमाणे भरायला हवी होती :**- Yes, similar matter is pending. Following are the case details :- (1) SLP No : Special Leave Petition (Civil) Diary No(s).1309/2020. (2) Arising out of impugned final judgment and order dated 29-07-2019 in WP No. 2068/2019 passed by the High Court of Judicature at Bombay At Nagpur. (3) The State of Maharashtra & Anr. Petitioner(s) **VERSUS** Rajesh Vasantrao Pande & Anr. Respondent(s).

**९५.** तिसऱ्या प्रकरणामध्ये "PROFORMA FOR FIRST LISTING" भरतांना ६ (अ) आणि (ब) या दोनही विचारणेला अधिकाऱ्यांनी अत्यंत असत्य माहिती भरलेली आहे. तिसऱ्या प्रकरणात शासनातर्फे दाखल करण्यात आलेला या PROFORMA वर नजर फिरविली तरी ६(अ) व ६ (ब) या रकान्यात भरलेली माहिती असत्य आहे, हे कोणाच्याही लक्षात येईल. भरण्यात आलेली माहिती ही असत्य आहे, एवढे नमूद करून न थांबता याबाबत तिसऱ्या प्रकरणी सत्य माहिती काय आहे? ते पहाणे आवश्यक आहे.

**९६.** तिसऱ्या प्रकरणामध्ये **भरावयाची माहिती :** 6. (a) Similar disposed of matter with citation, if any, & case details **भरलेली माहिती :** No similar matter is disposed of **अधिकाऱ्यांनी भरलेली माहिती धादांत खोटारडेपणाची आहे. खरी माहिती पुढीलप्रमाणे भरायला हवी होती :**- Yes, similar matter is disposed of on 01.07.2019. Citation and case details are as follows :- (1) SLP No : Special Leave Petition (Civil) Diary No(s).14703/2019. (2) Arising out of impugned final judgment and order dated 03-10-2018 in WP No. 13166/2017 passed by the High Court of Judicature at Bombay. (3) The State of Maharashtra & Ors. Petitioner(s) **VERSUS** Maruti Dattatraya Patil & Ors. Respondent(s) (4) Date of Order : 01-07-2019.

**भरावयाची माहिती** : 6. (b) Similar pending matter with case details **भरलेली माहिती :** No similar matter is pending **अधिकाऱ्यांनी भरलेली माहिती धादांत खोटारडेपणाची आहे. खरी माहिती पुढीलप्रमाणे भरायला हवी होती :**- Yes, similar matter is pending. Following are the case details:-(1) SLP No : Special Leave Petition (Civil) Diary No(s).1076/2020. (2) Arising out of impugned final judgment and order dated 09-04-2019 in WP No. 755/2019 passed by the High Court of Judicature at Bombay. (3) The State of Maharashtra & Anr. Petitioner(s) **VERSUS** Ranpise Vijaykumar Baburao & Anr. Respondent(s).

**९७.** वस्तुतः उच्च शिक्षण विभागातील अवर सचिव श्री.विजय साबळे यांनी दुसऱ्या म्हणजे विजय रणपिसे प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने दिनांक ९ एप्रिल २०१९ रोजीच्या निर्णयाच्या विरोधात विशेष अनुमती याचिका दाखल करा असे पत्र *(6/2020)* दिनांक २५ नोव्हेंबर २०१९ रोजी संचालक उच्च शिक्षण, पुणे यांना पाठविले होते. हे पत्र पाठवितांना मा.सर्वोच्च न्यायालयाने सन २०१७ च्या याचिका क्रमांक १३१६६ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या विरोधात तत्सम प्रकरणी म्हणजे पहिल्या प्रकरणात १ जुलै २०१९ रोजी आपली विशेष अनुमती याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावली ही गोष्ट विजय साबळे यांना ठाऊक होती. तसे त्यांनी ५ डिसेंबर २०१९ रोजी उच्च शिक्षण संचालक यांना लिहिलेल्या पत्रामध्ये नमूद केलेले होते. *(6/2020)* पहिल्या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने १ जुलै २०१९ रोजी विशेष अनुमती याचिका फेटाळून लावलेली आहे. याची माहिती असल्याचे दिनांक ५ डिसेंबर २०१९ रोजीच्या पत्रान्वये मान्य केलेले असतांना ९ जानेवारी २०२० रोजी सर्वोच्च न्यायालयामध्ये "No similar matter is disposed of " असे दाखल करणे हे अतिशय गंभीर स्वरूपाचे लबाडीचे कृत्य असून न्यायालयाच्या घोर अवमानाचा प्रश्न त्यात अंतर्भूत आहे. त्यातही चुकून एखादी असत्य माहिती सर्वोच्च न्यायालयासमोर ठेवण्यात आली, तर ती बाब क्षम्य नसली तरी गंभीर समजली जाते. इथे तर जाणूनबुजून, पहिले प्रकरण निकाली निघालेले आहे (disposed of) याची माहिती असतांना "No similar matter is disposed of " अशी असत्य माहिती सादर करण्यामध्ये नुसती अवमानना (Contempt) नव्हे तर मा.सर्वोच्च न्यायालयाची घोर अवमानना (Aggravated Contempt) होते, हे अधिकाऱ्यांच्या लक्षात येऊ नये हे उच्च शिक्षण विभागाचे दुर्दैव होय.

**९८.** एक एक शिक्षक कुठे सर्वोच्च न्यायालयात जाणार? कुठे कागदपत्रे पहाणार? अशी निर्ढावलेली भावना या अभद्र व्यवहारामागे असू शकते. या प्रकरणी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष डॉ.एस.पी.लवांदे व सरकार्यवाह डॉ.प्रवीण रघुवंशी हे आपल्या सहकाऱ्यांसह दोन दिवस अगोदरपासून दिल्लीत मुक्काम ठोकून होते. आपल्या अधिवक्त्यांशी अगोदरच्या दिवशी तपशीलवार चर्चा या प्रतिनिधी मंडळाने केली होती. शिक्षकांना आपले धोतर धुवायला वेळ अपुरा पडतो. तेव्हा अशा "अवमान धुलाई"च्या प्रकरणात शिक्षक कशाला पडतील? अशा निर्ढावलेपणाच्या भावनेपोटी अधिकाऱ्यांच्या हातून उपरोक्त खोटारडेपणाचा प्रकार घडला असावा असे म्हणता येते. संघटनेच्या अधिवक्त्यांनी माहिती पुरविणाराने खोटी माहिती पुरविली आहे, हे मा.न्यायालयाच्या लक्षात आणून दिल्यावर व दिल्यामुळे सुनावणीत असलेल्या याचिकेबाबतीत त्याचे बरेवाईट परिणाम खोटी माहिती पुरविणाराला भोगावेच लागतात. पण तिथल्या तिथे अवमान केल्याबद्दल शिक्षा होत नाही. त्यासाठी स्वतंत्रपणे अवमान याचिका दाखल करावी लागते. व्यक्तीशः एक एक शिक्षक अशी अवमान याचिका दाखल करू शकत नाही व ते शक्यही नसते. अवमान याचिका दाखल करण्याचा विचार हा संघटीतपणेच होऊ शकतो.

**९९. मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये धडधडीत खोटी माहिती दाखल करण्यामागे काय हेतू होते? त्यास कोण अधिकारी जबाबदार होते? याची चौकशी करण्यात यावी व त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी तसेच या सर्व प्रकरणामध्ये शासनातर्फे करण्यात आलेला खर्च या अधिकाऱ्यांकडून व्यक्तीशः वसूल करण्यात यावा अशी या महासंघाची मागणी आहे.**

**१००.** उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी सर्वोच्च न्यायालयात काय 'उजेड' पाडला हे पाहिल्यानंतर मा.उच्च न्यायालयात त्यातील अनेकांनी काय 'दिवे' लावले याची माहिती नमूद करणे या महासंघाला आवश्यक वाटते.

याचिकाकर्त्या प्राध्यापिकेला "तुम्हाला नवीन पेन्शन योजना लागू आहे" असे विभागातर्फे लेखी कळविण्यात आले त्यामुळे त्यांना ही याचिका दाखल करावी लागली. **(सन २०२० ची याचिका क्रमांक LD-VC-CW No. 1045 of 2020)** याचिकेसोबत मा.उच्च न्यायालयाचा पहिला निर्णय व मा.सर्वोच्च न्यायालयाने तो निर्णय कायम केल्याचे सारे तपशील सोबत जोडले होते. उच्च शिक्षण विभागातील अधिकारी हे हेतुपुरस्सर ही गोष्ट करीत आहेत, हे मा.उच्च न्यायालयाच्या लक्षात आले व त्यांनी उच्च शिक्षण सचिव व संचालक यांनाच टांगणीला लावले. स्वतः काही निर्णय न देता **"हा वाद विषय संपुष्टात आला आहे असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. तुम्ही दोघेही तुमचे डोके चालवा (apply your mind) व त्याबाबत आठ दिवसात शपथपत्र दाखल करा"** असे **आदेश पारित केले. "न्यायालयाच्या पूर्व निर्णयाच्या विरोधात तुम्ही काही निर्णय घेतल्यास त्याची भारी किंमत तुम्हाला मोजावी लागेल"** असेही आपल्या आदेशात **मा.खंडपीठाने नमूद केले.** दिनांक ३१ ऑगस्ट २०२० रोजी न्यायालयाने पारित केलेल्या आदेशातील हा भाग शब्दशः पुढीलप्रमाणे :-

**"According to the petitioner, the controversy is covered by the decision of the Division Bench of this Court rendered on 03/10/2018 in Writ Petition No.13166/2017 against which S.L.P. No.14703/2019 was dismissed on 01/07/2019.**

**We direct respondent Nos.1 and 2 to apply their mind to find out whether the controversy is covered by the decision of this Court and pass an appropriate order** which shall be communicated to the petitioner **within a period of eight weeks from today. If we find that the decision is contrary to the judgment delivered by this Court, heavy cost shall have to be imposed."**

न्यायालयाने निर्णय घेण्यासाठी दिलेली मुदत संपत आलेली होती. **न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे "वादविषय संपुष्टात आलेला आहे किंवा नाही" याबाबत प्रधान सचिव, उच्च शिक्षण व संचालक उच्च शिक्षण यांना निर्णय घ्यायचा होता. त्यांनी निर्णय न घेता पळ काढला. आपले डोके चालवून नामी उपाय शोधून काढला. एकट्या याचिकाकर्त्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणारे शासनपत्र त्यांनी दिनांक १५ डिसेंबर २०२० रोजी निर्गमित केले व जुनी पेन्शन योजना लागू केली.**

**१०१.** दुसऱ्या एका प्रकरणात याचिकाकर्त्यांना "जुनी पेन्शन योजना लागू होत नाही" असे सहसंचालकांनी लेखी कळविले. त्यामुळे ही याचिका सादर

करावी लागली. **(सन २०२० ची याचिका क्रमांक ST. No.9649)** दिनांक १२ ऑक्टोबर २०२० रोजी ही याचिका सुनावणीला आली तेव्हा त्याच त्या विषयावर लोकांना पुन्हा पुन्हा याचिका दाखल करायला उच्च शिक्षण विभाग भाग पाडत आहे, ही गोष्ट मा.उच्च न्यायालयाच्या लक्षात आल्यामुळे मा.उच्च न्यायालयाने असे आदेश पारित केले की, **"प्रधान सचिव, उच्च शिक्षण व संचालक, उच्च शिक्षण यांनी दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ रोजी W.P. 13166 of 2017 या प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय विचारात घ्यावा. त्याचबरोबर विशेष अनुमती याचिका क्रमांक (सी.ए.) १३०९/२०२० या प्रकरणामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णयसुद्धा विचारात घ्यावा. हे** दोनही निर्णय विचारात घेऊन उच्च शिक्षण विभागाने घेतलेला अंतिम निर्णय **नमूद असलेले शपथपत्र मा.उच्च न्यायालयात सादर करावे."**

आदेशपत्रातील हा भाग शब्दशः पुढीलप्रमाणे :- "In the meantime, we direct respondent nos.1 and 2 to consider the decision of this Court delivered in Writ Petition No.13166/2017 on 3/10/2018 and decision of the Apex Court in Special Leave Petition (Civil) No.1309/2020 and **take a final decision in the matter and file an affidavit to that effect before this Court. If we find that the decision to be taken by the respondent nos. 1 and 2 runs contrary to the decision of the Apex Court and this Court, heavy costs will be imposed."**

**प्रधान सचिव उच्च शिक्षण व संचालक उच्च शिक्षण हे क्रमांक एक व दोनचे प्रतिवादी होते. उच्च न्यायालयाने धोरणात्मक निर्णय लक्षात आणून दिला व अंतिम निर्णय घेण्याचे आदेश दिले असतांना विभागाने एकट्या याचिकाकर्त्या पुरतेच प्रकरण मंजूर केले व याचिकाकर्त्याला जुनी पेन्शन योजना लागू केली व धोरणात्मक अंतिम निर्णय न घेता पळ काढला.**

**१०२. या प्रकरणी तीन विशेष अनुमती याचिका मा.सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या असतांना ही बाब सर्वोच्च न्यायालयात 'पेंडींग' आहे अशी सरळ सरळ असत्य माहिती मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर सहसंचालकांनी ठेवणे, त्या आधारावर तेथे प्रकरण पेंडींग पाडण्यात तात्पुरते यश मिळविणे, हा अव्वल दर्जाचा लुच्चेपणा तर आहेच पण मिळालेल्या या तात्पुरत्या यशाचा झेंडा हाती घेऊन इतर खंडपीठासमोर प्रकरण तात्पुरते पेंडींग पाडण्यात यश मिळविणे, हा उच्च शिक्षण विभागाचे नेतृत्त्व करणाऱ्या या अधिकाऱ्यांच्या लुच्चेपणाचा कडेलोट म्हणून सांगता येईल.** तपशील पुढीलप्रमाणे :-

मा.नागपूर खंडपीठापुढे असलेल्या W.P.No. 4289 of 2019 मध्ये अधिकाऱ्यांनी पुरविलेल्या माहितीच्या आधारावर सरकारी वकिलांनी मा. खंडपीठाला अशी माहिती दिली की, आजच्या याचिकेमध्ये असलेला विषय सर्वोच्च न्यायालयासमोर असलेल्या याचिकेसारखा असल्यामुळे त्याबाबतीत सर्वोच्च न्यायालयात काय निर्णय होतो? याची वाट पाहणे योग्य ठरेल. त्यामुळे मा.खंडपीठाने स्वाभाविकपणे दिनांक २३ ऑक्टोबर २०२० रोजी या प्रकरणी पुढीलप्रमाणे आदेश दिला :- "Liberty to move after the decision is rendered by the Hon'ble Supreme Court in the case of Asha Bidkar and others."

**१०३. एका सहसंचालकांनी मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या आदेशावर 'स्थगन आदेश' पारित करण्याचा अभूतपूर्व व लांच्छनास्पद प्रकार यातुनच पहायला मिळाला.** मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक ९ फेब्रुवारी २०२१ रोजी याचिका क्रमांक २७१९/२०२० या प्रकरणात आदेश पारित करून चाळीसगाव येथील एका नेट-सेट मुक्त शिक्षकाला जुनी पेन्शन योजना लागू करण्याचे आदेशित केले असताना जळगावच्या सहसंचालकांनी दिनांक १२ मे २०२१ रोजी एक आदेश पारित करून मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास स्पष्टपणे नकार दिला. **परंतु "पेन्शन योजना लागू करा" असा स्पष्ट आदेश मा. उच्च न्यायालयाने दिलेला असतांना न्यायालयाचा आदेश आपल्या आदेशपत्रात उधृत करून "याचिकाकर्त्याला पेन्शन योजना लागू करता येणार नाही" असा आदेश सहसंचालकांनी पारित केला.** मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात निर्णय देण्याचा अधिकार फक्त मा. सर्वोच्च न्यायालयाला आहे. **जळगावच्या सहसंचालकांनी स्वतःला सर्वोच्च न्यायालय समजून काढलेल्या १२ मे २०२१ च्या आदेशाची जेवढी निर्भर्त्सना करावी तेवढी थोडीच आहे.** पुढे या सहसंचालकांनी दिनांक ५ जुलै २०२१ रोजी उच्च शिक्षण संचालकांना पत्र लिहून तुमच्या दिनांक १६.०२.२०२१ च्या पत्रानुसार मी उपरोक्त कारवाई केली असे त्यांना कळविले. दिनांक २१ जून २०२१ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे सरकार्यवाह श्री.एस.पी.लवांडे यांनी औरंगाबाद येथे पत्रकार परिषद घेऊन या सहसंचालकांच्या बडतर्फीची मागणी केली तेव्हा त्यांना तेथून हलविण्यात आले. अवमान याचिका झाली व पेन्शन केस मार्गी लागली.

**१०४.** अनेक प्रकरणांमध्ये मा.उच्च न्यायालयाच्या अनेक खंडपीठांनी निर्णय दिले. मा.सर्वोच्च न्यायालयाने त्या निर्णयावर शिक्कामोर्तब केले पण उच्च शिक्षण विभाग काहीच कृती करीत नाही असे दिसून आल्यावर महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने दिनांक २३ सप्टेंबर २०२१ रोजीच्या बैठकीत आंदोलनाचा ठराव (217/21) संमत केला. ठरावानुसार आंदोलन दिनांक ४ ऑक्टोबर २०२१ रोजी प्रत्यक्ष सुरू झाले. या ठरावानुसार दिनांक ३० नोव्हेंबर २०२१ पासून तीव्र आंदोलन सुरू करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला होता. तेव्हा कुठे दिनांक २९ ऑक्टोबर २०२१ रोजी **"दि. २३.१०.१९९२ ते दि. ०३.०४.२००० या कालावधीत नियुक्त बिगर नेट/सेट अध्यापकांना सेवानिवृत्तीवेतनाचे लाभ अनुज्ञेय करण्याबाबत"** या मथळ्याचा शासननिर्णय (288/21) निर्गमित करण्यात आला. या शासननिर्णयामध्ये परिच्छेद२ पुढीलप्रमाणे आहे. :-

"२. शासन निर्णय दि. १८.१०.२००१ व दि. २७.०६.२०१३ नुसार दि. २३.१०.१९९२ ते दि. ०३.०४.२००० या कालावधीत नियुक्त बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत सुरू ठेवण्यात आलेल्या असल्याने अशा अध्यापकांना **त्यांच्या मूळ नियुक्तीचा दिनांक ग्राह्य धरून तत्कालीन प्रचलित धोरणानुसार सेवानिवृत्ती वेतन देय राहील."**

**१०५.** नेट-सेट मुक्त शिक्षकांना नेमणुकीच्या दिनांकापासून सेवा धरून जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा शासननिर्णय निर्गमित झालेला आहे. मग हा विषय पुन्हा आंदोलनाच्या ठरावामध्ये का घेण्यात येत आहे? असा प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण होईल. त्याचेसुद्धा उत्तर देणे या महासंघाला आवश्यक वाटते. "पडले वळण इंद्रिया सकळा, भाव तो निराळा दाखविना" हा अभंग संतांनी कोणाला समोर ठेवून लिहिला असेल हे सांगता येत नाही. मात्र सहसंचालक या वर्गाला तो अभंग चपखलपणे लागू पडतो. कारण दिनांक २९ ऑक्टोबर २०२१ चा शासननिर्णय निर्गमित झाल्यानंतरसुद्धा एका सहसंचालकांनी २९ वर्षांची सेवा झालेल्या एका नेट-सेट मुक्त शिक्षकाची पेन्शन केस दिनांक ८ फेब्रुवारी २०२२ च्या पत्रान्वये फेटाळून लावली.

**१०६.** पेन्शन प्रकरण फेटाळून लावतांना सहसंचालकांनी कारणे काय दिलीत? इतर पारंपारिक कारणांबरोबर सदरहू शिक्षकाची सुरुवातीला सेवा विनाअनुदानित महाविद्यालयातील आहे त्यामुळे ती ग्राह्य धरता येत नाही. असे एक जास्तीचे कारण जोडले होते. खरे म्हणजे "Counting of Previous Service for the purpose of placement in Senior Scale/Selection Grade" या मथळ्याचा शासननिर्णय उच्च शिक्षण विभागाने दिनांक ११ फेब्रुवारी १९९४ रोजी निर्गमित केलेला असून तो आजही कायम आहे. शासननिर्णय असो किंवा नसो, विनाअनुदानित काळातील सेवा व अनुदानित काळातील सेवा असा भेदभाव करता येणार नाही. विनाअनुदान काळातील सेवा धरावीच लागेल असे उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे अनेक निर्णय आहेत. ते निर्णय सहसंचालकांना ठाऊक नाहीत ही गोष्ट एकदा क्षम्य असू शकते. पण आपल्याच शासनाने काढलेला शासननिर्णय आपल्याच सहसंचालकांना ठाऊक असू नये हे क्षम्य असू शकत नाही. अशा सहसंचालकांना मंत्रालयात मध्यम आकाराचे कोनाडे बांधून त्यात दर्शनासाठी ठेवल्यास शासनाने त्यांच्या क्षमतेचा उचित वापर केला असे होईल.

**१०७.** शेवटी सदरहू शिक्षकाला उच्च न्यायालयात याचिका दाखल करावी लागली. मुंबई येथे उच्च न्यायालयात दाखल झालेली ही सन २०२२ ची याचिका क्रमांक ५३५७ होय. दिनांक २९ मार्च २०२३ रोजी मा.उच्च

***केंद्रशासनाच्या दिनांक २ नोव्हेंबर २०१७ व ८ नोव्हेंबर २०१७ या तारखांच्या दोन पत्रांमधील तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १८ जुलै २०१८ च्या रेग्युलेशन्समधील अटी व शर्ती यांचे पूर्णपणे पालन केल्या जाईल, या अटीवरच हे अनुदान देण्यात येत आहे, असा एक स्वतंत्र परिच्छेद केंद्राच्या अधिसूचनेमध्ये आहे.***

*( परिच्छेद १८ पहा )*

न्यायालयाने या प्रकरणी याचिकाकर्त्याच्या बाजूने निर्णय दिला. त्याच त्याच गोष्टी सांगून आम्ही शिक्षक कंटाळून जातो तरी सहसंचालक त्याच त्याच चुका करतात तेव्हा शिक्षकांच्या मनात काय भावना निर्माण होत असतील त्यापेक्षा तीव्र भावना मा.खंडपीठाने याबाबतीत नोंदविल्या आहेत. परिच्छेद १७ पुढीलप्रमाणे:-

**"17. Finally, we are constrained to note our great dismay, even displeasure, at the manner in which the State Government persists in raking up the same defence again and again. We do not know how many times this Court has to pronounce the law.** The aforesaid extracts show that **this Court had laid down the law, and the pronouncement was not limited to the facts of any particular case. Yet, the government persists in the belief that the law declared by this court is somehow not binding on it, or that every judgment, no matter what the wording and even if it clearly lays down the law is confined to that particular petition. We are letting it pass this once, but if this is repeated we may well be moved to far sterner action."**

**१०८.** "राज्यशासनातर्फे तेच तेच युक्तिवाद पुन्हा पुन्हा रेटल्या जात आहेत हे पाहून आम्ही चकित झालो आहोत हे नमूद करणे आम्हाला भाग पडत आहे. त्याबद्दलची नाराजी आम्ही नमूद करीत आहोत. कायद्याचा अर्थ सांगण्याचे काम या न्यायालयाने किती वेळा करायचे हेच आम्हाला कळत नाही. वर जे आम्ही उधृत केले आहे त्यावरून हे निश्चित होते की, **या न्यायालयाने कायद्याचा अंतिम शब्द निश्चित करून दिलेला आहे व तो कोण्या एका प्रकरणापुरता नाही तर धोरणात्मक आहे.** तरीही कायद्याचा अंतिम शब्द आपल्यावर बंधनकारक नाही असा हेका शासन धरीत असून शब्दरचना काहीही असली तरी व जरी आम्ही कायद्याचा सर्वदूर लागू होणारा अर्थ स्पष्ट केला असला तरी त्या प्रकरणापुरती पूर्तता करण्यात शासन धन्यता मानत आहे. आजच्या प्रकरणापुरती आम्ही डोळेझाक करीत आहोत मात्र असा प्रकार पुन्हा घडल्यास हे न्यायालय कठोरतम (Sterner) कारवाई करेल." एवढ्या कठोर शब्दात न्यायालयाने आपल्या भावना व्यक्त केलेल्या असल्यामुळे यापुढे असा प्रकार होणार नाही याबाबत सक्त सूचना देण्यात याव्यात अशी मागणी करण्यात येत आहे. त्याबरोबर या प्रकरणी उच्च न्यायालयाचा पहिला धोरणात्मक निर्णय सर्वोच्च न्यायालयात कन्फर्म झाल्यानंतरसुद्धा विपरित कृती होण्यास कोण अधिकारी जबाबदार आहेत याची चौकशी करण्यात यावी व त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी व या साऱ्याच प्रकरणी शासनाला विनाकारण जो आर्थिक भार सोसावा लागला तो संबंधित अधिकाऱ्यांकडून व्यक्तीशः वसूल करण्यात यावा अशी या महासंघाची मागणी आहे.

**१०९.** विधिवतरित्या अनुज्ञेय असलेले लाभ शिक्षकांना किंवा कर्मचाऱ्यांना लागू करतांना उच्च शिक्षण विभागातील काही अधिकारी आम्ही म्हणू त्याला देऊ, पूजाअर्चा बरोबर केली नाही तर आम्ही ते लाभ देणार नाही, उच्च न्यायालयातून जरी अनेकांनी न्याय मिळविला तरी त्यातील काहींना आम्ही देऊ, पण इतर काहींच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयात पूनर्विलोकन याचिका दाखल करून 'पूजाअर्चा' करण्यासाठी अशा अर्जदाराला जेरीस आणू, अधिकाऱ्यांची ही वृत्ती स्पष्ट करणारी डझनावारी प्रकरणे दाखवून देता येतील. विधिवतरित्या अदेय असलेले लाभसुद्धा मंत्रिमंडळाची मान्यता नसली तरी, वित्त विभागाची मान्यता नसली तरी, आम्ही वाटेल त्या अधिकाऱ्याला व कर्मचाऱ्याला देऊ शकतो, **ही उच्च शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांची मुजोरी वृत्ती बक्षी समितीच्या अहवालामुळे ठसठशीतपणे जगाच्या समोर आली. सहाव्या वेतन आयोगाने मंजूर केलेल्या वेतनश्रेण्यांपेक्षा कितीतरी मोठ्या प्रमाणात अतिप्रदान करण्याची बहादुरी उच्च शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांनी दाखविलेली होती.** याबाबतीत बक्षी समितीच्या अहवालामध्ये समाविष्ट असलेला परिच्छेद ४.६.३ जसाच्या तसा पुढीलप्रमाणे आहे :-

"(४.६.३) **उच्च व तंत्र शिक्षण विभाग (अकृषी विद्यापीठे)** : सर्व विद्यापीठांत शिक्षकेतर पदांच्या ६ व्या वेतन आयोगानुसार मंजूर केलेल्या वेतनश्रेण्यांची तपासणी करून संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांकडून **झालेले अतिप्रदान वसूल करण्याची शिफारस करण्यात येत आहे.** तसेच योग्य त्या कार्यपद्धतीचा अवलंब न करता निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील ज्या पदनामांमध्ये व वेतनश्रेण्यांमध्ये नियमबाह्य बदल केल्यामुळे शासनाचे नुकसान झालेले आहे, अशी सर्व पदनामे व त्या पदांना मंजूर केलेल्या वेतनश्रेण्या ७ **व्या वेतन आयोगानुसार सुधारित करण्यापूर्वीच दिनांक ७.१०.२००९ च्या शासन अधिसूचनेनुसार कटाक्षाने पूर्ववत करण्याची कार्यवाही उच्च व तंत्र शिक्षण विभागाने तातडीने करावी, तसेच अशा अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर त्वरीत शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस समिती करीत आहे.**"

जबाबदार अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा शासननिर्णय या घटनाक्रमातून पुढे निर्गमित झाला. कायद्याने देणे लागत असलेल्या गोष्टी आमची पूजाअर्चा केल्याशिवाय आम्ही देणार नाही आणि आमची पूजाअर्चा केली तर कायद्यात बसो अथवा न बसो आम्ही काय वाटेल ते देऊ, **या वृत्तीचा पुरस्कार करणारा एक व एकमेव विभाग म्हणून उच्च शिक्षण विभागाचा उल्लेख करता येईल.** बक्षी समितीच्या अहवालामध्ये अशा प्रकारची शिफारस दुसऱ्या कोणत्याही विभागाबाबत करण्यात आलेली नाही, ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे.

**११०.** घाऊक भ्रष्टाचाराच्या जागा कमी पडतात म्हणूनच की काय किरकोळ भ्रष्टाचाराचे मुबलक प्रकार नमूद करता येतील. स्थलाभावी त्यातील काही नमूने पुढीलप्रमाणे :-

**(i)** भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाच्या कोल्हापूर विभागाचे पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबधंक विभाग कोल्हापूर यांनी दिनांक ५ जुलै २०२३ रोजी एक Trap Case Report वृत्तपत्रांकडे प्रसिद्धीसाठी दिला. त्यामध्ये "कोल्हापूरच्या उच्च शिक्षण सहसंचालकांना पाहिजे तसा अहवाल देण्यासाठी ३०,००० रुपयांची लाच घेतांना रंगेहात पकडले" असे नमूद आहे.

**(ii)** भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाच्या अमरावती विभागाचे पोलीस उपअधिक्षक लाचलुचपत प्रतिबधंक विभाग अमरावती यांनी दिनांक ३० जून २०२२ रोजी एक Trap Case Report वृत्तपत्रांकडे प्रसिद्धीसाठी दिला. त्यामध्ये "तक्रारदार यांची मुलाखत झाल्यानंतर त्यांचे 'सहयोगी प्राध्यापक' या पदासाठी वेतननिश्चिती, सर्विस बुकवर नोंद व 'सहयोगी प्राध्यापक' या पदासाठीचा प्रस्ताव मंजूर करण्यासाठी ३०,०००/- रुपयांची लाच घेतांना रंगेहात पकडले" असे नमूद आहे.

**(iii)** "विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद या पदाचा अतिरिक्त कार्यभार तात्पुरत्या स्वरूपात सोपविण्याबाबत" या मथळ्याचा एक शासन आदेश (क्र. संकीर्ण २०२२/प्र.क्र.१३६/मशि-१) महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दिनांक १ जुलै २०२२ रोजी काढला असून "संदर्भाधिन शासन आदेशान्वये, विभागीय सहसंचालक, महाराष्ट्र शिक्षण सेवा, गट-अ या संवर्गातील पदावर डॉ.रणजितसिंह निंबाळकर, प्राध्यापक, शासकीय न्यायसहाय्यक विज्ञान संस्था, औरंगाबाद **यांच्याकडे विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद येथील अतिरिक्त कार्यभार तात्पुरत्या स्वरूपात सोपविण्यात आला होता.**

**तथापि, सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद या कार्यालयातील कामकाजाची व कागदपत्रांची तपासणी केली असता, तपासणीमध्ये गंभीर स्वरूपाच्या प्रशासकीय व वित्तीय अनियमितता आढळून आल्याने त्यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे.** प्रशासकीय व वित्तीय अनियमितता टाळण्यासाठी ह्या प्रकरणाची चौकशी होईपर्यंत, डॉ.रणजितसिंह निंबाळकर यांचेकडील विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद या पदाचा अतिरिक्त कार्यभार काढण्यात येत असून, डॉ.सतिश देशपांडे, प्राध्यापक, शासकीय विज्ञान संस्था, औरंगाबाद यांच्याकडे पुढील आदेश होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात येत आहे." ज्यांच्याकडे कार्यभार सोपविला त्या सहसंचालकांनी मा.औरंगाबाद खंडपीठाच्या आदेशाला जळगावचे सहसंचालक या नात्याने स्थगनादेश दिला होता. "लक्ष्मीदर्शनाची सुविधा" निरंतर सुरू रहावी म्हणून या सहसंचालकाकडे "कार्यभार तात्पुरत्या स्वरुपातच ठेवण्याची सुविधा" निरंतर सुरू ठेवणे आवश्यक झालेले आहे.

***मा.उच्च न्यायालयासमोर सरकारी वकिल जेव्हा एखाद्या निर्णयाशी सहमत होतात तेव्हा त्यावर अपील करण्याची स्थिती हातून निघून गेलेली असते ही कायद्याची सर्वमान्य स्थिती आहे.* (settled legal position of law)**

*( परिच्छेद ४२ पहा )*

## (६)
## जुन्या पेन्शन योजनेचा प्रश्न

**१११.** जुन्या पेन्शन योजनेच्या प्रश्नाबाबत कर्मचारी व शिक्षक यांच्यामध्ये निर्माण झालेल्या अस्वस्थतेच्या पार्श्वभूमीवर मा.सर्वोच्च न्यायालयाचा एक महत्त्वपूर्ण निर्णय शासनाच्या लक्षात आणून देणे या महासंघाला आवश्यक वाटते. मा.सर्वोच्च न्यायालयाने (AIR 1983 Supreme Court 130) दिनांक १७ डिसेंबर १९८२ रोजी १९८० च्या याचिका क्रमांक ५९३९-४१ (डी.एस.नकारा व इतर विरुद्ध केंद्रशासन) या प्रकरणामध्ये दिलेल्या निर्णयातील पहिला परिच्छेद शब्दशः पुढीलप्रमाणे आहे.:-

"With a slight variation to suit the context Wolsey's prayer : "had I served my God as reverently as I did my king, I would not have fallen on these days of penury"; is chanted by petitioners in this group of petitions in the Shellian tune : "I fall on the thorns of life I bleed." Old age, ebbing mental and physical prowess, atrophy of both muscle and brain powers permeating these petitions, the petitioners in the fall of life yearn for equality of treatment which is being meted out to those who are soon going to join and swell their own ranks,"

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातील हा पहिला परिच्छेद ढोबळमानाने पुढीलप्रमाणे सांगता येईल. "जेवढ्या भक्तीभावाने मी माझ्या राजाची (शासनाची) सेवा केली तेवढ्याच भक्तीभावाने मी ईश्वराची सेवा केली असती तर दुर्दैवाचे हे दशावतार पाहण्याची पाळी माझ्यावर आली नसती. असा जप करण्याची पाळी या याचिकाकर्त्यांवर आलेली आहे. आयुष्याच्या उत्तरार्धामध्ये रक्तस्त्राव होत मी काट्याकुट्यावर पडलेला आहे. वयोमानपरत्वे आलेले म्हातारपण, बौद्धिक व शारीरिक क्षमतेमध्ये झालेली घसरण, शरीराचे स्नायू आणि बुद्धी यांना उचित आहाराअभावी लागलेली ओहोटी, अशा स्थितीत हे याचिकाकर्ते न्यायालयासमोर आलेले आहेत. यांचे म्हणणे काय आहे? तर आम्ही अनेक वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त झालेले आहोत तेव्हा आम्हाला आमच्यापेक्षा सेवेत कनिष्ठ असलेल्या व नव्याने सेवेत आलेल्या व येत असलेल्या आमच्या व्यावसायिक बंधुपेक्षा कमी प्रतीची वागणूक दिली जाता कामा नये." मा. सर्वोच्च न्यायालयाने या निवाड्यात याचिकाकर्त्यांच्या बाजूने निर्णय दिला. आज आता २००५ पूर्वीच्या कर्मचाऱ्यांपेक्षा वेगळी वागणूक २००५ नंतरच्या कर्मचाऱ्यांना देण्याचा प्रश्न आहे.

**११२.** सर्वोच्च न्यायालयाने उपरोक्त निर्णयाच्या परिच्छेद १९ मध्ये काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. ते पुढीलप्रमाणेः-

"19. **What is a pension? What are the goals of pension? What public interest or purpose,** if any, it seeks to serve? If it does seek to serve some public purpose, is it thwarted by such artificial division of retirement pre and post a certain date? We need seek answer to these and incidental questions so as to render just justice between parties to this petition."

मा. सर्वोच्च न्यायालयाने या प्रश्नांची उत्तरे स्वतःच दिली असून ती त्या निर्णयाच्या परिच्छेद २० मध्ये नमूद आहे. तो परिच्छेद पुढीलप्रमाणे :-

"20. **The antiquated notion of pension being a bounty, a gratituous payment depending upon the sweet will or grace of the employer not claimable as a right and, therefore, no right to pension can be enforced through Court has been swept under the carpet by the decision of the Constitution Bench** in Deoki Nandan Prasad v. State of Bihar, 1971 (Supp) SCR 634 : (AIR 1971 SC 1409) wherein this Court authoritatively ruled that pension is a right and the payment of it does not depend upon the discretion of the Government but is governed by the rules and a Government servant coming within those rules is entitled to claim pension. **It was further held that the grant of pension does not depend upon any one's discretion.** It is only for the purpose of quantifying the amount having regard to service and other allied matters that it may be necessary for the authority to pass an order to that effect but the right to receive pension flows to the officer not because of any such order but by virtue of the rules. This view was reaffirmed in State of Punjab & Anr. v. Iqbal Singh, (1976) 3 SCR 360 : (AIR 1976 SC 667)."

**११३.** जुन्या पेन्शन योजनेचा प्रश्न हा फक्त विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचा प्रश्न नाही हे स्पष्टपणे आम्ही नमूद करीत आहोत. पण त्याचबरोबर हेही नमूद करणे आवश्यक आहे की, नव्या पेन्शन योजनेमुळे अस्वस्थ झालेल्या शासकीय कर्मचारी व शिक्षकांच्या फार मोठ्या वर्गाने जुन्या पेन्शन योजनेसाठी जो संघर्ष सुरू केलेला आहे त्या संघर्षाचा हा महासंघ एक अविभाज्य भाग आहे व ज्या विविध संघटना या कामासाठी संघर्ष करीत आहेत त्यामध्ये हा महासंघ समाविष्ट आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निर्णयामुळे या प्रश्नाच्या बाबतीत सतत न्यायालयीन संघर्ष होत राहणार, असे दिसून येते.

**११४.** आतापोवेतो अनेक बाबतीत मा.न्यायालयाच्या निर्णयामुळे जुन्या पेन्शन योजनेच्या जोखडातून अनेक वर्ग बाहेर पडलेले आहेत. पडत आहेत.

**(i) न्यायिक अधिकाऱ्यांना जुनीच पेन्शन योजना लागू राहील :** मुंबई उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने दिलेल्या एका निर्णयामुळे महाराष्ट्रातील सर्व स्तरावरच्या न्यायदानाचे काम करणाऱ्या न्यायिक अधिकाऱ्यांच्या बाबतीत नवी पेन्शन योजना रद्दबातल ठरविण्यात आलेली आहे. या सर्व न्यायिक अधिकाऱ्यांना जुनीच पेन्शन योजना लागू राहील असा तपशीलवार निर्णय उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठाने दिनांक १७ ऑगस्ट २०१७ रोजी सन २०१५ च्या याचिका क्रमांक १८८ मध्ये दिलेला आहे.

**(ii)** "The phraseology "Recruitment" and "Appointment" are not synonymous. There is a marked distinction between "Recruitment" and "Appointment". Recruitment is a stage prior to appointment. Recruitment is the process which entails selection of candidates. Selection is a process of picking the candidates from the short listed candidates. An appointment means an actual act of posting a person to a particular office." अशा प्रकारचा स्पष्ट निर्णय मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक २८ एप्रिल २०२३ रोजी Writ Petition No. 2270 of 2021 या प्रकरणात दिल्यामुळे ज्यांच्या बाबतीत भरतीप्रक्रिया १ नोव्हेंबर २००५ पूर्वी सुरू झाली होती व प्रत्यक्ष नेमणूक त्या तारखेला किंवा त्यानंतर झाली अशा सर्व व्यक्तींना जुनी पेन्शन योजना लागू राहील असा निर्णय शासनाला घ्यावा लागला.

***"हा वाद विषय संपुष्टात आला आहे असे याचिकाकर्त्यांचे म्हणणे आहे. तुम्ही दोघेही तुमचे डोके चालवा (apply your mind) व त्याबाबत आठ दिवसात शपथपत्र दाखल करा" असे आदेश पारित केले. ..... न्यायालयाच्या पूर्व निर्णयाच्या विरोधात तुम्ही काही निर्णय घेतल्यास त्याची भारी किंमत तुम्हाला मोजावी लागेल" असेही आपल्या आदेशात मा.खंडपीठाने नमूद केले.***

***न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे "वादविषय संपुष्टात आलेला आहे किंवा नाही" याबाबत प्रधान सचिव, उच्च शिक्षण व संचालक उच्च शिक्षण यांना निर्णय घ्यायचा होता. त्यांनी निर्णय न घेता पळ काढला व फक्त याचिकाकर्त्यांपुरती अंमलबजावणी केली.***

*( परिच्छेद १०० पहा )*

**(iii)** सशस्त्र कामगिरी करणाऱ्या संरक्षण दलांना जुनी पेन्शन योजना लागू आहे मग गृह विभागाच्या अंतर्गत काम करणाऱ्या सशस्त्र पोलीस दलातील शिपायांना का लागू असू नये? असा प्रश्न भेदभावाचा प्रश्न म्हणून न्यायव्यवस्थेसमोर मांडल्या गेला व न्यायालयाने याचिकाकर्त्यांच्या बाजूने निर्णय दिला.

**(iv)** पुरेसा विचार न करता नवीन पेन्शन योजना अस्तित्वात आल्यामुळे न्यायालयाच्या एक एका निर्णयामुळे ती विकलांग होत जाईल असे स्पष्टपणे दिसून येत आहे. ग्रॅच्युईटीच्या बाबतीत नवीन पेन्शन योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युईटी द्यावीच लागेल अशा प्रकारचा निर्णय न्यायालयाने दिला आहे.

**११५.** मा.सर्वोच्च न्यायालयाने नकारा प्रकरणात दिलेल्या उपरोक्त निर्णयाच्या आधारे सर्वोच्च न्यायालयासमोर हे प्रकरण न्यावे असे काहींचे मत असून धोरणात्मक निर्णय (मग तो कितीही वाईट असला तरी) घेण्याचा शासनाला अधिकारच आहे, त्यामुळे न्यायालयात हा प्रश्न टिकणार नाही असे काही कायदेतज्ज्ञांचे मत आहे. जसजसे दिवस जातील तसतसा हा आक्रोश वाढत जाईल. त्यातुन पुढे हा प्रश्न कर्मचारी व शिक्षकांच्या संघटनातर्फे जनतेच्या न्यायालयात जाईल व तेथे तो निश्चित सुटेल अशी भावना प्रबळ होत आहे. काही राज्यात तो प्रश्न या मार्गाने सुटलेला आहे ही मोठीच समाधानाची बाब आहे आणि त्यामुळेच या कामी रस्त्यावरच्या संघर्षाशिवाय हा प्रश्न सुटणार नाही अशी भावना फार मोठ्या प्रमाणात वाढीस लागलेली आहे. एका बाजूला होणारा सततचा न्यायालयीन संघर्ष व दुसऱ्या बाजूला सततची आंदोलने यामुळे निर्माण होणारी अस्थिरता यातून बाहेर पडण्याचा एक मार्ग म्हणून राज्यशासनाने जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय गेल्या आंदोलनाच्या वेळी जाहीर केलेला आहे. पण जाहीर केलेल्या या निर्णयामध्ये बराच मोघमपणा आहे असे सर्वच संघटनांचे म्हणणे आहे.

**११६.** हा मोघमपणा संपुष्टात आणत असतांना एक बाब शासनाच्या लक्षात आणून देणे या महासंघाला महत्त्वाचे वाटते. जगातील अनेक देशांच्या निवृत्तिवेतन व्यवस्थांचा आढावा घेतला तर ढोबळमानाने या व्यवस्था तीन प्रकारांमध्ये मोडतात.

**(i) DB Plan : Defined Benefit Plan :** In a DB plan, benefits are defined in advance based on the employee's final or average salary and those benefits are guaranteed by the government as the sponsor.

**(ii) DC Plan : Defined Contribution Plan :** In contrast, DC plans do not have a guarantee component. The pension benefits depend upon the market performance of the pension fund and the government's cost is limited to a prespecified rate of contribution.

**(iii) Hybrid Pension Arrangements :** मिश्र निवृत्तिवेतन योजनेमध्ये (Hybrid Pension Arrangements) DB plan व DC plan यांचे मिश्रण करून निवृत्तिवेतन योजनेची बांधणी केली जाते. ज्या देशामध्ये कर्मचारी संघटना प्रभावीपणे आपले म्हणणे मांडू शकल्या नाहीत व निवृत्तिवेतनाच्या निश्चित रकमेची अजिबात हमी न देणे हे शासनालासुद्धा लाजिरवाणे वाटले किंवा वाटत असते अशा वेळी किमान काही तरी तुटके फुटके निवृत्तिवेतन निश्चित मिळू शकेल व बाकी सारा भाग गुंतवणुकीच्या परताव्यावर अवलंबून असेल अशाप्रकारची व्यवस्था या मिश्र निवृत्तिवेतन योजनेमध्ये समाविष्ट असते. गुंतवणुकीच्या परताव्यावर शिग घालणे (Top-Up) ही जबाबदारी शासन घेते. हा तिसरा प्रकार सर्वात जास्त घातक आहे. कारण यामध्ये शिग घालण्याच्या प्रकारामुळे कर्मचारी राजी होतील असे गृहीत धरले जाते. शिगेचा प्रश्न महत्त्वाचा असतोच पण त्याहीपेक्षा महत्त्वाचा प्रश्न हा प्रमाणभूत कार्यावली प्रक्रियेचा (Standard Operating Procedure) असतो. सुस्थापित व सुव्याखित (well established and well defined) प्रक्रिया सोडून अनोळखी व जीचा अजून जन्मच झाला नाही अशी प्रक्रिया त्याज्य समजली जाते.

**११७.** याबाबतीत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार भारतीय संविधानातील तरतुदीप्रमाणे राज्यशासनालाच आहे. भारतीय संविधानाच्या कलम ३०९ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे :-

"309. Recruitment and conditions of service of persons serving the Union or a State. — Subject to the provisions of this Constitution, Acts of the appropriate Legislature may regulate the recruitment, and conditions of service of persons appointed, to public services and posts in connection with the affairs of the Union or of any State"

कर्मचारी संघटनांना आश्वासन दिल्याप्रमाणे जुनी पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय शासनाने निर्गमित करावा अशी या महासंघाची मागणी आहे.

**११८.** एक एका शिक्षकाला पत्राद्वारे ठोकळेबाज व असत्य भूमिका कळविणे, त्याला उच्च न्यायालयात जाण्यासाठी बाध्य करणे, उच्च न्यायालयाचा निर्णय झाल्यावरसुद्धा सर्वोच्च न्यायालयात जाण्यास भाग पाडणे, सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय झाल्यावरसुद्धा अवमान याचिका दाखल केल्याशिवाय आदेश न काढणे व पुन्हा दुसऱ्या शिक्षकाच्या बाबतीत तोच कार्यक्रम हाती घेणे, ही एक न संपणारी गोष्ट झालेली आहे. सचिव उच्च शिक्षण व संचालक उच्च शिक्षण या दोन ज्येष्ठ अधिकाऱ्यांनी उच्च शिक्षण विभागाचे छळछावणीमध्ये रूपांतर केले असून याला सामूहिक छळवणुकीचे स्वरूप आलेले आहे. **एक एकट्या शिक्षकाने हा छळ सहन करण्याची स्थिती संपुष्टात आली असून हा सामूहिक व सार्वत्रिक छळवाद सुरू असतांना महाराष्ट्र प्राध्यापक महासंघ केवळ प्रेक्षकाची भूमिका घेऊ शकत नाही. या अपप्रकाराला सामूहिकरित्या उत्तर देण्याचा भाग म्हणून निषेध आंदोलनाचा कार्यक्रम हाती घेण्यात येत आहे. या आंदोलन कार्यक्रमाचे स्वरूप पुढीलप्रमाणे राहील. :-**

**(१) लज्जास्पद वर्तनविरोधी निषेध आंदोलनाचे कागदपत्र सादर करणे :** मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांप्रती सचिव उच्च शिक्षण व संचालक उच्च शिक्षण यांच्या लज्जास्पद वर्तनाचा तीव्र निषेध करणारा महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा आजचा ११८ परिच्छेदांचा तपशीलवार ठराव सोमवार, दिनांक २९ जानेवारी, २०२४ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष मा.मंत्री, उच्च शिक्षण यांना संचालकांमार्फत सपत्र सादर करतील. त्याच दिवशी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे सरकार्यवाह उच्च शिक्षण सचिवांना ही कागदपत्रे सहसंचालक यांच्यामार्फत सपत्र सादर करतील व पोच घेतील.

**(२) लज्जास्पद वर्तनविरोधी निषेधार्थ पत्रकार परिषदांचे आयोजन :** दुसऱ्या दिवशी म्हणजे मंगळवार, दिनांक ३० जानेवारी, २०२४ रोजी त्या त्या ठिकाणी पत्रकार परिषदा घेऊन त्या त्या ठिकाणचे पदाधिकारी याबाबतची महासंघाची भूमिका तसेच सचिव उच्च शिक्षण व संचालक उच्च शिक्षण यांच्या न्यायालयाच्या प्रति लज्जास्पद वर्तणुकीचा हा सर्व तपशील कागदपत्रांसह जाहीर करण्याच्या

***प्रधान सचिव, उच्च शिक्षण व संचालक, उच्च शिक्षण यांनी दिनांक ३ ऑक्टोबर २०१८ रोजी* W.P. 13166 of 2017 *या प्रकरणात मा.उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय विचारात घ्यावा. त्याचबरोबर विशेष अनुमती याचिका क्रमांक (सी.ए.) १३०९/२०२० या प्रकरणामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णयसुद्धा विचारात घेऊन अंतिम निर्णय घ्यावा.***

**If we find that the decision to be taken by the respondent nos. 1 and 2 runs contrary to the decision of the Apex Court and this Court, heavy costs will be imposed.**

***उच्च न्यायालयाने धोरणात्मक निर्णय लक्षात आणून दिला व अंतिम निर्णय घेण्याचे आदेश दिले असतांना विभागाने एकट्या याचिकाकर्त्या पुरतेच प्रकरण मंजूर केले व याचिकाकर्त्याला जुनी पेन्शन योजना लागू केली व धोरणात्मक अंतिम निर्णय न घेता पळ काढला.*** *( परिच्छेद १०१ पहा )*

प्रयोजनार्थ पत्रकार परिषदांचे आयोजन करतील. या पत्रकार परिषदेतून मा.मंत्रीमहोदयांना सादर केलेल्या निषेधाच्या कागदपत्रांचे वाटप केल्या जाईल.

**(३) विशेषांकाचे प्रकाशन :** "मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांप्रती सचिव उच्च शिक्षण व संचालक उच्च शिक्षण यांच्या लज्जास्पद व निषेधार्ह वर्तनाचा तीव्र निषेध - विशेषांक प्रकाशन" : आपआपल्या घटक संघटनांच्या मुखपत्राचा विशेषांक दिनांक ५ फेब्रुवारी, २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी प्रकाशित करण्यात येईल. (१) महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचा ११८ परिच्छेदांचा हा ठराव व त्या त्या घटक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना योग्य वाटेल असा या प्रश्नांशी संबंधित इतर मजकूर हा या विशेषांकामध्ये प्रकाशित करण्यात येईल.

**(४) निषेधार्थ विद्यापीठस्तरीय व जिल्हास्तरीय अधिवेशनांचे आयोजन :** रविवार, दिनांक ४ फेब्रुवारी, २०२४ पासून तर रविवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२४ पर्यंतच्या काळामध्ये संघटनेच्या विद्यापीठस्तरीय व जिल्हास्तरीय अधिवेशनांचे आयोजन केल्या जाईल. या अधिवेशनातून या विशेषांकाचे वाटप केले जाईल व मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांप्रती सचिव उच्च शिक्षण व संचालक उच्च शिक्षण यांच्या अशोभनीय वर्तनाचा तीव्र निषेध करणारी महासंघाची भूमिका स्पष्ट करणारी पदाधिकाऱ्यांची भाषणे होतील. याच कालावधीमध्ये आपापल्या विभागातील मा.मंत्री व लोकप्रतिनिधी यांची वेळ निश्चित करून शिष्टमंडळासह भेट घेणे, विशेषांकांची प्रत त्यांच्या सुपूर्द करणे व आंदोलनाधीन प्रश्नांवर त्यांच्यांशी चर्चा करण्याचा कार्यक्रम राबविला जाईल.

**(५) काळ्या फिती लावून महाविद्यालयात काम करणे :** सोमवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ रोजी महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयीन व विद्यापीठीय शिक्षक आपआपल्या कार्यस्थळी काळ्या फिती लावून काम करतील.

**(६) ई-मेल संदेश आंदोलन :** एवढ्या उपर सचिव उच्च शिक्षण व संचालक उच्च शिक्षण यांनी मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आदर करण्याचे आदेश पारित केले नाही तर बुधवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२४ रोजी या उभय अधिकाऱ्यांचा निषेध करणारे ई-मेल संदेश राज्यभरातून त्यांना पाठविले जातील.

**(७) सहसंचालक उच्च शिक्षण यांच्या कार्यालयावर धरणे/मोर्चा :** सोमवार, दिनांक ४ मार्च, २०२४ रोजी दुपारी ४ वाजता आपआपल्या विभागातील सर्व शिक्षक सहसंचालक उच्च शिक्षण यांच्या कार्यालयावर धरणे/मोर्चा यामध्ये सहभागी होतील. त्या त्या विभागातील संघटनेचे पदाधिकारी शिष्टमंडळासह सहसंचालक उच्च शिक्षण यांना आंदोलनाविषयी निवेदन सादर करतील.

**(८) मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री यांना निवेदने :** यानंतरही त्यांच्या वर्तनात दुरुस्ती न झाल्यास राज्याच्या मा.मुख्यमंत्र्यांना व मा.उपमुख्यमंत्र्यांना बुधवार, दिनांक ६ मार्च, २०२४ रोजी निवेदनाद्वारे ही सर्व कागदपत्रे सादर करून या दोन ज्येष्ठ अधिकाऱ्यांच्या मनमानी वर्तनाला पायबंद घालण्यासाठी यथोचित आदेश पारित करण्याविषयी पत्र आंदोलनाद्वारे विनंती करण्यात येईल.

**(९) मा.राज्यपाल यांना निवेदन :** सोमवार, दिनांक ११ मार्च, २०२४ रोजी मा.राज्यपाल यांना महासंघाचे अध्यक्ष निवेदनाद्वारे सर्व कागदपत्रे सादर करतील व त्यांना प्रत्यक्ष भेटीची वेळ मागण्यात येईल.

**(१०)** शुक्रवार, दिनांक २२ मार्च, २०२४ रोजी **(i)** रेग्युलेशनची मोडतोड केल्याबद्दल विद्यापीठ अनुदान आयोगाकडे **(ii)** व अशी मोडतोड करून १३५१ कोटीचा निधी फसवणुकीच्या मार्गाने केंद्राकडून मिळविल्याबद्दल मानव संसाधन विभागाकडे राज्याच्या उच्च शिक्षण विभागाविरुद्ध तपशीलवार तक्रारी दाखल करण्यात येतील.

**(११) सर्व विद्यापीठांच्या कार्यालयावर धरणे/मोर्चा :** बुधवार, दिनांक २७ मार्च, २०२४ रोजी दुपारी ४ वाजता आपआपल्या विभागातील सर्व शिक्षक मा.कुलगुरू यांच्या कार्यालयावर विद्यापीठस्तरीय धरणे/मोर्चा यामध्ये सहभागी होतील. त्या त्या विद्यापीठस्तरीय संघटनेचे पदाधिकारी शिष्टमंडळासह मा.कुलगुरू यांना आंदोलनाविषयीची कागदपत्रे सादर करतील व आंदोलनाधीन प्रश्नांबाबत त्यांनी त्यांची भूमिका मांडणारी निवेदने राज्यशासनाला पाठवावी, अशी त्यांना विनंती केली जाईल.

**(१२) संचालक उच्च शिक्षण, पुणे यांच्या कार्यालयावर राज्यस्तरीय धरणे/मोर्चा :** सोमवार, दिनांक १५ एप्रिल, २०२४ रोजी दुपारी १२ वाजता राज्यातील सर्व शिक्षक संचालक उच्च शिक्षण, पुणे यांच्या कार्यालयावर राज्यस्तरीय धरणे/मोर्चा यामध्ये सहभागी होतील. संघटनेचे पदाधिकारी शिष्टमंडळासह संचालक उच्च शिक्षण पुणे यांना आंदोलनाविषयी निवेदन सादर करतील.

**(१३)** मार्च महिन्याच्या शेवटापर्यंत मा.उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याचे घटनात्मक कर्तव्य सचिव उच्च शिक्षण व संचालक उच्च शिक्षण या दोन ज्येष्ठ अधिकाऱ्यांनी पार पाडले नाही तर.....

**(A)** महासंघाच्या कार्यकारी मंडळातील सदस्यांची एक समिती नेमून एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात "**सचिव उच्च शिक्षण व संचालक उच्च शिक्षण यांच्या न्यायालयीन निर्णयांप्रती लज्जास्पद वर्तनाचे तपशील समाविष्ट असलेली पुस्तिका**" तयार करण्यात यावी असा निर्णय घेण्यात येत आहे.

**(B)** या पुस्तिकेमध्ये (१) मा.उच्च न्यायालयाचे याबाबतच्या सर्व प्रकरणातील सर्व निर्णय (२) या सर्व प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेले सर्व निर्णय (३) या सर्व प्रकरणी अवमान याचिकेबाबतचे तपशील व त्याबाबत वेगवेगळ्या खंडपीठांनी पारित केलेले आदेश (४) अंतिम आदेश देण्यात आलेले नसले तरी ह्या दोन अधिकाऱ्यांच्या वर्तनाविषयी उग्र अभिप्राय व्यक्त करणारे मा.उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी पारित केलेले आदेश (५) या दोन ज्येष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार वेगवेगळ्या सहसंचालकांनी न्यायालयाचा अवमान करणारे काढलेले आदेश (६) मा.सर्वोच्च न्यायालयात या अधिकाऱ्यांनी जाणूनबुजून अनेक बाबतीत दाखल केलेल्या असत्य माहितीचे तपशील (७) महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने याविषयी संमत केलेले ठराव व या संदर्भातील इतर मजकूर हे सर्व तपशील या पुस्तिकेमध्ये प्रकाशित करण्यात येतील.

**(C)** साधारणपणे ही पुस्तिका दिनांक ३० एप्रिल, २०२४ पर्यंत किंवा तत्पूर्वी प्रकाशित करण्यात येईल.

**(D)** या पुस्तिकेची एक एक प्रत मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या तीनही खंडपीठातील सर्व मा.न्यायमूर्तींना कुरियरद्वारे किंवा स्पीड पोस्टने पाठविली जाईल.

**(E)** आंदोलन सुरू झाल्यापासून ३० एप्रिल, २०२४ पर्यंत जिल्ह्याजिल्ह्याच्या ठिकाणी शिक्षक, विद्यार्थी व गणमान्य नागरिक यांच्या बैठकांचे आयोजन करून उच्च शिक्षण विभागाचा घृणास्पद प्रकार उघड करणाऱ्या प्रचार सभांचे आयोजन केल्या जाईल. या सभांमधून निषेध - साहित्य वाटप केल्या जाईल. विद्यापीठनिहाय निषेध सभांचे आयोजन याच काळात केले जाईल. त्याला संघटनेचे राज्यस्तरीय नेते उपस्थित राहून संबोधित करतील.

**(१४)** इतक्या उपर उच्च शिक्षण विभागाने आपल्या वर्तनात दुरुस्ती केली नाही तर विद्यापीठीय परीक्षेच्या कामाशी असहकार आंदोलन सुरू केले जाईल. प्रत्यक्ष ते आंदोलन कोणत्या तारखेला सुरू होईल ते जाहीर करण्याचा अधिकार महासंघाचे अध्यक्ष व सरकार्यवाह यांना देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| **(डॉ. एस. पी. लवांदे)** | **(डॉ.प्रवीण रघुवंशी)** |
| *अध्यक्ष* | *सचिव* |

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS (MFUCTO)

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/78/2024-26 (Uploaded on www.nuta.in on 24.01.2024) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 01.02.2024**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

---------------------------------------------------

To,........................................................................

.............................................................................

.............................................................................

.............................................................................